# धावत्या दुचाकीत भीषण स्फोट

■ वृत्तसंस्था, सिहोर, दि. २८ :

मध्य प्रदेशातील सिहोर येथे चालत्या दुचाकीचा स्फोट झाला. स्फोट इतका शक्तिशाली होता की दुचाकीवरील व्यक्तीचे पाय तुकडे झाले आणि त्यात तो जागीच ठार झाला. ही घटना रविवारी सकाळी घडल्याचे वृत्त आहे. घटनास्थळी खराब झालेली दुचाकी आणि गंभीर जखमी तरुण पाहिल्यानंतर गावकऱ्यांनी तात्काळ पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच इच्छावार पोलीस घटनास्थळी पोहोचले आणि तपास सुरू केला. फॉरेन्सिक टीमलाही बोलावण्यात आले. प्राथमिक तपासात डिटोनेटर असल्याचा अंदाज आहे. विहीर फोडण्यासाठी हा तरुण डेटोनेटर घेऊन जात असल्याचे वृत्त आहे.

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

महत्वपूर्ण सूचना



महासागर, युवाराष्ट्र दर्शन आणि नागपुर पोस्ट

या वृत्तपत्राचे कॅलेंडर 2026 शनिवार दि. २७ तारखेला वितरीत करण्यात आले होते.

या न्यूजपेपरची किंमत रु.10 होती. ज्यांना कॅलेंडर मिळाले नाही, त्यांनी कृपया

निलेश लोणारे (9168555384) यांच्याशी संपर्क साधावा.

* वर्ष ५५ * अंक २६८ * | * नागपूर * | सोमवार, दिनांक २९ डिसेंबर २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

खरीखरी..

## महाराष्ट्रासाठी धडा

उत्तर प्रदेशातील सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी वर्तमानपत्रे वाचलीच पाहिजेत असा कायदा करण्यात आला आहे. तेथील सरकारनेच हा कायदा केलेला आहे. सध्या वाचनाची सवय दिवसेंदिवस कमी होत आहे असे असतानाच उत्तर प्रदेश सरकारने हा आदेश काढावा याला अत्याधिक महत्वाचे स्थान दिले पाहिजे. उत्तर प्रदेश राज्यातील सर्व प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये या गोष्टीबाबतची सक्ती करण्यात आलेली आहे, हे अत्यंत महत्त्वाचे. मुलांच्या आयुष्यात शालेय जीवनाचा हा काळ अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो. चांगल्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या विकासासाठी बरेच उपक्रम राबवले जातात, त्यामध्ये वाचन संस्कृतीला पोषक असा हा उपक्रम विद्यार्थ्यांना अनेक गोष्टींबाबत नवी दृष्टी देईल यात अजिबात शंका नाही. उत्तर प्रदेश सरकारचे माध्यमिक आणि प्राथमिक शिक्षण विभागाच्या सचिवांनी हा आराखडा निश्चित केलेला आहे. उत्तर प्रदेशात हिंदी भाषा आहे त्यामुळे उत्तर प्रदेशातील हिंदी भाषिक विद्यार्थ्यांनी हिंदी आणि इंग्रजी या दोन्ही भाषेतील वृत्तपत्रे वाचलीच पाहिजेत असा त्यांचा आदेश आहे. वर्तमानपत्राच्या वाचनाला प्रोत्साहित करण्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर काही वर्तमानपत्रे व मासिके प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांनी आठवी पास केल्यावर त्याच्या आकलनामध्ये समृद्धी येते. नववी ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचा उपयोग करून उत्तर प्रदेशमध्ये एक संपादकीय मंडळ तयार करण्यात येणार आहे. त्यांच्यापैकी जे लिहिते असतील त्यांना प्रोत्साहन देऊन त्यांना लिहिते केले जाईल, त्यासोबतच सरकार शब्दकोडे, सूडोकू यांच्या अभिनव स्पर्धा आयोजित करणार आहे. या शालेय विद्यार्थ्यांना ज्या बातम्या महत्त्वाच्या वाटत असतील त्याची कात्रणे कापून त्याचा संग्रह करण्यासाठी सांगण्यात आलेले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आवडीच्या विषयांचा कल सुद्धा कळेल. हा आगळावेगळा निर्णय ज्ञानवर्धन करण्यासाठी आणि खऱ्या अर्थाने वाचन संस्कृती वाढवण्यासाठी प्रोत्साहित करणारा आहे यामध्ये अजिबात दुमत नाही. शालेय जीवनापासून लागलेल्या वाचनाच्या सवयीचा, वाचनाच्या छंदाचा सर्वच विद्यार्थ्यांना एमपीएससी, यूपीएससी सारख्या स्पर्धा परीक्षांसाठी प्रचंड उपयोग होईल हे आम्ही सांगण्याची गरज नाही. विद्यार्थ्यांची ज्ञानसंपदा आणि शब्दसंपदा वाढावी म्हणून जे जे शब्द कठीण असतील त्या त्या शब्दांचा अर्थ नोटीस बोर्डवर लावण्यात येणार आहे. वाचन संस्कृती लोप पावत असताना अशा प्रकारचा विचार करणेच बौद्धिकता आणि ज्ञानसंपदा वाढवण्यासाठी प्रचंड उपयुक्त ठरणार आहे. उत्तर प्रदेश सरकारने विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासक्रमातील पुस्तके वाचण्याऐवजी इतर पुस्तकेही वाचली पाहिजेत आणि त्यासाठी प्रोत्साहन देण्याचेही ठरवलेले दिसत आहे. जे विद्यार्थी उत्तम वाचक असतील त्यांना निवडून प्रशस्तीपत्र सन्मानपूर्वक देण्यात येणार आहे. त्यावेळी पुष्पगुच्छा ऐवजी पुस्तकांचे संच भेट देण्यात येतील. ज्या अधिकाराच्या डोक्यातून ही संकल्पना उदयास आलेली आहे तो अधिकारी नक्कीच अभिनंदनास पात्र आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने रोज किमान दहा मिनिटे वृत्तपत्राचे वाचन केलेच पाहिजे. बातम्या तर वाचल्या पाहिजेतच, त्याबरोबरच संपादकीय लेख आणि संपादकीय पानावरील विविध विषयांबाबत असलेले ज्ञानवर्धक आणि विविध विषयांवरील विश्लेषण करणारे लेख विद्यार्थ्यांनी वाचायलाच हवेत. त्यामुळेच लहानपणापासूनच विशिष्ट पद्धतीची वैचारिक बैठक निर्माण होते, असे अनेक मानसशास्त्रीय तज्ञांचे मत आहे. जगातील बातम्या, देशातील बातम्या आपल्या विभागातील बातम्या किंवा आपल्या जिल्ह्यातील आणि तालुक्यातील महत्त्वाच्या घडामोडी प्रत्येक विद्यार्थ्याने लहानपणापासून नोंद करून ठेवल्या पाहिजेत. त्यासोबत ज्या शब्दांचे आकलन होत नसेल त्याचा विशेष अभ्यास करावा आणि तो शब्द समजावून घ्यावा हा उपक्रम संपूर्ण देशासाठी लागू करण्यात आला तर खरंच किती बहार येईल, असे आम्हाला वाटते. महाराष्ट्रासारख्या बहुश्रुत राज्याच्या अतिशय उच्च पदावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना अशा प्रकारचा उपक्रम वाचनप्रेमी महाराष्ट्रात राबवला पाहिजे असे आजपर्यंत का बरे वाटले नसावे, हा सुद्धा मोठा घनगंभीर प्रश्न आहे. आज पाचवीचा विद्यार्थी सहावीत गेला की, पुढच्या दोन-तीन महिन्यात त्याला पाचवीत शिकलेल्या कोणत्याही ज्ञानाची आठवण राहत नाही, ही सत्य गोष्ट कटू वाटत असेलही परंतु हा आजवरचा अनुभव आहे. घोकमपट्टी करून वरच्या वर्गात जाणे म्हणजे ज्ञानवृद्धी झाली असे अजिबात समजू नये. आपण जे काही शिकत आहोत ते आपण आत्मसात केले आहे काय, त्यामुळे आपली शब्दसंपदा वाढली आहे काय, आपल्या ज्ञानाची उंची वाढली आहे काय या प्रश्नांसोबतच आपण जे शिकलो त्याने आपली बौद्धिक क्षमता आणि वैचारिक पातळी सुधारली आहे काय याचा व्यापक विचार करणे गरजेचे आहे?. कोणत्याही परिस्थितीत खरेखुरे ज्ञान संपादन करण्यासाठी आपण काहीतरी केलेच पाहिजे. त्यासाठी भरपूर वाचले पाहिजे, ही भावना प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात निर्माण झाली पाहिजे. आज काल लहान लहान मुलेही मोबाईल वेडी झालेली आहेत कारण, सध्या आई आणि बापालाही फुर्सत नाही. त्यामुळेच विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाऐवजी त्यांच्या मेंदूत नको त्या गोष्टीत मोबाईलच्या माध्यमातून भरल्या किंवा भरवल्या जातात. आज कालच्या अनेक वृत्तपत्रात खून, मारामारी, बलात्कार, ड्रग्स रॅकेट वगैरे सारख्या बातम्यांना पहिल्या पानावर स्थान मिळते. खरे पाहता समाजातील अधोगतीला ही वृत्तपत्रे जबाबदार नसली तरीही पांढऱ्यावर काळे करण्यासाठी अशा वृत्तपत्रांना या बातम्या द्याव्यात लागतात, कारण अशा बातम्या वाचणारा एक विशिष्ट वर्ग असतो. मात्र विद्यार्थ्यांसाठी एखादी वाचनाची योजना येत असेल तर आणि विद्यार्थ्यांनी वृत्तपत्राचे वाचन करायचे ठरवले. तर यावर बऱ्यापैकी अंकुश लागेल आणि सकारात्मक आणि विचारात्मक तसेच ज्ञानवर्धन करणाऱ्या बातम्या देण्याची गरज आहे, या गोष्टी वृत्तपत्रांनाही कळतील. आजचे शालेय जीवनातील विद्यार्थी हेच भविष्यात राज्याची तसेच देशाची धुरा खांद्यावर घेणारे भावी नागरिक आहेत. आपल्या महाराष्ट्रातील भावी पिढी ज्ञानी व्हावी यासाठी आपल्या महाराष्ट्र सरकारनेही याच धर्तीवर वाचनहमी योजना राबवावी, असे आम्हाला सुचवावेसे वाटते. संपूर्ण राज्यातील ज्ञानोपासक अशा प्रकारच्या उपक्रमाची वाट पाहत आहेत.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# मुंबईत काँग्रेस-वंचितची युती

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :

मुंबई महानगरपालिका निवडणुकीचा रणसंग्राम अधिकच अटीतटीचा होत असताना, राज्याच्या राजकारणात एक अत्यंत मोठी आणि निर्णायक घडामोडी समोर आली आहे. आगामी निवडणुकीसाठी काँग्रेस आणि प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील वंचित बहुजन आघाडीने अखेर अधिकृतपणे हातमिळवणी केली आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत या युतीची घोषणा केली. या नव्या समीकरणामुळे मुंबईच्या राजकीय पटलावर आता मोठी उलथापालथ होण्याची शक्यता निर्माण झाली असून, ही आघाडी केवळ सत्तेसाठी नसून भाजपला रोखण्यासाठी आणि संविधानाच्या रक्षणासाठी असल्याचे दोन्ही पक्षाच्या नेत्यांनी स्पष्ट केले.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी यावेळी बोलताना काँग्रेस आणि वंचित हे 'नैसर्गिक मित्र' असल्याचे नमूद केले. समविचारी पक्षांनी एकत्र येऊन लोकशाही मूल्ये जपली पाहिजेत, ही आमची



सुरुवातीपासूनची भूमिका होती.

याआधी नगरपरिषद निवडणुकीत काही ठिकाणी आम्ही एकत्रितपणे निवडणूक लढलो, त्याचे सकारात्मक परिणाम पाहायला मिळाले. आज तीच भूमिका पुढे नेण्यासाठी आम्ही 'समविचारी' म्हणून अधिकृतपणे एकत्र आलो आहोत. विशेष म्हणजे, आज काँग्रेसच्या स्थापना दिनीच हा ऐतिहासिक युतीचा योग जुळून आल्याने एका नव्या वैचारिक अध्यायाला सुरुवात झाली आहे, असे हर्षवर्धन सपकाळ यांनी अत्यंत सांगितले.

### भाजपला रोखणे युतीचा मुख्य केंद्रबिंदू

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, भारिप सोबत आमची आघाडी होती. १९९९ नंतर राजकीयदृष्ट्या आम्ही एकत्र नव्हतो. २५ वर्षानंतर आघाडीच्या घोषणेचा मला आनंद आहे. काँग्रेस आणि वंचित हे नैसर्गिक मित्र आहेत. काँग्रेस आणि वंचितमध्ये चांगलं नातं आहे, असे म्हणत त्यांनी मुंबईत वंचित आणि काँग्रेसच्या आघाडीची घोषणा केली. आमची आघाडी विचाराची आहे. सत्तेसाठी आमची आघाडी नाही. जागापेक्षा विचारांना आम्ही प्राधान्य देत आहोत. हा संख्येचा खेळ नाही तर विचारांचा मेळ आहे. आमची आघाडी विचारांची आहे, सत्तेसाठी नाही. आजपासून आम्ही दोन मित्रपक्ष आहोत. मुंबई महापालिकेत वंचित आणि काँग्रेस एकत्र लढणार, असे देखील ते म्हणाले.

महानगरपालिका निवडणुकीसंदर्भात

## गडकरी आणि मुख्यमंत्र्यांची भेट

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २८ :

नागपूर महानगरपालिका निवडणुकी संदर्भातील कोअर कमिटीच्या बैठकीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या निवासस्थानी भेट दिली. या प्रदेशातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीनंतरच्या घडामोडींमुळे ही बैठक महत्त्वाची ठरली. महापौर आणि नगरसेवक स्तरावरील उमेदवारांच्या उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी जेमतेम दोन दिवस शिल्लक आहेत. परंतु मित्रपक्षांच्या जागावाटपाबाबतच्या गतिरोध आणि इतर संबंधित बाबींमुळे निर्माण झालेल्या निराशाजनक परिस्थितीमुळे दुसऱ्या राजधानीतील दोन प्रमुख नेत्यांनी बैठक बोलावून या गतिरोधातून मार्ग काढला. वाटाघाटींनंतर भाजप पक्षाच्या ५० उमेदवारांची अंतिम यादी जाहीर होण्याची अपेक्षा आहे.

कोअर कमिटीच्या बैठकीत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह इतर स्थानिक आणि राज्यस्तरीय नेत्यांचाही सहभाग होता. वरिष्ठ नेत्यांनी शिवसेना शिंदे गटासोबत युतीचा भाग म्हणून नागपुरात नागरी निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे, तसेच इतर महत्त्वाच्या आणि लहान मित्रपक्षांचाही समावेश आहे. अंतिम अहवाल येईपर्यंत उमेदवारांची अंतिम यादी प्रतीक्षेत होती.

## पुण्यात दोन्ही राष्ट्रवादीत युतीची बोलणी फिस्कटली

■ महासागर प्रतिनिधी
पुणे/मुंबई, दि. २८ :

पुण्यातील निवडणुकीसाठी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसमधील आघाडीची चर्चा फिस्कटल्याने शरद पवारांचा पक्ष महाविकास आघाडीसोबत जाणार आहे.

ही निवडणूक घड्याळ चिन्हावर लढण्याची अट अजित पवारांनी ठेवल्याने शरद पवारांच्या पक्षाला हा निर्णय घ्यावा लागला आहे. त्याच वेळी मुंबई महापालिकेसाठी शिवसेना (उबाठा) आणि मनसेच्या आघाडीसोबत एकत्रित निवडणूक लढण्याचे शरद पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाने निश्चित केले आहे. पुण्यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र लढणार नसल्याचे शरद पवारांच्या पक्षाचे नेते अंकुश काकडे यांनी सांगितले. तसेच घड्याळ या चिन्हावर लढण्याची अटही घातल्याची माहिती समोर आली आहे.

## राष्ट्रवादी शरद पवार गटाला खिंडार

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २८ :

मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या तोंडावर राजकीय समीकरणे वेगाने बदलत असून, जागावाटपाच्या पेचामुळे शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात मुंबईत मोठे खिंडार पडले आहे. ठाकरे बंधू यांच्याशी शरद पवारांनी केलेल्या युतीत राष्ट्रवादीला अवघ्या १० ते १२ जागा मिळाल्याने पक्षांतर्गत नाराजी उफाळून आली आहे. यामुळे अनेक इच्छुक उमेदवारांनी आता अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची वाट धरली असून, मुंबईत स्वतंत्रपणे लढणाऱ्या अजित पवार गटाने तब्बल १०० जागांवर उमेदवार उतरवण्याची तयारी सुरू केली आहे.

ईशान्य मुंबईचे जिल्हाध्यक्ष आणि माजी नगरसेवक धनंजय पिसाळ यांनी आज आपल्या शेकडे समर्थकांसह अजित पवारांच्या राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश केला. विक्रोळीतील प्रभाग क्रमांक १११ मधून पिसाळ लढण्यास इच्छुक होते, मात्र ठाकरे-मनसे युतीमध्ये ही जागा संजय राऊत यांचे बंधू संदीप राऊत यांच्यासाठी सुटण्याची दाट शक्यता असल्याने पिसाळ यांनी पक्षाला सोडचिट्ठी दिली.

पिसाळ यांच्यापाठोपाठ माजी नगरसेविका मनीषा रहाटे आणि दक्षिण मध्य मुंबईचे जिल्हाध्यक्ष आरिफ सय्यद हे देखील अजित पवार गटात प्रवेश करणार असल्याची दाट चर्चा आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत सध्या युत्या आणि आघाड्यांचे चित्र पूर्णपणे बदलले असून राजकीय समीकरणे कमालीची गुंतागुंतीची झाली आहेत. विशेषतः शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने ५२ जागांची मागणी केली होती, परंतु ठाकरे बंधूंच्या युतीमध्ये त्यांच्या पदरात केवळ १० ते १२ जागाच पडल्या आहेत.

# दुहेरी हत्याकांडाने उमरेड हादरले

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २८ :

मद्याच्या आहारी गेलेल्या तरुणाने शेजारीच राहणाऱ्या माय-लेकीची लाकडी दांड्याने वार करत दुहेरी खून केल्याने उमरेड तालुका हादरला. तालुक्यातील गांगापुर कालवा परिसरातील अंगाचा थरकाप उडवणारी ही घटना घडली.

नेहमी प्रमाणे मद्य प्राशन करून आलेल्या निलेश ठाकरे याने आधी शेजारी राहणाऱ्या मायलेकीशी वाद घातला. हा किरकोळ वादात इतका विकोपाला गेला की त्यात संतापलेल्या निलेशने जवलच पडलेला लाकडी दंडुका उचलला आणि मायलेकीवर हल्ला केला. यात पर्वता शंकर फुकट (६५) आणि त्यांची मुलगी संगीता रिठे (४०) यांचा मृत्यू झाला. शनिवारी हि घटना घडली. त्याची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत आरोपीला अटक केली. मात्र या घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळलेल्या माहितीनुसार, गांगापुर कालवा परिसरातील झोपडपट्टीत राहणारा निलेश हा व्यसनाच्या आहारी गेला होता. तो शेजारी राहणाऱ्या माय-लेकीशी सतत वाद होत होता. मद्याच्या नशेत तो शिविगाळ करत असल्याने मायलेकी कंटाळल्या होत्या. शनिवारी तो पुन्हा मद्य प्राशन करून आला. किरकोळ कारणावरून त्याची पुन्हा माय- लेकीशी शाब्दिक चकमक उडाली.

वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. उमरेडचे पोलीस निरीक्षक धनाजी जळक यांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेत ताब्यात घेत, शवविच्छेदनासाठी रवाना केला. याप्रकरणी आरोपीविरूध्द गुन्हा नोंदवत, नितेशला पोलिसांनी अटक केली. भरदिवसा घडलेल्या या दुहेरी हत्याकांडामुळे उमरेड हादरले आहे. मायलेकीला जीवानिशी मारल्यानंतर भानावर आलेला निलेश ठाकरे पळून जाण्याच्या तयारी होता. तो गावाच्या वेशीबाहेर पडण्या आधीच पोलिसांनी त्याला अटक केली.

निलेशच्या मोठ्या भावाचे काही महिन्यांपूर्वीच निधन झाले होते. तेव्हा पासून निलेशवर कोणाचेच नियंत्रण नव्हते. त्याच्या मद्याच्या सवयीमुळे निलेशची आई आणि लहान भाऊ मंगश दोघेही त्रासले होते. अखेर त्याने संतापाच्या भरात शेजारीच राहणाऱ्या मायलेकीचा दुहेरी खून केल्याने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे.

## मुंबई महापालिकेत अजित पवारांच्या राष्ट्रवादीचा 'स्वबळाचा' नारा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २८ :



राज्यभरात महानगरपालिका निवडणुकीचे बिगुल वाजले असून, मुंबई महानगर पालिकेच्या रणांगणात अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने मोठी आघाडी घेतली आहे. महायुतीपासून फारकत घेत मुंबईत स्वतंत्रपणे लढण्याचा निर्णय घेणाऱ्या राष्ट्रवादीने आज ३७ उमेदवारांची पहिली यादी प्रसिद्ध केली. या निवडणुकीची संपूर्ण धुरा नवाब मलिक आणि आमदार सना मलिक यांच्या खांद्यावर सोपवण्यात आली असून, पक्षाने एकूण १०० जागा लढवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. जाहीर झालेल्या पहिल्या यादीतील उमेदवारांना उद्यापासूनच अधिकृत एबी फॉर्मचे वाटप करण्यात येणार असल्याची माहिती पक्षाकडून देण्यात आली आहे.

या पहिल्या यादीत नवाब मलिक यांच्या कुटुंबातील तीन सदस्यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. यात त्यांचे बंधू कप्तान मलिक यांना प्रभाग क्रमांक १६५ मधून, तर बहीण डॉ. सईदा खान यांना प्रभाग क्रमांक १६८ मधून मैदानात उतरवण्यात आले आहे. विशेष म्हणजे, कप्तान मलिक यांचा मूळ प्रभाग १६८ हा महिलांसाठी राखीव झाल्याने, त्यांनी स्वतःसाठी नवीन प्रभाग निवडला असून त्यांच्या जागी आपली सून बुशरा नदीम मलिक यांना प्रभाग १७० मधून उमेदवारी दिली आहे.

आमदार सना मलिक यांनी दिलेल्या माहितीनुसार, राष्ट्रवादी काँग्रेस मुंबईत एकूण १०० उमेदवार उभे करणार आहे. पहिल्या ३७ उमेदवारांची घोषणा झाली असून, उद्यापासूनच या उमेदवारांना 'एबी फॉर्म' चे वाटप केले जाणार आहे. महायुतीतील इतर मित्रपक्षांपासून फारकत घेत राष्ट्रवादीने स्वतंत्रपणे उमेदवार देण्यास सुरुवात केल्यामुळे मुंबई महापालिकेच्या रणधुमाळीत आता चुरस वाढली आहे.

## पाकिस्तानचे पाणी थांबणार

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २८ :

भारताने जम्मू-कश्मीरच्या किश्तवाड जिल्ह्यातील चिनाब नदीवर २६० मेगावॅट क्षमतेच्या दुलहस्ती स्टेज-॥ जलविद्युत प्रकल्पाला पर्यावरण मंजुरी दिली आहे. पर्यावरण मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत तज्ज्ञ मूल्यांकन समितीने (ईएसी) या महिन्याच्या सुरुवातीस झालेल्या आपल्या ४५व्या बैठकीत या रन-ऑफ-द-रिव्हर प्रकल्पासाठी मंजुरी दिली. या प्रकल्पाची अंदाजित किंमत ३,२०० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे.

पाकिस्तान लंबे काळापासून सिंधू पाणी करारा हवाला देत आलो आहे, परंतु भारताच्या ताज्या पावलांमुळे त्याच्या चिंता वाढल्या आहेत. तज्ज्ञांच्या मते, सिंधू जल समझौत्याच्या निलंबनामुळे भारताला पश्चिमेकडील नद्या अधिक स्वतंत्रपणे वापरण्याची मुभा मिळाली आहे, ज्यामुळे जलसुरक्षा आणि ऊर्जा उत्पादन मजबूत होईल.

समितीने नोंदवले की चिनाब बेसिनचे पाणी भारत-पाकिस्तान दरम्यान १९६० च्या सिंधू जल संधीनुसार वाटले जात होते आणि प्रकल्पाचे सर्व मापदंड या संधीशी सुसंगत पद्धतीने ठरवले आहेत.

# एकनाथ शिंदेंना मोठा धक्का

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २८ :



आशिष मानेंचा अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश

आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्वच राजकीय पक्षांनी जागावाटप तसेच उमेदवारांच्या याद्या जाहीर करण्यास सुरुवात केली आहे. मुंबई महापालिकेवर सत्ता स्थापन करण्यासाठी सर्वच पक्षांमध्ये रस्सीखेच सुरू असून महायुतीमध्ये यावरून अंतर्गत मतभेद देखील होत असल्याचे बोलले जात आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आता मुंबईत मोठा धक्का बसला आहे. शिंदेंचे सख्खे भाचे आशिष माने यांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. मुंबई कार्याध्यक्ष सिद्धार्थ कांबळे यांच्या उपस्थितीत आशिष माने यांनी प्रवेश केला आहे.

एकनाथ शिंदे यांचे सख्खे भाचे आशिष माने यांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला असून त्यांना चांदिवली मतदारसंघातील प्रभाग क्रमांक 159 मधून उमेदवारी देखील देण्याचे निश्चित करण्यात आले असल्याचे समजते. त्यामुळे एकनाथ शिंदे यांना हा मुंबईत मोठा धक्का असल्याचे मानले जात आहे. या घटनेवरून महायुतीमध्ये अंतर्गत वाद देखील निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. आशिष माने यांच्यासह भाजपच्या माजी महामंत्री नेहा राठोड यांना देखील राष्ट्रवादी काँग्रेसने उमेदवारी देण्याचे ठरवले आहे. नेहा राठोड यांना प्रभाग क्रमांक 156 मधून उमेदवारी देण्यात आली आहे. राज्यातील 29 महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी राजकीय रणधुमाळी सुरू झाली असून, 23 डिसेंबरपासून उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया गतिमान झाली आहे. अर्ज भरण्यासाठी आता केवळ 30 डिसेंबरपर्यंतची मुदत शिल्लक असल्याने इच्छुकांची मोठी लगबग पाहायला मिळत आहे. या निवडणूक वेळापत्रकानुसार, 31 डिसेंबरला अर्जांची छाननी होईल.

## दोन गुजराती आपल्याला गिळायला निघालेत

# उद्धव ठाकरेंची शिवसैनिकांना साद

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २८ :

राज्यातील महापालिका निवडणुकांचे बिगुल वाजले असून १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या मतदानासाठी राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे. अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर अखेर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी युतीची घोषणा केली असून, मुंबईसह राज्यातील महापालिकांमध्ये आता 'ठाकरे' बंधूंचा करिष्मा पाहायला मिळणार आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित मेळाव्यात उद्धव ठाकरे यांनी भाजपवर घणाघाती टीका करतानाच, कार्यकर्त्यांना एकनिष्ठ राहण्याचे आवाहन केले. "दोन गुजराती आपल्याला गिळायला निघाले असताना आपण जर आपसात भांडत बसलो, तर ही लढाई न लढलेलीच बरी," अशा



शब्दांत त्यांनी आपल्या संघर्षाची दिशा स्पष्ट केली.

कार्यकर्त्यांना संबोधित करताना उद्धव ठाकरे भाजपविरोधात कमालीचे आक्रमक दिसले. ते म्हणाले, "भाजपला महाराष्ट्रात कोणी ओळखत नव्हते, आम्ही त्यांना राज्याच्या कानाकोपऱ्यात आणि खेडोपाडी नेले. आम्ही ज्यांना मोठे केले, आज तेच आमच्यावर वार करत आहेत. भाजपने केवळ युती तोडली नाही, तर ते आपल्याला संपवायला निघाले आहेत. इतकी वर्षे ज्यांनी आपला केवळ उपयोग करून घेतला, त्यांना धडा शिकवण्याची वेळ आता आली आहे."

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसोबत (मनसे) झालेल्या युतीबाबत बोलताना त्यांनी वास्तववादी भूमिका मांडली. "ज्यावेळी युती किंवा आघाडी असते, त्यावेळी १०० टक्के आपल्या मनासारखे घडत नाही.

काही जागा आपल्या हक्काच्या असतात, पण नायलाजाने त्या मित्रपक्षासाठी सोडाव्या लागतात. मला माहिती आहे की काही ठिकाणी कार्यकर्त्यांमध्ये नाराजी असेल, पण मुंबई आणि महाराष्ट्राच्या भल्यासाठी मी हा वाईटपणा घ्यायला तयार आहे. तुम्ही मात्र तुमची निष्ठा विकू नका," असे आवाहन उद्धव ठाकरे यांनी शिवसैनिकांना केले.

उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणात अत्यंत भावनिक आवाहन केले. "तुम्ही एकदा माझ्या खुर्चीत बसून बघा आणि समोरच्या चार माणसांना निवडून दाखवा, म्हणजे जबाबदारी काय असते हे समजेल. माझ्या महाराष्ट्राच्या भल्यासाठी मी जगाच्या नजरेत वाईट ठरलो तरी चालेल, पण आपली ताकद विखुरली जाता कामा नये," असे त्यांनी कार्यकर्त्यांना बजावून सांगितले.

या युतीचा मुख्य उद्देश मुंबईवरील मराठी माणसाचे वर्चस्व टिकवून ठेवणे हाच आहे. राज ठाकरे यांनीही यापूर्वीच जाहीर केले आहे की, मुंबई महापालिकेवर पुन्हा एकदा मराठी माणसाचाच महापौर बसेल आणि तो आपल्या युतीचाच असेल.

## अरावली प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाची दखल

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २८ :

सर्वोच्च न्यायालयाने आता अरावली प्रकरणात हस्तक्षेप केला आहे. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची स्वतःहून दखल घेतली आहे आणि सोमवारी सुनावणीची तारीख निश्चित केली आहे. मुख्य न्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जे.के. माहेश्वरी आणि न्यायमूर्ती ए.जी. मसीह यांचा समावेश असलेले तीन न्यायाधीशांचे खंडपीठ या प्रकरणाची सुनावणी करणार आहे. "अरावली पर्वतरांगा आणि पर्वतरांगा आणि संबंधित समस्यांची व्याख्या" असे या प्रकरणाचे शीर्षक आहे.

हे लक्षात घ्यावे की केंद्र सरकारने अलीकडेच अरावली प्रदेशाबाबत एक मोठा निर्णय घेतला आहे. केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने अरावली प्रदेशात कोणतेही नवीन खाणकाम भाडेपट्टे देण्यावर पूर्ण बंदी घालण्याचे निर्देश राज्यांना दिले आहेत. याशिवाय, पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने भारतीय वन संशोधन व शिक्षण परिषदेला संपूर्ण अरावली परिसरात अतिरिक्त क्षेत्रे किंवा झोन ओळखण्याचे निर्देश दिले आहेत. केंद्र सरकारने आधीच खाणकामासाठी प्रतिबंध घातलेल्या भागांव्यतिरिक्त, पर्यावरणीय, भूवैज्ञानिक तसेच भूदृश्य पातळीवरील निकषांच्या आधारे ज्या ठिकाणी खाणकामावर बंदी घालणे आवश्यक आहे, अशी क्षेत्रे निश्चित करण्यास सांगण्यात आले आहे.

## गौतम भाई मला मोठ्या भावासारखे
# सुप्रिया सुळेंकडून कौतुक



■ महासागर प्रतिनिधी
बारातमी, दि. २८ :
"गौतम भाई आणि प्रीती भाभी हे माज्यासाठी केवळ पाहुणे नसून, ते माज्या हक्काच्या मोठ्या भावासारखे आणि वहिनीसारखे आहेत. गेल्या 30 वर्षांपासून आमचे प्रेमाचे आणि विश्वासाचे नाते आहे," अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी अदानी कुटुंबाविषयीच्या आपल्या भावना व्यक्त केल्या. बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या कार्यक्रमात गौतम अदानी आणि प्रीती अदानी यांचे स्वागत करताना त्या बोलत होत्या.

बारामतीमध्ये शरद पवार सेंटर ऑफ एक्सलन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्स सेंटरचे आज उद्योगपती गौतम अदानी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला मुख्य पाहुणे म्हणून गौतम अदानी हे उपस्थित होते. यावेळी गौतम अदाणी यांच्या पत्नी देखील सोबत होत्या. त्याचबरोबर शरद पवारांसह अजित पवार, सुनेत्रा पवार, सुप्रिया सुळे आणि युगेंद्र पवार हे देखील या कार्यक्रमाला उपस्थित होते. आर्टिफिशियल इंटेलिजन्स सेंटरच्या उद्घाटनावेळी सुप्रिया सुळे यांनी गौतम अदाणी यांच्या कार्याचे कौतुक केले. सुप्रिया सुळे यांनी बारामतीमध्ये विद्या प्रतिष्ठानच्या कार्यक्रमात गौतम अदानी आणि प्रीती अदानी यांचे मनापासून स्वागत केले. 'गौतम भाई आणि प्रीती भाभी माज्यासाठी मोठ्या भावासारखे आणि वहिनीसारखे आहेत, असे म्हणत त्यांनी अदानी कुटुंबाशी असलेल्या ३० वर्षांच्या जिव्हाळ्याच्या संबंधांचा उल्लेख केला.

सुप्रिया सुळे म्हणाल्या, कधी आयुष्यात चांगली, गोड किंवा कडुही बातमी मी हक्काने कुठल्या भावाला सांगते, तर या भावाला (गौतम अदाणी) सांगते. कधी कधी ते मला हक्काने रागावतातही, तर कधी माया देखील करतात. आज गौतम भाई देशात नाही, तर जगामध्ये यशस्वी झालेत, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

## आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा केवळ वापर नाही
# युवा भारताने नेतृत्व करावे : गौतम अदाणी

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. २८ :
तरुण भारतीयांना उद्देशपूर्ण आणि आत्मविश्वासाने स्वदेशी कृत्रिम बुद्धिमत्ता (अक) विकसित करून तिचे नेतृत्व करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विद्या प्रतिष्ठानचे शरद पवार सेंटर ऑफ एक्सलन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्स हे शैक्षणिक संस्था, उद्योग आणि राष्ट्रीय प्राधान्यक्रम यांच्यातील दुवा म्हणून उभे राहत आहे.

भारताच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी आणि जागतिक नेतृत्वासाठी सार्वभौम अक क्षमता अत्यंत महत्त्वाची असल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे.

तरुण भारताला दिलेल्या प्रभावी आवाहनात, अदानी समूहाचे अध्यक्ष श्री. गौतम अदानी यांनी महाराष्ट्रातील बारामती येथे विद्या प्रतिष्ठानच्या शरद पवार सेंटर ऑफ एक्सलन्स इन आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या उद्घाटनप्रसंगी पुढील पिढीने पुढे येत 'एज ऑफ इंटेलिजन्स'चे नेतृत्व करावे, असे आवाहन केले.



विद्यार्थी आणि संशोधकांना संबोधित करताना अदानी म्हणाले की, भारत अशा निर्णायक टप्प्यात प्रवेश करत आहे जिथे तंत्रज्ञान, प्रतिभा आणि राष्ट्रीय उद्दिष्टे एकत्रितपणे पुढे जाणे अत्यावश्यक आहे. भारताची शाश्वत ताकद ही लोक, संस्था आणि दीर्घकालीन दृष्टी यांचे प्रभावी समन्वय साधण्याच्या क्षमतेत असल्याचे त्यांनी नमूद केले. हीच स्पष्टता आता तरुण भारतीयांनी कृत्रिम बुद्धिमत्तेकडे पाहताना मार्गदर्शक ठरली पाहिजे केवळ निष्क्रिय वापरकर्ते म्हणून नव्हे, तर क्षमता निर्माण करणारे आणि नेतृत्व करणारे म्हणून ठरली पाहिजे.

कृत्रिम बुद्धिमत्तेबाबत असलेल्या चिंतेची दखल घेत, अदानी यांनी उपस्थितांना आठवण करून दिले की इतिहास आपल्याला दिलासा देतो. औद्योगिक क्रांतींपासून ते भारताच्या स्वतःच्या डिजिटल परिवर्तनापर्यंत प्रत्येक मोठ्या तांत्रिक बदलाने मानवी क्षमतांचा विस्तारच केला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता या प्रक्रियेला आणखी पुढे नेईल, असे ते म्हणाले, कारण ती बुद्धिमत्ता आणि उत्पादकता येट सामान्य नागरिकांच्या हाती देईल आणि प्रत्येक पार्श्वभूमीतील तरुणांसाठी विकासात सहभागी होण्याचे नवे मार्ग खुले करेल.

आर्थिक ताकद आणि राष्ट्रीय प्रभाव घडवत आहे, तिथे परकीय अल्गोरिदमवर अवलंबून राहणे धोक्याचे ठरू शकते. डेटा, निर्णयप्रक्रिया आणि क्षमता या राष्ट्रीय हिताशी दृढपणे जोडलेल्या राहिल्या पाहिजेत, असे त्यांनी स्पष्ट केले. स्वदेशी एआय मॉडेल्स उभारणे, मजबूत संगणकीय (कम्प्युट) क्षमता विकसित करणे आणि सक्षम व टिकाऊ बुद्धिमत्ता परिसंस्था निर्माण करणे हे भारताच्या आर्थिक सुरक्षिततेसाठी, सांस्कृतिक आत्मविश्वासासाठी आणि धोरणात्मक स्वातंत्र्यासाठी अत्यावश्यक असल्यावर त्यांनी भर दिला. या दृष्टीकोनाला व्यापक संदर्भ देताना, अदानी यांनी जागतिक एआय परिसंस्थेमधील अदानी समूहाच्या वाढत्या भूमिकेकडे लक्ष वेधले. विविध क्षेत्रांतील कार्यरत असलेला हा समूह डेटा सेंटर्स, डिजिटल पायाभूत सुविधा तसेच मोठ्या प्रमाणावर संगणकीय क्षमतेला ऊर्जा पुरवणाऱ्या स्वच्छ ऊर्जेमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहे.

## शरद पवारांचा पक्ष फोडण्यात अदानींच्या भावाचा सहभाग



**मुंबई :** बारामतीमध्ये शरद पवार आणि गौतम अदानी एकाच मंचावर आल्याने राजकीय चर्चांना उधाण आले असतानाच, शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांनी एक अत्यंत खळबळजनक दावा केला आहे. "शरद पवारांचा पक्ष फोडण्यात गौतम अदानींच्या भावाचा सहभाग होता, अशी माझी ऐकीव माहिती आहे," असे सांगत राऊत यांनी राजकीय वतुर्ळात मोठी खळबळ उडवून दिली आहे. शरद पवार आणि अदानी यांचे संबंध वैयक्तिक आणि कौटुंबिक असू शकतात, मात्र पक्ष फोडण्यातील अदानींच्या कुटुंबाच्या कथित हस्तक्षेपावर राऊत यांनी पहिल्यांदाच जाहीरपणे भाष्य केले. मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माध्यमांशी बोलताना संजय राऊत यांनी शिवसेना-मनसे यांच्यातील जागावाटप, काँग्रेसची भूमिका आणि अदानींच्या बारामती दौऱ्यावर भाष्य केले. बारामतीतील या भेटीवर प्रतिक्रिया देताना संजय राऊत म्हणाले की, आपल्या कार्यक्रमाला कोणाला बोलवायचे हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न असतो. संपूर्ण पवार कुटुंब अदानींच्या स्वागताला हजर असेल तर तो त्यांचा प्रश्न आहे, मात्र ज्या अजित पवारांनी पक्ष फोडला ते देखील तिथे उपस्थित असल्याने राऊत यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. रोहित पवार यांनी अदानींच्या गाडीचे सारथ्य केल्याबद्दल विचारले असता, या प्रश्नाचे उत्तर रोहित पवारच देऊ शकतील, असे म्हणत त्यांनी अधिक बोलणे टाळले.

## भाजपची उमेदवारी निश्चित नसतानाही
# कृष्णराज महाडिकांचा अर्ज

■ महासागर प्रतिनिधी, कोल्हापूर, दि. २८ :
कोल्हापूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपकडून उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर कृष्णराज महाडिक यांनी आपल्या राजकीय वाटचालीचा अधिकृत प्रारंभ झाल्याची भावना व्यक्त केली आहे. भाजपकडून अद्याप अधिकृत उमेदवार यादी जाहीर झालेली नसतानाही त्यांनी पुढाकार घेत अर्ज दाखल केला असून, हा निर्णय आपल्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असल्याचं त्यांनी सांगितलं. कुटुंबीयांचा आशीर्वाद, मित्रांचा विश्वास आणि समर्थकांचं पाठबळ घेऊन आपण निवडणुकीच्या मैदानात उतरलो असल्याचं महाडिक यांनी स्पष्ट केलं. आजचा दिवस हा केवळ निवडणूक प्रक्रियेचा भाग नसून, आपल्या सार्वजनिक जीवनाच्या प्रवासाचा प्रारंभ असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. ही निवडणूक आपण स्वतःच्या ताकदीवर आणि जनतेच्या विश्वासावर लढवत असल्याचं सांगतानाच, खासदार धनंजय महाडिक यांचा आशीर्वाद आणि मार्गदर्शन कायम सोबत असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं.

सध्या खासदार धनंजय महाडिक यांच्यावर राज्यातील आणि विविध जिल्ह्यांतील जबाबदाऱ्या असल्यामुळे ते किती वेळ थेट प्रचारासाठी देऊ शकतील, याबाबत अनिश्चितता असली तरी त्यांचे मार्गदर्शन आपल्यासाठी महत्त्वाचं असल्याचं त्यांनी नमूद केलं. कुटुंबीय, मित्रपरिवार आणि कार्यकर्त्यांच्या साथीनं आपण ही निवडणूक सक्षमपणे लढवू, असा विश्वास कृष्णराज महाडिक यांनी व्यक्त केला. आतापर्यंत सामाजिक कामांच्या माध्यमातून विविध सामाजिक प्रश्न, नागरिकांच्या अडचणी आणि स्थानिक विषयांवर सक्रिय राहिल्याचा अनुभव आपल्याला उपयोगी पडेल, असंही त्यांनी सांगितलं. नागरिकांकडून मिळणारा विश्वास हीच आपली खरी भांडवलं असल्याचं सांगत, कृष्णराज महाडिक यांनी विकासाचा मुद्दा केंद्रस्थानी ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. कोल्हापूर शहराचा सर्वांगीण विकास साधायचा असेल.

## काँग्रेसचा १४० वा स्थापना दिवस उत्साहात साजरा
# देशाला आज काँग्रेस विचाराची गरज : सपकाळ

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :
देशात आज जात, धर्म, भाषा व पंथ यावरून समाजा समाजात विभाजन केले जात आहे. सामाजिक सलोखा बिघडवण्याचे काम सत्ताधारी भाजपा सरकार करत आहे. देशासमोर आज मोठे संकट उभे ठाकले असून या परिस्थितीत देशाला तारणारा एकच विचार असून तो काँग्रेसचा विचार, त्याची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या स्थापना दिनानिमित्त पक्ष कार्यालय टिळक भवन येथे झालेल्या कार्यक्रमांत ते बोलत होते. यावेळी सेवादलाचे प्रदेशाध्यक्ष विलास औताडे, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन ॲड. गणेश पाटील, राजन भोसले, सरचिटणीस संदेश कोंडविलकर, श्रीरंग बरगे, जोजो थॉमस यांच्यासह सेवादल व काँग्रेसचे पदाधिकारी तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.



हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, १५ ऑगस्ट १९४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळाले पण व्यवस्था परिवर्तनाची लढाई अद्याप सुरुच आहे. राजसत्ता व धर्मसत्ता मूठभर लोकांच्याच हातात असावी हा भाजपा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विचार असून हा देश सर्वांचा आहे. सत्ता, संपत्तीवर सर्वांचा अधिकार आहे हा काँग्रेस पक्षाचा विचार आहे. काँग्रेसचा विचार संविधानाचा विचार आहे. आपला विचार अध्यात्मिक आहे, जगाच्या कल्याणाचा विचार आहे. तर भाजपाच्या विचारात स्त्री-पुरुष समानता नाही, महिलांना दुय्यम स्थान आहे, स्पृश्य-अस्पृश्यतेचा विचार आहे, या विचाराविरोधात काँग्रेसचा विचार आहे. आपल्या विचाराला त्याग व बलिदानाची परंपरा आहे आणि आपण काँग्रेसचे कार्यकर्ते आहोत याचा अभिमान बाळगा असे सपकाळ म्हणाले.

सपकाळ पुढे म्हणाले की, नुकत्याच पार पडलेल्या नगरपालिका नगरपंचायत निवडणुकीत काँग्रेस पक्षाला ओजस्वी यश मिळाले आहे. सत्ताधारी पक्षाकडे प्रचंड पैसा, प्रशासन, निवडणूक आयोगाची मदत व दडपशाही होती पण त्यासमोर काँग्रेसचा कार्यकर्ता झुकला नाही, दबला नाही तर ताठ मानेने उभा राहिला, हाच बाणा कायम ठेवा. लढेंगे और जितेंगे, असा निर्धार काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केला.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी यावेळी काँग्रेस कार्यकर्त्यांना मनरेगा बचाव अभियानाची शपथ दिली. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (मनरेगा) कोणत्याही किंमतीवर आम्ही संरक्षित करू. मनरेगा ही केवळ शासकीय योजना नसून, भारतीय संविधानाने कल्पिलेल्या रोजगाराच्या हक्काचे मूर्त स्वरुप आहे. आमची प्रतिज्ञा आही की, भारतातील ग्रामीण कामगारांचा सन्मान, रोजगार, न्याय व वेळेवर मोबदला मिळावा यासाठी आम्ही सामुहिक संघर्ष करू. मागणीवर आधारीत रोजगार पद्धत आणि ग्रामसभेची स्वायत्तता आम्ही अबाधित ठेवू. तसेच आम्ही ठरवतो की, मनरेगा मधून महात्मा गांधींचे नाव काढून टाकण्याच्या व कामगारांच्या हक्क व सरकारी दानात रुपांतरीत करण्याच्या प्रयत्नांना आम्ही सर्व लोकशाही मार्गाने विरोध करू.

## आईने केली ६ वर्षांच्या मुलीची हत्या

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २८ :
महाराष्ट्रातील नवी मुंबईतून मन सुन्न करणारी घटना समोर आली आहे. येथे एका आईने आपल्या सहा वर्षांच्या चिमुकल्या मुलीची हत्या केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. पोलिस तपासात समोर आलेल्या बाबी समाजातील मानसिकता, भाषिक दबाव आणि पालकत्वावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्या आहेत. प्राथमिक तपासानुसार, आरोपी महिला मुलगा न झाल्याची खंत आणि मुलगी मराठी बोलू शकत नसल्यामुळे नाराज होती. ती मुलगी केवळ हिंदीतच बोलत होती, यामुळेही आईमध्ये असंतोष होता.

ही घटना कलंबोली परिसरातील आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, ३० वर्षीय आरोपी महिला आपल्या पतीसोबत राहत होती. २३ डिसेंबर रोजी ती आपल्या मुलीला रुग्णालयात घेऊन गेली आणि डॉक्टरांना सांगितले की तब्येतीच्या तक्रारीमुळे मुलगी अचानक बेशुद्ध पडली. मात्र तपासणीनंतर डॉक्टरांनी मुलीला मृत घोषित केले. मृत्यूची परिस्थिती संशयास्पद वाटल्याने रुग्णालयाने तात्काळ पोलिसांना कळवले. सुरुवातीला पोलिसांनी या प्रकरणाची नोंद अपघाती मृत्यू म्हणून केली होती. मात्र शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर सर्वांनाच धक्का बसला. अहवालात मुलीचा मृत्यू नैसर्गिक नसून तिचा गळा आवळून खून करण्यात आल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर पोलिसांनी हत्या प्रकरण दाखल करून आईची कसून चौकशी सुरू केली. पोलिस चौकशीत आरोपी महिलेने आपला गुन्हा कबूल केला. पोलिसांच्या माहितीनुसार, तिने हत्या करण्यामागे तीन प्रमुख कारणे सांगितली. तिला मुलगा हवा होता आणि मुलगी झाल्यामुळे ती मानसिकदृष्ट्या असमाधानी होती. तसेच मुलगी मराठी बोलत नसल्याने आणि केवळ हिंदीच बोलत असल्याने ती चिडचिडी होत होती. याशिवाय आरोपी महिलेवर नैराश्याचे उपचार सुरू होते आणि त्यामुळे ती लहानसहान गोष्टींवरही तीव्र तणावाखाली जात होती. आरोपी महिलेला अटक करण्यात आली असून स्थानिक न्यायालयाने तिला ३० डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

## किरकोळ कारणावरून दोघांना भोसकले

■ महासागर प्रतिनिधी, हिंगोली, दि. २८ :
वसमत येथील शहरपेठ भागात किरकोळ कारणावरून झालेल्या वादानंतर दोघांना खंजीरने भोसकल्याची घटना शनिवारी ता. २७ रात्री घडली आहे. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन जखमींना उपचारासाठी रुग्णालयात हलविले आहे. या प्रकरणी वसमत पोलिसांनी तातडीने मारेकऱ्यांचा शोध सुरु केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वसमत शहरातील शहरपेठ भागात नारायण सर्जेराजे हा त्याची दुचाकी घेऊन गेला होता. यावेळी दुचाकी आणण्याच्या कारणावरून त्याचा त्याच भागातील दोघांसोबत वाद झाला. त्यानंतर नारायण याने त्याचा मित्र गणेश गायकवाड व अन्य एकास बोलावून घेतले. त्यामुळे वाद वाढतच गेला. शाब्दिक चकमकीनंतर हाणामारी सुरु झाली. यामध्ये दोघांनी नारायण व गणेश यांच्या पोटात तसेच पाठीवर खंजीरने वार केले तसेच अन्य एकाच्या डोक्यातही वार केले.

# खंडणी प्रकरणात मराठी अभिनेत्रीला बेड्या

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :
गोरेगाव येथील एका प्रतिष्ठित बिल्डरला 10 कोटी रुपयांच्या खंडणीसाठी ब्लॅकमेल केल्याच्या आरोपावरून खंडणीविरोधी पथकाने अभिनेत्री हेमलता पाटकर उर्फ हेमलता बाणे आणि अमरिना झवेरी यांना बेड्या ठोकल्या आहेत. शनिवारी (27 डिसेंबर) या दोन्ही आरोपींना एस्प्लेनेड न्यायालयात हजर करण्यात आले असता, न्यायालयाने त्यांच्या पोलिस कोठडीत सोमवारपर्यंत वाढ केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार अरविंद गोयल (वय 52 वर्षे) हे गोरेगाव पश्चिम येथील रहिवासी असून ते पेशाने बांधकाम व्यावसायिक आहेत. त्यांच्या मुलावर आंबोली पोलिस ठाण्यात एक फौजदारी खटला दाखल आहे. हा खटला मिटवण्यासाठी आणि मुलाला कायदेशीर त्रासातून वाचवण्यासाठी अभिनेत्री हेमलता पाटकर आणि अमरिना झवेरी यांनी गोयल यांच्याकडे तब्बल 10 कोटी रुपयांची मागणी केली होती. ही रक्कम खंडणी स्वरूपात उकळण्याचा प्रयत्न होत असल्याचे लक्षात येताच अरविंद गोयल यांनी गुन्हे शाखेकडे धाव घेतली.

पोलिसांनी न्यायालयात सादर केलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या अभिनेत्री हेमलता पाटकर (उर्फ हेमलता बाणे, 39 वर्षे) यांचा इतिहास वादग्रस्त आहे. त्यांच्याविरोधात यापूर्वी मेघवाडी पोलिस ठाण्यात मारहाण, बेकायदेशीर प्रवेश आणि शिवीगाळ (कलम 452, 323, 504) यांसारखे गुन्हे दाखल आहेत. तर दुसरी आरोपी अमरिना इक्बाल झवेरी (उर्फ एलिस, 33 वर्षे) हिचाही या खंडणीच्या कटात सक्रिय सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे.

दरम्यान, हेमलता पाटकर यांच्या हस्ताक्षराचे नमुने आणि अमरिना झवेरी यांच्या आवाजाचे नमुने अद्याप गोळा करायचे आहेत. बिल्डरने खंडणीच्या व्यवहाराबाबतचा सविस्तर लेखी पुरावा पोलिसांना सोपवला आहे, ज्याची पडताळणी होणे बाकी आहे. या टोळीने आणखी किती बिल्डर्स किंवा प्रतिष्ठित व्यक्तींना अशा प्रकारे लुटले आहे, याचाही संशय पोलिसांना आहे. मात्र, दोन्ही आरोपी महिला तपासात अजिबात सहकार्य करत नसल्याचे तपास अधिकाऱ्यांनी न्यायालयाला सांगितले.

## सहा जिल्ह्यांतून जाणार
# कल्याण-लातूर जनकल्याण महामार्ग

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २८ :
मुंबई - लातूर प्रवास अतिजलद करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) कल्याण - लातूर जनकल्याण द्रुतगती महामार्ग बांधण्याचा निर्णय घेतला आहे. या महामार्गास राज्य सरकारने हिरवा कंदिल दाखविल्यानंतर एमएसआरडीसीने सरेखनाच्या कामाला सुरुवात केली आहे. सरेखनानुसार हा महामार्ग ठाणे, पुणे,अहिल्यानगर, बीड, धाराशीव आणि लातूर सहा जिल्ह्यांतून जाणार असून या जिल्ह्यांतील अनेक तालुक्यांना महामार्ग जोडणार आहे.

एमएसआरडीसीच्या चार हजार किमी लांबीच्या रस्ते प्रकल्पात कल्याण - लातूर द्रुतगती महामार्ग प्रस्तावित करण्यात आला होता. मात्र अनेक वर्षे हा महामार्ग कागदावरच होता. नागपूर हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या महामार्गासंबंधीचे एक सादरीकरण पाहिल्यानंतर हा महामार्ग तातडीने मार्गी लावण्याची सूचना करून प्रकल्पाला तत्वतः मान्यता दिली. त्यानंतर त्यांनी विधानसभेत या महामार्गाची घोषणा करून त्याच्या अंमलबजावणीचा मार्ग मोकळा केला. या महामार्गाला जनकल्याण महामार्ग असे नाव देण्यात आले आहे.



मराठवाड्याचा, त्यातही लातूरचा विकास साधणारा हा महामार्ग असल्याने याला जनकल्याण नाव दिल्याचे एमएसआरडीसीकडून सांगण्यात आले. दरम्यान, राज्य सरकारच्या मान्यतेनंतर एमएसआरडीसीने सल्लागाराच्या माध्यमातून या महामार्गाच्या सरेखनाच्या कामाला सुरुवात केली.

## तृतीयपंथी उमेदवाराची हत्या

■ महासागर प्रतिनिधी, सोलापूर, दि. २८ :
सोलापूर महानगरपालिका निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर झाले असून 15 जानेवारीला मतदान पार पडणार आहे. या राजकीय धामधुमीत शहरात शांतता राखण्याचे आवाहन प्रशासनाकडून केले जात असतानाच, लष्कर परिसरात एका इच्छुक तृतीयपंथी उमेदवाराची हत्या झाल्याने खळबळ उडाली आहे. अयुब सय्यद असे हत्या झालेल्या उमेदवाराचे नाव असून ते प्रभाग 16 मधून निवडणूक लढवण्याची जय्यत तयारी करत होते. मिळालेल्या माहितीनुसार, अयुब सय्यद यांची हत्या त्यांच्या राहत्या घरात करण्यात आली. प्राथमिक तपासात ही हत्या रात्रीच्या सुमारास धारधार शस्त्राने किंवा गळा आवळून केल्याचा संशय व्यक्त होत आहे.

# सोलापूरमध्ये शरद पवारांच्या राष्ट्रवादीची पहिली यादी जाहीर

■ महासागर प्रतिनिधी,
सोलापूर दि. २८ :
आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीकडून आता उमेदवारांच्या याद्या जाहीर केल्या जात आहेत. सोलापूरमध्ये शरद पवारांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने पहिली यादी जाहीर केली आहे. सोलापूरमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाला 20 जागा मिळाल्या आहेत. पहिल्या यादीत 6 उमेदवारांची घोषणा करण्यात आली असून, यात माजी नगरसेविका सुनीता रोटे यांना पुन्हा संधी देण्यात आली आहे.

सोलापूरमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाकडून प्रभाग क्रमांक 1 ड मधून राकेश मनोहर सोनी यांना उमेदवारी देण्यात आली आहे. प्रभाग क्रमांक 8 अ मधून मोहम्मद नकीब हासीब कुरेशी, प्रभाग क्रमांक 17 क मधून बिस्मिल्ला शिकलकर, प्रभाग क्रमांक 23 अ मधून सुनीता रोटे, प्रभाग क्रमांक 26 अ मधून नागिणी इरकशेट्टी, तर प्रभाग क्रमांक 18 क मधून अंबादास सोमण्णा नडगीरे यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

कॉंग्रेस पक्षाने सोलापूर आणि कोल्हापूर येथील उमेदवारांची यादी जाहीर केली असून कोल्हापुरात 48 तर सोलापूरमध्ये 20 उमेदवारांची पहिली यादी कॉंग्रेसने जाहीर केली होती. मात्र, सोलापूरमध्ये कॉंग्रेसला मोठा धक्का बसला आहे. पहिल्या यादीतील उमेदवाराने थेट एमआयएम पक्षात प्रवेश केला आहे. खासदार प्रणिती शिंदे यांच्या निकटवर्तीय समजल्या जाणाऱ्या फिरदोस पटेल यांनी एमआयएम पक्षात प्रवेश केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.



सोलापूरच्या प्रभाग क्रमांक 16 च्या कॉंग्रेसचे अधिकृत उमेदवार माजी नगरसेविका फिरदोस पटेल यांनी आज एमआयएममध्ये प्रवेश केला आहे. इच्छुकांची मुलाखत घेताना अपमानास्पद वागणूक दिल्याचे कारण फिरदोस पटेल यांनी पुढे केले आहे. एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष फारूख शाब्दि आणि निरीक्षक अन्वर सादात यांच्या उपस्थितीत फिरदोस पटेल यांनी प्रवेश केला आहे. फिरदोस पटेल या कॉंग्रेस खासदार प्रणिती शिंदे यांच्या निकटवर्तीय मानल्या जातात. 2017 मध्ये सोलापूर महापालिकेत त्या निवडून आल्या होत्या.

# पुण्यात शिवसेनेला २५ जागा मिळाव्यात : डॉ. नीलम गोऱ्हे

■ महासागर प्रतिनिधी,
पुणे, दि. २८ :
पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजपने शिवसेनेला किमान २५ जागा द्याव्यात, अशी मागणी शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केली आहे. नुकत्याच झालेल्या नगरपरिषद निवडणुकांमधील विजयाच्या आकडेवारीनुसार शिवसेनेला सरासरी ४७ जागा मिळणे अपेक्षित होते, मात्र सध्या २५ जागांची मागणी करण्यात आली आहे, असे डॉ. गोऱ्हे यांनी स्पष्ट केले. आगामी मनपा निवडणुकीसाठी भाजपसोबत युती करण्याबाबत गेल्या काही दिवसांपासून चर्चा सुरू आहे.



या संदर्भात, मंत्री उदय सामंत यांनी काल रात्री भाजपला २५ वॉर्डांची यादी सादर केली आहे. या यादीवर भाजपने विचार करावा, अशी मागणी शिवसेनेने केली आहे. मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विजय शिवतारे यांच्याशी चर्चा केली असून, ते उदय सामंत यांच्याशीही बोलणार आहेत. वॉर्डनिहाय यादीबाबत शिवतारे, धांगेकर, अजय भोसले आणि आबा बागुल यांच्यासोबत बैठक झाली आहे. या सर्व घडामोडींवर पक्षप्रमुख एकनाथ शिंदे अंतिम निर्णय घेतील.

डॉ. गोऱ्हे यांनी स्पष्ट केले की, नाना भानगिरे हे त्यांच्या खासगी कामामुळे बैठकीतून लवकर निघून गेले होते आणि त्यांच्यात कोणतेही राजकीय मतभेद नाहीत. पक्षाच्या शिस्तीनुसारच सर्व कामकाज सुरू आहे. काही कार्यकर्त्यांची स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याची मागणी असली तरी, हा निर्णय आपल्या हातात नसल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यात महायुतीबाबत ठिकठिकाणी चर्चा सुरू असून, पुण्यात इतर पर्याय काय असतील, याबाबत सध्या काही सांगता येणार नाही. शिवसेना आपले संघटन मजबूत असलेल्या आणि प्रबळ उमेदवार असलेल्या जागांवर निवडणूक लढवणार आहे. पक्षाने स्वतःचा सर्व्हे देखील केला आहे. युती चर्चेला वेळ लागला म्हणजे अन्याय झाला असे होत नाही, असेही त्यांनी नमूद केले. कार्यकर्त्यांनी पक्षाचे नियम आणि शिस्त पाळावी, असे आवाहन डॉ. गोऱ्हे यांनी केले.





# ॲग्रोटेक २०२५ : कृषी गंगोत्रीमध्ये प्रदर्शित कालसुसंगत अत्याधुनिक कृषि तंत्रज्ञान ठरतंय लक्षवेधी !

## शेतकरी बांधवांचा ॲग्रोटेकला उदंड प्रतिसाद!

■अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :
गरजेनुरुप व काल सुसंगत अशा कृषी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतकरी बांधवांच्या निकडींची पूर्तता करून त्यांना शेती व्यवसायात ऊर्जितावस्था प्राप्त होण्यासाठी सदैव तत्पर असणाया आणि विदर्भातील शेतकरी केंद्रबिंदू असलेल्या डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, कृषी विभाग महाराष्ट्र शासन व कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन प्रकल्प (आत्मा) यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय कृषि क्रांतीचे प्रणेते, कृषी रत्न आणि स्वतंत्र भारताचे प्रथम कृषि मंत्री, महामानव आदरणीय डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंती उत्सवानिमित्त कृषी विद्यापीठाच्या क्रीडांगनावर आयोजित करण्यात आलेल्या व काल दि. २७ डिसेंबर २०२५ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटीत झालेल्या शाश्वत शेती समृद्ध शेतकरी संकल्पना प्रत्यक्षात साकारण्यासाठी अत्याधुनिक कृषि तंत्रज्ञानाचा पुरस्कार करणाऱ्या भव्य अश्या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन ङ्गअँग्रोटेक २०२५ ला शेतकरी बांधव, महिला शेतकरी, ग्रामीण तरुण व





विद्यार्थांचा लक्षवेधी प्रतिसाद लाभत आहे.

कृषिप्रधान अर्थव्यवस्था असलेल्या भारताची बहुतांश लोकसंख्या उपजीवीकेसाठी शेती अथवा शेतीधारित व्यवसायांवर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे अवलंबून आहे. सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या देशातील जनतेचे उदरभरणासह सर्वांगीण पोषणासाठी सकस आहार उपलब्ध करण्यामध्ये कृषी शास्त्रज्ञानी लक्षणीय यश प्राप्त केल्याचे सर्वश्रुत आहे. देशात कृषी तंत्रज्ञानाने घेतलेल्या प्रगतीची झेप बघता भविष्यात जमीनीशिवाय, अल्प मनुष्यबळात कौशल्याधारित शेती व्यवसाय दृष्टिक्षेपात येत आहे. यांत्रिकीकरणाचा पुरस्कार करीत आता जमिनीच्या मशागतीपासून तर थेट पक्कामाल ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यात यंत्रांची मदत घेण्यात येत आहे. संगणक नियंत्रित सिंचन प्रणाली, ड्रोन फवारणी तंत्र, अपारंपरिक उर्जा स्त्रोतांचा प्रभावी वापर, उपग्रहाचे माध्यमातून अचूक हवामान अंदाज, अत्याधुनिक, स्वयंचलित शेती अवजारे व साठवणुकीसाठी शीत साखळी ची निर्मिती, समूह शेतीची/ गट शेतीची वाढत चाललेली व्याप्ती, नैसर्गिक व सेंद्रिय शेतीप्रती वाढता कल, एकात्मिक पिक तथा अन्नद्रव्य व्यवस्थापन, कृषी विद्यापीठाद्वारे विविध सामाजिक संस्थांच्या सहयोगाने मोबाईल संदेश, टीव्ही, रेडीओ, इंटरनेट चा वापर करीत प्रयोगशाळेत विकसीत झालेले तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या बांधावर वेळेत आणि विनासायास पोहोचविण्यात येत आहे. डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ संशोधित काल सुसंगत कमी खर्चाचे, फायदेशीर कृषी तंत्रज्ञानाचे सर्व समाज घटकांना एकाच जागी अवलोकन करता यावे, सोबतच शेती शाश्वत आणि शेतकरी समृद्ध करण्यासाठी आपले क्रियाशील योगदान देणाऱ्या विविध शासकीय, निम शासकीय, सार्वजनिक संस्था, खाजगी कंपन्याची उत्पादने प्रत्यक्ष हाताळता यावीत आणि शेतकरी बांधवांच्या शंकांचे निराकरणही व्हावे या उदात्त उद्देशाने अग्रोटेक २०२५ या राज्यस्तरीय भव्य कृषि प्रदर्शन, कृषि महोत्सव व चर्चा सत्राचे त्रीदिवसीय आयोजन करण्यात आले आहे.

## थोडक्यात

### रेल्वेच्या आरक्षण चार्ट नियमात बदल

**अकोला :** रेल्वे प्रवाशांच्या सोयीसाठी आणि प्रवासाच्या नियोजनातील अनिश्चितता दूर करण्यासाठी रेल्वे बोर्डाने आरक्षण चार्ट तयार करण्याच्या वेळेत महत्त्वपूर्ण बदल केला आहे. सध्या रेल्वेगाडी रवाना होण्याच्या आठ तास आधी तयार केला जाणारा पहिला आरक्षण चार्ट आता ३० डिसेंबर २०२५ पासून दहा तास आधी तयार करण्यात येणार आहे. मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागामार्फत यासंदर्भात अधिकृत सूचना जारी करण्यात आली असून, सर्व प्रवासी गाड्यांसाठी हा नवीन नियम अनिवार्य असेल. या बदला मुळे विविध लोकेशन्सवरील रिमोट आरक्षण केंद्रांवरील मॅन्युअल चार्ट तयार करण्याचे वेळापत्रकही नव्याने निश्चित करण्यात आले आहे. दरम्यान, दुसरा आरक्षण चार्ट तयार करण्याच्या सध्याच्या नियमात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. प्रवाशांना त्यांच्या तिकिटांच्या स्थितीबाबत वेळेत स्पष्टता मिळावी आणि आरक्षण प्रक्रियेत अधिक पारदर्शकता यावी, या उद्देशाने रेल्वे प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.

### महापालिकेत सहाय्यक नगररचनाकाराची तडकाफडकी बदली

**अकोला :** महापालिकेच्या नगररचना विभागात गेल्या २५ वर्षांपासून कार्यरत असलेले सहाय्यक नगररचनाकार संदीप गावंडे यांची कोणतीही पूर्वसूचना किंवा ठोस कारण नसताना प्रशासनाने अचानक मालमत्ता विभाग प्रमुख म्हणून बदली केल्याने महापालिका वतुर्ळात मोठे आश्चर्य व्यक्त केले जात आहे. महापालिकेत नगररचना विभागाची दोन पदे मंजूर असून, कामाच्या सुलभतेसाठी दोन्ही अधिकाऱ्यांकडे प्रत्येकी दोन झोनची जबाबदारी सोपवण्यात आली होती, ज्यामुळे नकाशा मंजुरीसह इतर तांत्रिक कामे जलद गतीने पूर्ण होत होती. मात्र, गावंडे यांच्या बदलीमुळे आता एकाच सहाय्यक नगररचनाकारावर शहरातील सर्व चारही झोनच्या कामाचा अतिरिक्त भार पडला आहे. विशेष म्हणजे, नगररचना विभागातील ही महत्त्वाची पदे सरळसेवा किंवा पदोन्नतीने भरणे अपेक्षित असताना आणि सहाय्यक नगररचनाकार हे पद प्रतिनियुक्तीवर घेता येत नसतानाही, कार्यरत असलेल्या अनुभवी अधिकाऱ्याची अशा प्रकारे बदली करण्यामागे नेमका हेतू काय, असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.

**CHANGE IN NAME**
I Have Change My Name in My Old Passport My Passport No is (J7756161)
----OLD NAME---
**SHRUTI KHANDELWAL**
----NEW NAME----
**SHRUTI AJAYKUMAR KHANDELWAL**
My Residential Address is :- Shreenath Society Om Shreya Gaurakshan Road Akola Maharashtra 444001

## डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार वितरणाचा शानदार सोहळा संपन्न



■अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :
भारताचे कृषिमंत्री डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कारांचा वितरण सोहळा आज स्थानिक नेहरू पार्क परिसरात उत्साहात संपन्न झाला. समाजात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या १५ मान्यवरांचा या सोहळ्यात सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर तर प्रमुख अतिथी म्हणून शेतकरी नेते तथा ' सिफा ' व ' इलना चे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश पोहरे, शेतकरी नेते भाई प्रदीप देशमुख, प्रख्यात लेखिका लीलाताई शिंदे, साधनाताई पोहरे, छत्रपती शिवाजी महाराज लोक विद्यापीठाचे कुलगुरू प्रकाश घवघवे, महासंचालक मंगेश देशमुख उपस्थित होते. विचार मंचावर उपस्थित असलेले व या सोहळ्याचे आयोजक बी. एस. देशमुख व श्रीमती इंदुताई देशमुख यांनी अतिथींचे स्वागत केले. प्रारंभी अतिथींच्या हस्ते दीप प्रज्वलन करून राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, पंडित जवाहरलाल नेहरू व डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. या सत्कार सोहळ्याचे आयोजक बी. एस. देशमुख यांनी मागील १५ वर्षापासून हा पुरस्कार वितरण सोहळा सुरू केला असून आज पर्यंत त्यांनी समाजात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शेकडो लोकांचा गौरव केलेला आहे.

- प्रकाश पोहरे यांना 'अकोला भूषण 'पुरस्कार प्रदान
- १५ मान्यवरांचा पुरस्कारासह सत्कार

## ज्येष्ठ मतदारांना घरून मतदानाची सुविधा नाकारली

■अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :
आगामी १५ जानेवारी रोजी होणाऱ्या महापालिका निवडणुकीसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली असतानाच, ज्येष्ठ मतदारांबाबत घेतलेल्या एका निर्णयामुळे शहरात संतापाची लाट उसळली आहे. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत ८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना घरून मतदान करण्याची विशेष सवलत देण्यात आली होती. मात्र, आगामी महापालिका निवडणुकीत ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. त्यामुळे वयोवृद्ध मतदारांना आता शारीरिक व्याधी आणि वाढत्या वयाचा विचार न करता स्वतः मतदान केंद्रावर हजेरी लावावी लागणार आहे. शहरातील विविध इमारतींमध्ये ही मतदान केंद्रे उभारली ज णार आहेत. ८५ वर्षांवरील अनेक मतदारांना चालणे किंवा घराबाहेर पडणे कठीण असते, ही बाब लक्षात घेऊनच विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत निवडणूक आयोगाचे कर्मचारी थेट मतदारांच्या घरी पोहोचून त्यांचे मतदान करून घेत असत.

## अकोला पोलीसांची खुल्या जागेत दारू पिणाऱ्या ५४ इसमांविरूध्द कारवाई



■अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :
जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, तसेच नागरिकांना सुरक्षित आणि शांततामय वातावरण मिळावे त्याकरीता मा. पोलीस अधिक्षक श्री अर्चित चांडक यांनी जिल्हयात आकस्मीक नाकाबंदी चे आयोजन करून सार्वजनीक ठिकाणी दारू पिणाऱ्या इसमांवर कडक कारवाईची मोहिम हाती घेतली आहे.सदर नाकाबंदी दरम्यान पोलिस विभागाच्या वतीने दिनांक २७.१२.२०२५ चे १८.०० वा ते २४.०० पावेतो आकस्मीक नाकाबंदीचे आयोजन करून तसेच विशेष पथके तयार करून सार्वजनीक ठिकाणी दारू पिउन गोंधळ घालणे, शांतता भंग करणाऱ्या व कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या ५४ इसमांवर मुंबई पोलीस अधिनियम अंतर्गत कार्यवाही करण्यात आली. तसेच संपुर्ण जिल्हयात नाकाबंदी राबवुन, नाकाबंदी दरम्यान जिल्हयातील एकुण ४६ नाकाबंदी पॉईट वर १४०२ वाहने चेक करून मोटार वाहन कायदयान्वये २४० कारवाई करून १,२२,७५०/-रू चा दंड आकरण्यात आला आहे.

नाकाबंदी दरम्यान सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी नाकाबंदीच्या ठिकाणी भेटी दिल्या तसेच सर्व ठाणे प्रभारी अधिकारी यांनी नाकाबंदी मध्ये सक्रीय सहभाग घेवुन प्रभावी नाकबंदी करण्यात आली आहे.अशा प्रकारच्या बेकायदेशीर कृत्यांपासून नागरीकांनी दूर राहावे आणि कोणतीही अनुचित घटना घडल्यास तत्काळ पोलीस नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा. अकोला पोलिसांकडून अशा प्रकारचे विविध प्रतिबंधक उपयोजना अधिक तीव्रतेने राबवुन, कायदा मोडणाऱ्यांवर कोणतीही सहानुभूती दाखवली जाणार नाही. करीता सर्व नागरिकांनी कायद्याचे पालन करावे आणि शहराच्या शांततेत योगदान द्यावे व नागरिकांच्या सहकाऱ्यानेच शहरात शांतता व सुव्यवस्था राखली जाऊ शकते, असे आवाहन मा. पोलीस अधीक्षक, अकोला यांनी केले आहे.

## शहापूर रुपागड येथील इसमावर वन्यप्राण्यांचा हल्ला

### शेतकरी,शेतमजूर,व ग्रामस्थांची वन्य प्राण्यांचा कायमचा बंदोबस्त करण्याची मागणी

■अकोट,दि २८ (प्रतिनिधी) :
अकोट तालुक्यातील सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेल्या शहापूर,रुपागड,येथे वन्यप्राण्यांच्या मुक्तसंचार दिवसेदिवस वाढत चालला असून येथे शेतकरी,शेतमजूर,यांच्यामध्ये भीतीचे वातावरण पसरले असून दहशत निर्माण झाली आहे.या परिसरात आता पर्यंत सलग एका पाठोपाठ तीन,चार,घटना घडल्या आहेत.

अशातच आज सकाळी ९ वाजताच्या सुमारास हुसेन मैताब सुरत्ने राहणार जितापुर वय ४८ वर्ष हे भिल गावठाण येथे लागुनच असलेल्या शेत शिवारात कामाला जात असताना वाघाणे त्यांच्यावर अचानक हल्ला चढविल्याची घटना घडली.यामध्ये त्यांना हाताला,पायाला,व तोंडावर,जखमा झाल्या आहेत.वन्य



प्राण्याने हल्ला चढविल्याची माहिती मिळताच पोपटखेड येथील एकलव्य बचाव पथकाचे प्रमुख पांडुरंग तायडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी ताबडतोब धाव घेत त्यांना ग्रामीण रुग्णालय अकोट येथे आणले व त्यांच्यावर उपचार सुरू केले.या घटनेची माहिती कळताच वनविभागाचे कर्मचारी,अधिकारी,यांनी ग्रामीण रुग्णालयात धाव घेतली.व घटना स्थळाची पाहणी करून नेमका हल्ला कोणत्या प्राण्यांनी चढवला याची पाहणी करण्यात येईल अशी माहिती दिली.याचदरम्यान बेलुरा गावचे सरपंच राम मंगळे यांनी सुध्दा ग्रामीण रुग्णालयात धाव घेतली व हल्ला चढविलेल्या हुसेन सुरतने यांची पाहणी करून त्यांना विचारपूस केली व घटने संदर्भात वनविभागाने तातडीने दखल घ्यावी व होत असलेल्या वारंवार हल्ले बाबत वन्यप्राण्यांचा कायमचा बंदोबस्त लावावा.अशी जोरदार मागणी केली.अन्यथा सर्व परिसरातील शेतकरी,शेतमजूर,व ग्रामस्थांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा

## मनुताई कन्या शाळा गाईड पथकाने गिरविले शिस्त सहकार्य स्वावलंबन व देश सेवेचे धडे

■अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :'तयार राहा 'असे ब्रीदवाक्य असलेली गाईड चळवळ. या गाईड चळवळी अंतर्गत विद्यार्थ्यांचा शारीरिक, बौद्धिक विकास साधता यावा या उदात्त हेतूने मनू ताई कन्या शाळा येथे गाईड शिबिर संपन्न झाले. गाईड शिबिराची सुरुवात शाळेच्या आदरणीय मुख्याध्यापिका सौ धारस्कर यांच्या हस्ते गाईड ध्वजारोहणाने करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये निष्ठा, विनयशीलता, नेतृत्व गुण, सामाजिक जबाबदारी, स्वावलंबन, निसर्गाशी असलेला संबंध आणि जीवन कौशल्य विकसित व्हावे याकरता शिबिरामध्ये गाईडचे नियम, गाईडची प्रार्थना आणि शिस्तीचे महत्व समजवून क्रीडा, हस्तकला, पाककला यासारख्या क्रिया कलापांद्वारे विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. तसेच तंबू उभारणे, शिबिर परिसर स्वच्छ ठेवणे यांचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. प्रथमोपचार, दोरीच्या गाठी, नकाशाचा वापर यांचे प्रशिक्षण सुद्धा देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा याकरता शिबिरादरम्यान शेकोटीचा कार्यक्रम घेण्यात आला यामध्ये नृत्य गायनाद्वारे विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. शिबिराच्या शेवटी अन्न हे पूर्णब्रह्म असून ते कसे ग्रहण करावे याबाबतचे धडे देत विद्यार्थी शिक्षण व शिक्षकेतर कर्मचारी यांनी एकत्रितपणे सहभोजनाचा आनंद घेतला.

## सृजनशील परिवर्तनासाठी युवक शक्तीने पुढे येण्याची गरज

- युवक युवती संमेलनातील मान्यवरांचा सूर
- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतीथी महोत्सवाचा सर्व संतस्मृती पुण्य स्मरण ने समारोप

■अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :
समाज व राष्ट्र बदलण्याची अभूतपूर्व शक्ती ही युवा विश्वात समाविष्ट आहे. युवक हे देशाचे भक्कम आधारस्तंभ असून देशाला विलक्षण कलाटणी देण्याची शक्ती या युवाशक्तीत आहे. मात्र आजची प्रचलित युवाशक्ती ही भरकटलेली असून दिशाहीन होत आहे. अशा युवाशक्तीला नैतिक अधिष्ठान देण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सारख्या तत्त्ववेत्यांची खरी गरज असून ही गरज अश्या वैचारिक महोत्सवाच्या माध्यमातून पूर्ण होत असल्याचा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला. स्थानीय जिल्हा परिषद कर्मचारी भवनात सुरू असलेल्या वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या ५७ व्या पुण्यस्मरण महोत्सवात रविवारी युवक युवती संमेलन विचारशील माध्यमातून संपन्न झाले. युवा विचार प्रवर्तक सचिन बुरघाटे यांच्या अध्यक्षतेत संपन्न या संमेलनात पाहुणे




म्हणून शेतकरी नेते प्रकाश पोहरे,हभप ज्ञानेश्वर महाराज वाघ, प्रा नितीन बाठे, धनंजय मिश्रा, प्रा ममता इंगोले, सौ उज्वला देशमुख, शिवाजी ठाकरे, वक्ते,प्रा स्वप्निल इंगोले, डॉ आरतीलता देशमुख, डॉ दिपाली सोसे, डॉ नंदाताई आखरे, वैशाली सावळे, रेहाना शेख, चित्रा काकड ,वर्षा म्हैसने, डॉ राम उपाध्याय, प्रदीप गिरे, मुकेश वाकोडे आदी उपस्थित होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमापूजन व मान्यवरांच्या स्वागताने या संमेलनाचा प्रारंभ करण्यात आला. यावेळी मान्यवर युवक वक्त्यांनी राष्ट्रसंतांच्या वैचारिक प्रबोधनाचा आपल्या वक्तव्यात वहापोह करीत युवाशक्ती वर आपले विचार व्यक्त केले. संतांची महिमा विशद करीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे खऱ्या अर्थाने कर्मयोगी संत असल्याचे सांगितले शेतकरी नेते प्रकाश पोहरे यांनी आपल्या मार्गदर्शनात कर्जबाजारी कास्तकार व कृषी क्षेत्राच्या पीछेहाटीचे अनेक कारणे प्रतिपादित केले मोडकळी झालेल्या कृषी निधी व कास्तकारीला जीवनावश्यक वस्तूचा कायदा कारणीभूत असल्याचे त्यांनी सांगितले. केंद्र शासनाचे अन्न आयात निर्यात धोरण हे कास्तकारांच्या आर्थिक कमजोरी ला पोषक ठरले आहे पोरे पुढे म्हणाले तुकडोजी महाराज यांनी आपल्या ग्रामगीता ग्रामव्यवस्थेच्या बदलाचे अनेक संकेत दिले आहेत ग्राम व्यवस्था हे सुरळीत राहिली पाहिजे यासाठी ग्रामीण क्षेत्रात ग्राम गीतेची गरज असल्याचे त्यांनी सांगितले प्राध्यापक स्वप्निल इंगोले यांनी कास्तकारांच्या आत्म हत्येच्या संदर्भात वहापोह केला हा देशाला जडलेला कर्करोग असल्याचे त्यांनी सांगितले राष्ट्रसंतांनी आपल्या ग्रामगीतेत कृषीनीतीचा मोठ्या प्रमाणात ऊहापौर केला आहे तुकडोजी महाराजांनी देशाला प्रश्न विचारलेले आहेत हा देश केवळ मातीचा तुकडा नसून याच्यासाठी आम्ही मरणा सहित तयार असल्याचे महाराज सांगतात तरुणांना सशक्त विचार देण्यासाठी असे युवक युवती संमेलन ही काळाची गरज असल्याचे प्राध्यापक स्वप्निल इंगोले यांनी यावेळी सांगितले.



# वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा ५७ वा स्मृतीस्मरण सोहळा मुर्तीजापुरात संपन्न

## अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या मार्गदर्शनाखाली संत स्मृतिदिन कार्यक्रम, शोभायात्रा व राष्ट्रीय कीर्तनांनी उपस्थितांचे मन भारावून टाकले

**▪मुर्तिजापुर,दि २८ (प्रतिनिधी) :**
मुर्तीजापुर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज उद्यान टेलिफोन कॉलनीत वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा ५७ वा स्मृतीस्मरण सोहळा संपन्न झाला. हा कार्यक्रम अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज आश्रम मोझरी व तालुका समितीच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. मा. आमदार हरीश पिंपळे यांच्या प्रयत्नातून कार्यक्रमासाठी कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून दिली गेली.

सकाळी साडेपाच वाजता तीर्थ स्थापना व ध्यान कार्यक्रम ग्रामगीताचार्य निळकंठ हळदे महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु झाले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज स्मारकावरून शोभायात्रा काढण्यात आली, जी मेन रोड मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज उद्यानापर्यंत पोहोचली. कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार भैय्यासाहेब तिडके होते, तर उद्घाटक म्हणून आमदार हरीश पिंपळे उपस्थित राहिले.

समाजसेवक संगीत भाऊ कांबे, तालुका सेवा अधिकारी बबनराव देशमुख, श्रीकृष्ण बोळे, विष्णू लोडम, गिरीधर भोंडे, गोवर्धन पाथरे, गजानन सोनेकर





व इतर उपस्थित समाजसेवकांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन झाले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगे महाराज व डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. तसेच अनेक नवविध निर्वाचित नगरसेवक व सामाजिक कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात आला.दुपारी राष्ट्रीय कीर्तन श्री गणेश महाराज चांदेकर (यवतमाळ) यांनी सादर केले. त्यांनी आपल्या कीर्तनातून राष्ट्रसंतांचे विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्व अधोरेखित केले. पुण्यस्मरण कीर्तनात जिल्हा सेवा अधिकारी, प्रचार प्रमुख, विविध भजन मंडळांचे सदस्य व नागरिक सहभागी झाले. यावेळी श्री वारकरी गुरुदेव सेवा महिला मंडळ हातगाव, लक्षेश्वर गुरुदेव सेवा मंडळ लाखपुरी, पारदेश्वर गुरुदेव महिला मंडळ टेलीफोन कॉलनी, गजानन महाराज महिला भजन मंडळ प्रतीक नगर, शारदा महिला मंडळ टेलीफोन कॉलनी इत्यादी मंडळ उपस्थित होते.

भोजनाची सोय आजीवन अन्नदाते संगीत भाऊ कांबे यांच्या, तर पाणी व्यवस्थेची सोय समाजसेवक विलास वानखडे यांच्या मार्फत करण्यात आली. कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन विष्णू लोडम यांनी केले, तर आभार उत्तमराव पिंजरकर यांनी मानले.हा सोहळा राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या कार्याचा सतत गौरव करत मुर्तीजापुर परिसरात त्यांच्या विचारांची प्रेरणा पसरविण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरला आहे.

# मंडळाच्या उपक्रमातून सामाजिक बांधिलकीची जोपासना : पालकमंत्री ॲड.आकाश फुंडकर

**▪अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :**
कलाल समाज मंडळाने सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रमांच्या माध्यमातून समाजासाठी आदर्शवत कार्य उभे केले आहे. समाजातील प्रेरणादायी कार्य करणाऱ्या सेवाव्रतींचा सन्मान त्यांचे आयुष्य महत्त्वपूर्ण संदेश देणारे आहे, असे प्रतिपादन राज्याचे कामगार मंत्री तथा पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी आज केले.ते अकोला जिल्हा कलाल समाज मंडळ, द्वारा आयोजित कलाल समाज मेळाव्यात बोलत होते.यावेळी खासदार अनुप धोत्रे,शल्य चिकित्सक, अमरावती




डॉ.आशिष डगवार,भागवताचार्य श्री ज्ञानेश्वर महाराज वाघ,केंद्रीय कलाल समिती अध्यक्ष सुनिल खराटे,उद्योजक राजेंद्र जयस्वाल,केंद्रीय कलाल महिला समिती अध्यक्षा सुनितताई बावनेर,विजय लोहकपुरे,भैय्यासाहेब उजवणे कलाल समाज मंडळ पदाधिकारी,सदस्य समाज बांधव उपस्थित होते.पालकमंत्री श्री. फुंडकर म्हणाले की, समाजातील युवकांनी नवीन काळाची पावले ओळखून आधुनिक शिक्षण, उद्योग आणि व्यवसायाकडे वाटचाल करावी.समाज मेळाव्याच्या माध्यमातून सुसंवाद साधला जातो त्यामुळे अशा प्रकारचे मेळावे होणे गरजेचे आहेत.मेळाव्यात समाजातील ज्येष्ठ सेवाव्रती, उद्योजक, अधिकारी, गुणवंत विद्यार्थी यांच्यासह विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यात आले.

# माळी समाजाच्या राज्यस्तरीय वधु वर परिचय मेळाव्यामध्ये ५३८ युवक युवतीने दिला परिचय




**▪अकोला,दि २८ (प्रतिनिधी) :**
परिचय मेळावा काळाची गरज सुभाष भवाने . माळी समाज सेवा बहुउद्देशीय मंडळाच्या वतीने माळी समाजाच्या राज्यस्तरीय वधु वर परिचय मेळावा यावर्षी दिनांक २८ डिसेंबर २०२५ रोजी स्थानिक खडकी येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पटांगणाच्या बाजूला सकाळी १० ते ६ वाजेपर्यंत मोठ्या उत्साहात संपन्न झाला, सर्वप्रथम क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले सावित्रीबाई फुले संत सावता माळी यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. समाजातील युवा इच्छुक मुलांनी मुलींची चौदाशे नोंदणी झाली होती.वेळेवर सुद्धा तीनशे नोंदणी झाले. मान्यवरांचे स्वागत क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले त्याचा सावित्रीबाई फुले यांच्या फोटो देऊन करण्यात आला राज्यभरातून १४ ते १५ हजार लोक या कार्यक्रमांमध्ये सहभागी झाले होते.कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसंगी मेळाव्याच्या अध्यक्ष सुभाष भवाने यांनी वेळ श्रम व पैसा वाचवण्यासाठी असे वधू वर परिचय मेळावे होणे काळाची गरज असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमाला प्रामुख्याने प्रमुख अतिथी म्हणून माजी जिल्हा परिषद अध्यक्षा सौ संगीता ताई अढाऊ वित्त मंत्रालयातील वरिष्ठ कक्षा अधिकारी श्री प्रशांत वानखडे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रकाश तायडे मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष शत्रुघन बिडकर भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष जयंत मसने ओबीसीचे नेते एडवोकेट संतोष हुसे ओबीसी महामोर्चाचे प्रदेश कार्याध्यक्ष एडवोकेट संतोष रहाटे जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष एडवोकेट महेश गणगणे प्रा ललित टूटोरियल्सचे संचालक ललित काळपांडे संस्थेचे अध्यक्ष डॉ वामनराव वानखडे मेळावा अध्यक्ष सुभाष भवाने मेळावा कार्याध्यक्ष सुरेंद्र आरेकर शंकररावजी गिरे जिल्हा उपनिबंधक अधिकारी प्रवीण लोखंडे धनंजय शिरस्कार दीपक बोचरे तुकाराम खडके गजेंद्र काळे मनिष हिवराळे विनोद पाटील समता परिषद जिल्हाध्यक्ष गजानन मसने आशिष ढोमणे सचिव संदीप खडके सहसचिव संदीप गिरे प्रवीण अत्तरकार उमेश मसने प्रशांत फुलारी देवेंद्र इंगळे लक्ष्मण निखाडे प्रमोद ढोमणे डॉक्टर समता लोखंडे याप्रसंगी व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद पाटील इंगळे प्रा सौ ज्योतीताई पाटील इंगळे कुमारी साक्षी गजेंद्र काळे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक माजी प्राचार्य गजेंद्र काळे आभार प्रदर्शन मेळाव्याचे माजी अध्यक्ष मनिष हिवराळे यांनी केले.

# पातुर आठवडी बाजारात अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळून खळबळ

**▪पातूर,दि २८ (प्रतिनिधी) :**
पातुर येथील आठवडी बाजार परिसरात आज सकाळच्या सुमारास एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. बाजारात ये-जा करणाऱ्या नागरिकांना संशयास्पद अवस्थेत मृतदेह दिसून आल्यानंतर तात्काळ याबाबत पोलिसांना माहिती देण्यात आली.मृत व्यक्तीच्या अंगावरील कपड्यांमध्ये मिळालेल्या आधार कार्डवरून सदर व्यक्तीचे नाव गजानन मोतीराम खत्री असे असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होत आहे. मात्र मृत व्यक्तीचे वय, मूळ गाव व मृत्यूचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही.

या घटनेची माहिती मिळताच पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी योगेश गेडाम घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला असून पुढील तपासासाठी मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे.सदर मृत्यू नैसर्गिक आहे की अपघाती अथवा अन्य कोणत्या कारणामुळे झाला आहे, याबाबत शवविच्छेदन अहवालानंतरच स्पष्ट होणार आहे. दरम्यान, या घटनेमुळे आठवडी बाजार परिसरात नागरिकांमध्ये



भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, सदर व्यक्तीबाबत कोणास अधिक माहिती असल्यास त्यांनी तात्काळ पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

# गुरुदेवांचा विचारजागर : अकोल्यातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी महोत्सव–श्रद्धेचा नव्हे, परिवर्तनाचा उत्सव

आजचा समाज दिशाहीन झाला आहे. धर्म आहे, पण विवेक नाही. श्रद्धा आहे, पण सामाजिक बांधिलकी नाही. उत्सव आहेत, पण आत्मचिंतन नाही. अशा काळात ज्या संताचे विचार केवळ देवळात नाहीत, तर गावात, समाजात, श्रमात आणि राष्ट्रनिर्मितीत उतरलेले आहेत, त्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची पुण्यतिथी ही केवळ धार्मिक सोहळा न राहता सामाजिक जागृतीचा रणशिंग ठरते. अकोला येथे दिनांक २७ २८ डिसेंबरला साजरा होणारा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा ५७ वा पुण्यतिथी महोत्सव हेच अधोरेखित करून गेला.मोझरीच्या पवित्र भूमीनंतर जर कुठे गुरुदेवांची पुण्यतिथी भव्य, व्यापक आणि विचारप्रधान स्वरूपात साजरी होत असेल, तर ते ठिकाण म्हणजे अकोला. गेली वीस वर्षे सातत्याने, कोणताही दिखावा न करता, कोणत्याही राजकीय स्वार्थाविना, गुरुदेवांच्या विचारांना केंद्रस्थानी ठेवून हा महोत्सव साजरा केला जातो, ही बाब आजच्या काळात अपवादात्मक म्हणावी लागेल.

पालखी म्हणजे केवळ परंपरा नव्हे, तर विचारांची मिरवणूकया पुण्यतिथी महोत्सवाची सुरुवात सकाळी राजा राजेश्वर मंदिरातून निघालेल्या पालखी सोहळ्याने झाली. ही पालखी म्हणजे केवळ लाकडी चौकट नव्हे; ती होती ग्रामगीतेतील विचारांची, श्रमसंस्कृतीची, स्वच्छतेच्या संकल्पांची आणि सामाजिक समतेच्या संदेशांची चालती-बोलती घोषणा.पालखी शहरातील प्रमुख मार्गांवरून फिरताना, ढोल-ताशांचा नाद, लेझीमचा ताल, भजनांचा गजर आणि गुरुदेवांच्या जयघोषाने अकोल्याच्या रस्त्यांवर क्षणभर का होईना, पण आधुनिक बाजारू संस्कृतीचा गोंगाट थांबून विवेकाचा आवाज घुमू लागला.



विविध भजनी मंडळे, ढोल पथके, लेझीम पथके, महिला मंडळांचा उस्फूर्त सहभाग हे दर्शवत होता की गुरुदेवांचा विचार आजही लोकांच्या रक्तात आहे, फक्त त्याला दिशा देण्याची गरज आहे.कर्मचारी भवनात विचारांची मशाल पेटलीपालखी सोहळ्यानंतर कर्मचारी भवन आकाशवाणी परिसर येथे पुण्यतिथी महोत्सवाचा मुख्य कार्यक्रम पार पडला. उद्घाटनप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी केलेले मार्गदर्शन म्हणजे कोरडी भाषणे नव्हती, तर आजच्या समाजाला आरसा दाखवणारी परखड वैचारिक मांडणी होती.ङ्गगुरुदेवांना केवळ संत म्हणून पूजून चालणार नाही, तर त्यांच्या विचारांवर चालावे लागेल,ङ्ख हा संदेश वारंवार अधोरेखित करण्यात आला. ग्रामगीतेतील स्वच्छता, श्रमप्रतिष्ठा, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन, स्वावलंबन आणि राष्ट्रभक्ती – हे सारे विषय आजही तितकेच ज्वलंत आहेत. प्रश्न एवढाच आहे की, आपण गुरुदेवांचे फोटो मिरवतो की विचार अंगीकारतो?

भजन-कीर्तन : करमणूक नव्हे, तर वैचारिक शस्त्रआज अनेक ठिकाणी भजन-कीर्तन हे केवळ करमणुकीचे साधन बनले आहे. पण अकोल्यातील या पुण्यतिथी महोत्सवात सादर झालेली भजने ही मनोरंजनासाठी नव्हे, तर अंतर्मन हलवण्यासाठी होती. विविध भजन मंडळांनी गुरुदेवांच्या रचनांतून समाजाला प्रश्न विचारले –

गाव स्वच्छ आहे का?

व्यसनमुक्ती आहे का?

श्रमाला प्रतिष्ठा आहे का?

माणूस माणसाशी माणूस म्हणून वागतो आहे का?

ही भजने म्हणजे संथ तालात दिलेला सामाजिक जाब होता. आणि तो जाब आजच्या सुस्त समाजाला आवश्यक आहे.पुरस्कार म्हणजे सन्मान नव्हे, तर जबाबदारी या महोत्सवात सामाजिक व धार्मिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. पण हा सन्मान म्हणजे माळ घालून फोटो काढण्यापुरता मर्यादित नव्हता. तो होता ङ्गतुमचे काम गुरुदेवांच्या विचारांशी सुसंगत आहेङ्ख याची समाजमान्य पावती.आज पुरस्कारांची चलती आहे. पण बहुतांश पुरस्कार हे ओळखीवर, राजकारणावर किंवा प्रसिद्धीवर दिले जातात. अशा काळात गुरुदेवांच्या पुण्यतिथीला दिले जाणारे पुरस्कार हे कामाच्या गुणवत्तेवर आधारित असणे, ही गोष्ट समाजासाठी दिशादर्शक ठरते. हजारो गुरुदेव भक्त या कार्यक्रमाला उपस्थित राहुन या कार्यक्रमाचा आस्वाद घेत आहेत अनेकांना आपल्या कला सादर करण्यासाठी व्यासपीठ मिळालेले आहे. खऱ्या अर्थाने बुद्धीला वेगवेगळ्या विषयात बाळकडू मिळत आहेत.

महाप्रसाद : समतेचा जिवंत अनुभव पुण्यतिथी महोत्सवातील महाप्रसाद म्हणजे केवळ जेवण नव्हते. तो होता समतेचा, बंधुभावाचा आणि सामाजिक एकतेचा प्रत्यक्ष अनुभव. श्रीमंत-गरीब, स्त्री-पुरुष, जात-पंथ विसरून एकत्र बसून प्रसाद घेणे – हीच खरी गुरुदेवांची शिकवण.

आज समाज जातीच्या भिंती उंचावत असताना, अशा महाप्रसादातून मानसिक भिंती पाडण्याचे कार्य घडते, हे विसरता येणार नाही.

**दिवसभर चाललेला विचारमहोत्सव**

भजन, कीर्तन, प्रवचन, सामुदायिक कार्यक्रमांनी संपूर्ण दिवस गुरुदेव भक्तांनी भरून गेला होता. ही गर्दी केवळ संख्येची नव्हती; ती होती विचारांना भुकेलेल्या मनांची. हेच या महोत्सवाचे खरे यश आहे.वीस वर्षांची सातत्यपूर्ण तपश्चर्या अकोल्यात गेली वीस वर्षे हा पुण्यतिथी महोत्सव अखंडपणे सुरू आहे. हा चमत्कार नाही; ही आहे अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सेवा समितीच्या पदाधिकारी, कार्यकर्ते व गुरुदेव भक्तांची तपश्चर्या.कोणतीही मोठी जाहिरात नाही, कोणताही राजकीय गोंगाट नाही, तरीही हजारो लोक स्वयंस्फूर्तीने उपस्थित राहतात याचा अर्थ एकच, गुरुदेवांचा विचार अजून जिवंत आहे.मोझरीनंतर अकोला अभिमानाची जबाबदारीमोझरीनंतर अकोल्यात साजरी होणारी ही पुण्यतिथी राज्यातील सर्वात मोठ्या पुण्यतिथी महोत्सवांपैकी एक म्हणून ओळखली जाते. पण हा केवळ अभिमानाचा विषय नाही, तर मोठी जबाबदारी आहे. कारण जिथे मोठा उत्सव असतो, तिथे विचारांची धार बोथट होण्याचा धोका असतो. अकोल्याने मात्र हा धोका टाळत गुरुदेवांच्या विचारांचा केंद्रबिंदू कायम ठेवला आहे.

आजच्या काळातील गुरुदेवांची गरज आजचा समाज मोबाईलमध्ये अडकला आहे, माणूस माणसापासून तुटला आहे, आणि धर्म राजकारणाच्या हातातील खेळणे बनला आहे. अशा वेळी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार म्हणजे समाजासाठी ऑक्सिजन आहेत.

अकोल्यातील हा पुण्यतिथी महोत्सव म्हणजे केवळ दोन दिवसाचा कार्यक्रम नाही; तो आहे समाजाला आरसा दाखवणारा वैचारिक उत्सव. हा उत्सव असाच वाढत राहो, गुरुदेवांचे विचार केवळ व्यासपीठावर नव्हे तर प्रत्येकाच्या आचरणात उतरावेत, हीच खरी गुरुदेवांना श्रद्धांजली ठरेल.

**–गजानन कुसुम ओंकार हरणे.**
जिल्हा परिषद नगर,खडकी ,अकोला .
संवाद...९८२२९४२६२३.

RNI NO-46973/1986 Mahasagar Akola
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ महासागर अकोला
**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, ोमला स्क्रेअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९* (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)**

# अस्थिरतेच्या वळणावर उभा असलेला बांगलादेश

दक्षिण आशियातील एक महत्त्वाचा आणि भारताचा जवळचा शेजारी देश असलेला बांगलादेश सध्या गंभीर राजकीय व सामाजिक अस्थिरतेच्या टप्प्यातून जात आहे. स्वातंत्र्यानंतर अनेक आव्हानांना सामोरे गेलेल्या या देशासमोर आज लोकशाहीचे भविष्य, सामाजिक सलोखा आणि कायदा-सुव्यवस्था टिकवण्याचे मोठे आव्हान उभे आहे. आज स्वतंत्र राष्ट्र म्हणून ओळखला जाणारा बांगलादेश अनेक शतकांच्या संघर्ष, सांस्कृतिक समन्वय आणि राजकीय उलथापालथींतून घडलेला आहे. त्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेतल्याशिवाय आजची परिस्थिती नीट समजणे कठीण आहे.

----------------------

बांगलादेशचा भूभाग प्राचीन काळी वंग, समतट आणि पुंड्रवर्धन या नावांनी ओळखला जात होता. मौर्य, गुप्त, पाल आणि सेन राजवटींच्या काळात हा प्रदेश शिक्षण, व्यापार आणि संस्कृतीचे केंद्र होता. विशेषतः पाल राजवटीत बौद्ध धमार्चा मोठा प्रभाव होता. पुढे सेन काळात हिंदू संस्कृतीचा विस्तार झाला. १३व्या शतकात इस्लामी सत्तेचा प्रभाव वाढू लागला. दिल्ली सल्तनत आणि नंतर मुघल साम्राज्याच्या काळात बंगाल हा एक समृद्ध प्रांत मानला जात होता. शेती, कापूस, रेशीम आणि जलमार्गांमुळे बंगाल आर्थिकदृष्ट्या बळकट होता. याच काळात हिंदू-मुस्लिम सांस्कृतिक मिश्रण घडून आले.

१८व्या शतकात बंगालवर ब्रिटिश सत्तेची पकड बसली. ईस्ट इंडिया कंपनी आणि नंतर ब्रिटिश राजवटीत बंगालचे आर्थिक शोषण झाले. १९०५ साली ब्रिटिशांनी बंगालची फाळणी केली, ज्यामुळे धार्मिक तणाव वाढला. ती फाळणी जरी नंतर रद्द झाली, तरी हिंदू-मुस्लिम राजकारणाची बीजे याच काळात पेरली गेली.

१९४७ साली भारताच्या फाळणीनंतर बंगालचे दोन भाग झाले. पश्चिम बंगाल (भारत) आणि पूर्व बंगाल, जो पुढे पूर्व पाकिस्तान म्हणून ओळखला गेला. भौगोलिकदृष्ट्या पाकिस्तानपासून हजारो किलोमीटर दूर असलेला पूर्व पाकिस्तान भाषिक, सांस्कृतिक आणि आर्थिकदृष्ट्या वेगळा होता. तरीही राजकीय सत्ता पश्चिम पाकिस्तानकडे केंद्रित होती.

१९५२ साली उदूर्ला एकमेव राष्ट्रभाषा घोषित करण्याच्या निर्णयाविरोधात पूर्व पाकिस्तानमध्ये भाषा आंदोलन उभे राहिले. बंगाली भाषेसाठी दिलेले बलिदान बांगलादेशच्या राष्ट्रनिर्मितीचा पाया ठरले. या आंदोलनातूनच बंगाली अस्मिता आणि स्वाभिमान अधिक तीव्र झाला.

राजकीय अन्याय, आर्थिक शोषण आणि सांस्कृतिक दुय्यमतेविरोधात १९७१ साली बांगलादेश मुक्तिसंग्राम सुरू झाला. पाकिस्तानच्या सैन्याने केलेल्या दडपशाहीमुळे लाखो लोक भारतात निर्वासित झाले. भारताच्या मदतीने अखेर १६ डिसेंबर १९७१ रोजी बांगलादेश स्वतंत्र राष्ट्र म्हणून अस्तित्वात आला. शेख मुजीबूर रहमान हे या राष्ट्राचे संस्थापक नेते झाले.

स्वातंत्र्यानंतर बांगलादेशने लोकशाही, लष्करी राजवट, राजकीय हत्या आणि सत्तांतरांचे अनेक टप्पे अनुभवले. शेख मुजीबूर यांच्या हत्येनंतर देशात अस्थिरता वाढली. पुढील दशकांत शेख हसीना आणि खालिदा झिया यांच्या नेतृत्वाखालील राजकारणाने देशाची दिशा ठरवली.

**प्रा. डॉ. सतीश रामदास महल्ले**
**9923572226**

२०२४ मध्ये बांगलादेशात 'जुलै क्रांती' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मोठ्या विद्यार्थी आणि जनआंदोलनामुळे राजकीय अस्थिरता निर्माण झाली, ज्यामुळे पंतप्रधान शेख हसीना यांना राजीनामा देऊन देश सोडावा लागला आणि नोबेल पारितोषिक विजेते मुहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखाली अंतरिम सरकार स्थापन झाले; यानंतर देशात मोठ्या प्रमाणात हिंसाचार, आर्थिक समस्या (महागाई) आणि राजकीय गोंधळ वाढला, ज्यामुळे लोकशाही सुधारणा आणि नवीन निवडणुकीची मागणी जोर धरू लागली आहे.

सध्याच्या घडीला बांग्लादेशमध्ये राष्ट्रीय निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय आंदोलनांनी अधिक उग्र स्वरूप धारण केले आहे. शेख हसीना यांचे विरोधक नेते उस्मान हादी यांच्या हत्येमुळे पुन्हा हिंसाचार भडकला आहे. निदर्शने, मोर्चे, बंद आणि संघर्ष यामुळे सामान्य जनजीवन विस्कळीत झाले असून, लोकशाही प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या राजकीय अस्थिरतेचा सर्वाधिक फटका सामान्य नागरिकांना बसत आहे. सार्वजनिक मालमत्तेची तोडफोड, जाळपोळ, दगडफेक आणि जीवितहानीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. कायदा-सुव्यवस्था राखण्यात यंत्रणा कमी पडत असल्याचे दिसून येत आहे.

अधिक चिंतेची बाब म्हणजे अल्पसंख्यांक समुदायांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा केंद्रस्थानी आला आहे. धार्मिक व सामाजिक तणावामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, काही भागांत अल्पसंख्यांकांवर हल्ल्याच्या घटना समोर आल्या आहेत.

अलीकडील घटना, जिथे दीपू चंद्र दास नावाच्या हिंदू युवकाला धार्मिक आरोपांवरून जमावाने मारहाण करून ठार केले आणि त्यांचं शरीर झाडाला बांधून आग लावण्यात आली, यामुळे परिस्थिती आणखी गंभीरपणे प्रकाशात आली आहे. अशा घटना केवळ मानवतेलाच नाही, तर घटनात्मक मूल्यांनाही कलंक लावणाऱ्या आहेत. कोणताही देश बहुसंख्येच्या बळावर टिकत नसतो; सर्व नागरिकांना समान सुरक्षा व सन्मान देणारी व्यवस्था हाच टिकाऊ विकासाचा पाया असतो.

या सगळ्या घडामोडींचा परिणाम बांगलादेशच्या आंतरराष्ट्रीय प्रतिमेवरही होत आहे. भारतासह शेजारी देशांशी असलेले ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि आर्थिक संबंध या पार्श्वभूमीवर अधिक संवेदनशील बनले आहेत. प्रादेशिक शांतता, सीमावर्ती प्रश्न आणि स्थलांतर यासारख्या मुद्द्यांवर आंतरराष्ट्रीय समुदायाचे लक्ष वेधले जात आहे. अनेक जागतिक संस्था आणि राष्ट्रांनी बांगलादेशला संयम, संवाद आणि लोकशाही मूल्यांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.

बांगलादेशच्या सध्याच्या राजकीय परिस्थितीत बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीचे कार्यकारी अध्यक्ष तारिक रहमान (खालिदा झिया यांचे पुत्र) १७ वर्षांच्या निर्वासनानंतर देशात परतले आहे. त्यांना पुढील पंतप्रधान पदासाठी महत्त्वाचे उमेदवार मानले जात आहे, आणि त्यांच्या परतीमुळे देशातील राजकीय वातावरणात मोठी हलचल निर्माण झाली आहे.

आज बांगलादेशसमोर स्पष्ट असा निवडीचा क्षण उभा आहे. संघर्ष आणि अस्थिरतेचा मार्ग की संवाद, समन्वय आणि लोकशाही मूल्यांचा. इतिहास साक्षी आहे की, असहिष्णुता आणि हिंसा कधीही शाश्वत उपाय ठरलेले नाहीत.

राजकीय पक्षांनी सत्तेच्या गणितापेक्षा राष्ट्रहिताला प्राधान्य देण्याची गरज आहे. निष्पक्ष निवडणुका, मजबूत कायदा-सुव्यवस्था, अल्पसंख्यांकांचे संरक्षण आणि सर्वसमावेशक विकास धोरणे यांद्वारेच देशाला स्थैर्याकडे नेणे शक्य आहे. अन्यथा, अस्थिरतेची ही आग देशाच्या सीमांपुरती मर्यादित राहील, याची खात्री देता येणार नाही.

# मद्यपींकरिता सरकारच्या पायघड्या!

खिस्ती नववर्षाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने ३१ डिसेंबरला मद्याची दुकाने रात्री १ वाजेपर्यंत चालू ठेवण्याची परवानगी दिली आहे तर बिअर बार्स, पब्स, क्लब्स आणि परमिट रूम्स यांमध्ये पहाटे पाच वाजे मद्य विक्री करण्याची मुभा देण्यात आली आहे .

सरकारच्या या निर्णयामुळे मद्यपींमध्ये उत्साहाचे वातावरण असले, तरी सामान्य जनतेमध्ये संतापाची लाट उसळली आहे. दारूच्या व्यसनामुळे अनेकांचे संसार उध्वस्त झाले आहेत. अनेकांच्या घरात दारिद्र्य आले आहे. कित्येक पिढ्या बरबाद झाल्या आहेत.

दारूमुळे होणारी हानी लक्षात घेऊन अनेक राज्य सरकारांनी आपल्या राज्यात कायमस्वरूपी दारूबंदी केली आहे, असे असताना राज्याच्या सरकारने मद्यपींसाठी घालून दिलेली मोकळीक महाराष्ट्राच्या संस्कृतीला न शोभणारी आहे.

१ जानेवारी हा खरेतर खिस्ती नववर्षारंभ. भारतात इंग्रजांनी अनेक प्रांतांत शेकडो वर्षे राज्य केल्याने आज इंग्रज जाऊन ७८ वर्षे उलटली तरी इंग्रजांच्या वैचारिक आणि सांस्कृतिक गुलामगिरीतून आपण अद्याप मुक्त झालेलो नाहीत. तरुण वर्गामध्ये साजरे केलेले जाणारे विविध 'डेज' आणि त्यानिमित्ताने चालणारा स्वैराचार ही त्याचीच विषारी फळे आहेत.

भारतात दरवर्षी उत्साहात साजरा केला जाणारा ३१ डिसेंबर हे सुद्धा आपल्यातील वैचारिक गुलामगिरीचेच लक्षण आहे. ३१ डिसेंबरच्या एका रात्रीत लाखो लिटर दारू रिचवली जाते. अति मद्यसेवनामुळे या दिवशी कितीतरी ठिकाणी अपघात घडतात. या अपघातात कितीतरी निरपराधांचे बळी जातात तर कितीतरी आयुष्यभरासाठी जायबंदी होतात. या एका रात्री अनेक ठिकाणी वादावादीचे प्रसंग घडतात त्यामध्ये कित्येकांची डोकी फुटतात.



**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई.**
**९६६४५५९७८०**

शहरी भागांत ३१ डिसेंबरच्या पाट्यांमध्ये वर्षागणिक तरुणींचे प्रमाणही वाढू लागले आहे. सध्याच्या तरुण पिढीवर सिनेकलाकारांचा प्रभाव अधिक असल्याने अशा पाट्यांमध्ये कित्येक तरुणी तोकड्या कपड्यांमध्ये वावरताना दिसतात.

३१ डिसेंबरच्या रात्री विनयभंगाचे आणि छेडछाडीचे प्रसंगही मोठ्या प्रमाणात घडतात. ३१ डिसेंबरच्या निमित्ताने शेकडो तरुण अन्य मित्रांच्या हट्टामुळे पहिल्यांदा दारूचा ग्लास ओठाला लावतात आणि त्यातील कितीतरी जण पुढच्या वर्षीच्या ३१ डिसेंबरपर्यंत अट्टल मद्यपी झालेले असतात, अनेक बार आणि पब्समध्ये मद्याच्या नावाखाली अमली पदार्थांचीही विक्री केली जाते.

पहाटे पाच वाजेपर्यंत परमिट रूम्स चालू ठेवण्याची शासनाने परवानगी दिल्यामुळे अनैतिक कृत्यांसाठी मोकळे रानच उपलब्ध झाले आहे. या सर्वांचा सर्वाधिक ताण पोलीस प्रशासनावर पडतो. कुणी मद्यपान करून वाहन चालवत नाहीत ना, वाहनांचे वेग मर्यादेत आहेत ना, कुठे अमली पदार्थांची खरेदी-विक्री तर होत नाही ना, हे सर्व पाहण्यासाठी पोलिसांना शहरासारख्या ठिकाणी अधिक कुमक मागवावी लागते.

एरव्ही रात्रीच्या वेळी कोणी दारू पिऊन झिंगताना दिसल्यास पोलीस त्याला हटकतात; मात्र आता सरकारनेच पहाटे ५ वाजेपर्यंत झिंगण्याची परवानगी दिल्याने पोलिसांना रात्रीची गस्त वाढवून मद्यपींची भांडणे सोडवण्यासाठी वेगळा वेळ द्यावा लागणार आहे.

या देशात बहुसंख्य हिंदू असून हिंदूंचे नववर्ष हे गुढीपाडव्याला साजरे होते. गुढीपाडवा हा सृष्टीचाही आरंभ दिन आहे. गुढीपाडव्याच्या दिवशी नववषार्चे स्वागत आपण दारी तोरण आणि दाराजवळ गुढी उभारून करतो. पारंपरिक वेशभूषा करून जेष्ठांचे आशीर्वाद घेतो अन समवयस्कांना शुभेच्छा देतो. घरी गोडधोड केले जाते. नववर्षाच्या स्वागतासाठी अनेक ठिकाणी नववर्ष स्वागतयात्रा काढल्या जातात. निसर्गही या दिवसांत बहरलेला असतो.

३१ डिसेंबरच्या रात्री मद्यपान करून नववर्ष साजरे करणे ही खरेतर पाश्चात्यांची कुप्रथा. ही कुप्रथा जोपासून आपणच आपला ऱ्हास करून घेत आहोत. आपल्या राज्यातील जनतेला सर्व प्रकारच्या हानिकारक गोष्टींपासून दूर ठेवणे, कुप्रथांना प्रोत्साहन देणाऱ्यांना शासन करणे आणि राज्याच्या संस्कृतीचा पुरस्कार करणे हे राजाचे आद्यकर्तव्य आहे; मात्र सध्याचे सरकार हा 'राजधर्म' विसरले आहेत कि काय अशी शंका येते.

मद्यविक्रीतून राज्याला मोठ्या प्रमाणात महसूल मिळतो. नाताल आणि ३१ डिसेंबरच्या निमित्ताने यामध्ये दरवर्षी विक्रमी वाढ झालेली असते. राज्य सरकारमधील दोन प्रमुख पक्ष हे हिंदुत्ववादी विचारसरणीचे संस्कृतीप्रिय पक्ष आहेत त्यामुळे पाश्चात्य संस्कृतीच्या या अवडंबराला विद्यमान सरकारकडून देण्यात येत असलेले प्रोत्साहन मनाला खटकणारे आहे.

नशेखोरीला आणि अनैतिकतेला प्रोत्साहन देणाऱ्या सनबर्न फेस्टिव्हलला मुंबईत परवानगी देऊन सरकारने आधीच जनतेचा रोष ओढवून घेतला आहे आता ३१ डिसेंबरच्या रात्रीकरीता मद्यपींसाठी सरकारने पायघड्या घातल्याने हा नक्की छत्रपती शिवरायांचाच महाराष्ट्र आहे का ? असा प्रश्न कोणी बाहेरच्यांनी विचारला तर आश्चर्य वाटायला नको.

■ ■ ■

# अरवली पर्वतरांग धोरणातील अस्पष्टता आणि शाश्वत विकासाचा प्रश्न

अरवली पर्वतरांगांबाबत सुरू असलेला वाद हा पर्यावरण रक्षणापुरता मर्यादित नसून, धोरणात्मक स्पष्टता, संस्थात्मक विश्वासार्हता आणि शाश्वत आर्थिक विकास यांचा कस लावणारा आहे.

राजस्थान, हरियाणा आणि दिल्लीपर्यंत पसरलेली ही प्राचीन पर्वतरांग उत्तर भारताच्या जलसुरक्षा आणि हवामान संतुलनासाठी अत्यंत महत्त्वाची आहे; मात्र धोरणांतील विसंगतींमुळे तिचे संरक्षण कमकुवत होत आहे.



**ॲड. दत्तात्रय दिनकर फडतरे**
**(लेखक पुणे येथे वकील असून चालू घडामोडींचे अभ्यासक आहेत.)**
**7588072685**

नुकतीच केंद्र सरकारच्या शिफारशींनंतर सर्वोच्च न्यायालयाने अरवलीची नवीन व्याख्या मान्य केली आहे. दिल्लीपासून सुरू होऊन हरियाणा, राजस्थानमार्गे गुजरातेतील अहमदाबादपर्यंत सुमारे ६७० किलोमीटर क्षेत्रात पसरलेल्या अरवली पर्वतरांगा सध्या चर्चेत आहेत, ते त्याच्या नवीन व्याख्येमुळे.

या व्याख्येनुसार, आजूबाजूच्या जमिनीपेक्षा किमान 100 मीटर (328 फूट) उंच असलेला भागच अरवली पर्वत मानला जाईल.

जर दोन किंवा त्याहून अधिक टेकड्या 500 मीटरच्या आत असतील आणि त्यांच्या मधोमध जमीन असेल, तर त्या टेकड्यांना अरवली पर्वतरांगांचा भाग मानलं जाईल .केंद्र सरकारच्या शिफारशींनंतर सर्वोच्च न्यायालयाने अरवलीची नवीन व्याख्या मान्य केली आहे. अरवली आंदोलकांचे म्हणणे आहे की अरवलीची व्याख्या फक्त उंचीवरून नाही, तर तिच्या पर्यावरणीय, भूगर्भीय आणि हवामानाशी संबंधित महत्त्वावरून ठरवली गेली पाहिजे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर टेकड्या आणि पर्वतरांगा त्यांच्या कामगिरीवर ओळखल्या जातात, केवळ उंची पाहून नाही.अरवलीबाबत वारंवार बदलले जाणारे नियम, व्याख्यांतील फेरफार आणि न्यायालयीन हस्तक्षेप हे कमकुवत धोरणनिर्मितीचे लक्षण आहेत.

स्पष्ट, स्थिर आणि विज्ञानाधारित नियम नसतील, तर पर्यावरण संरक्षणही साध्य होत नाही.परिणामी, विकास आणि संवर्धन या दोन्ही आघाड्यांवर नुकसान होते.अरवलीचा ऱ्हास म्हणजे केवळ नैसर्गिक अधिवासाचे नुकसान नव्हे, तर पाण्याची टंचाई, वाढती उष्णता, प्रदूषण आणि सार्वजनिक आरोग्यावर वाढणारा खर्च होय. पर्यावरणाचा धोरणनिर्मितीत समावेश न झाल्यास, अर्थव्यवस्थेला दीर्घकालीन फटका बसतो.

शाश्वत विकास म्हणजे पर्यावरणविरोधी निर्बंध नव्हे, तर जोखीम कमी करणारे आणि दीर्घकालीन स्थैर्य देणारे निर्णय. अरवलीसाठी स्वतंत्र, पारदर्शक आणि वैज्ञानिक चौकट तयार करणे ही काळाची गरज आहे, जेणेकरून न्यायालयीन हस्तक्षेपाऐवजी धोरणात्मक विश्वास निर्माण होईल.

निसर्गसंवर्धन हे आर्थिक अडथळा नाही, तर सुयोग्य धोरणाचा पाया आहे. अरवली प्रकरणात हा मूलभूत धडा आत्मसात केला नाही, तर पर्यावरणीय तसेच आर्थिक किंमत अधिकच वाढत जाईल.

पश्चिम घाटापासून पूर्वेकडील पर्वतरांगांपर्यंत आणि अरवलीपासून हिमालयीन पर्वतराजीपर्यंत सर्वच ठिकाणी निसर्गाचे लचके तोडण्याचे काम सुरू आहे. बेकायदा खाणकाम आणि बांधकामे यांमुळे निसर्ग विद्रूप झाला आहे. या साऱ्यांचा अभ्यास करून भविष्यातील संकटांचा इशारा शास्त्रज्ञांनी दिला तरी त्याकडे काणाडोळा करण्याची प्रवृत्ती आपल्याकडे बळावते आहे.

अरवली पर्वतरांगांबाबत आज व्यक्त होत असलेली भीती आणि चिंता म्हणजे एक प्रकारे इशाराच. त्यावर खुलासे न करता पर्यावरणाबाबत संवेदनशील होत आणि भविष्याचा विचार करीत सरकारने त्याकडे गांभीर्याने पाहायला हवे.

अरवलीचा ऱ्हास म्हणजे केवळ जंगल कमी होणे नाही, तर भूजल पुनर्भरण घटणे, उष्णतेत वाढ, धूळप्रदूषण आणि शेती-उद्योगांवरील खर्चात वाढ होणे होय. या सर्वांचा थेट परिणाम अर्थव्यवस्थेवर आणि सार्वजनिक आरोग्य खर्चावर होतो. पर्यावरणीय नुकसान हे शेवटी राजकोषीय बोजा बनते.

संविधानिक जबाबदाऱ्या आणि शाश्वत विकासाची तत्त्वे लक्षात घेता, अरवलीसाठी स्पष्ट, वैज्ञानिक आणि दीर्घकालीन धोरण आवश्यक आहे. अल्पकालीन महसुलासाठी निसर्गाशी तडजोड करणे ही आर्थिकदृष्ट्याही दूरदृष्टीहीन भूमिका ठरते.

अरवलीचे संरक्षण हे विकासविरोधी नाही, तर सुज्ञ आर्थिक नियोजनाचा भाग आहे. पर्यावरण आणि अर्थव्यवस्था यांना विरोधी बाजूंवर उभे करण्याऐवजी, दोन्हींचा समतोल साधणे हाच शाश्वत विकासाचा खरा मार्ग आहे.

अरवलीचे संरक्षण केवळ कायदेशीर व्याख्यांपुरते किंवा खाणकामावरील निबंधांपुरते मर्यादित असू शकत नाही. पर्वतरांग ही एक परिसंस्था आहे–ज्यात डोंगर, जंगल, जलसंधारण क्षेत्रे, वन्यजीव आणि स्थानिक समुदाय यांचा समावेश होतो. यातील कोणताही घटक दुर्लक्षित केला, तर संपूर्ण परिसंस्था कोलमडण्याचा धोका निर्माण होतो.

सर्वोच्च न्यायालय व राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने वेळोवेळी अरवली संरक्षणासाठी कठोर निर्देश दिले असतानाही, अंमलबजावणीतील ढिलाई ही कायमची समस्या राहिली आहे.

पर्यावरणीय प्रश्नांमध्ये वारंवार न्यायालयीन हस्तक्षेप ही अपयशी धोरणांची लक्षणे आहेत. खरे समाधान धोरणात्मक स्पष्टता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि प्रशासकीय इच्छाशक्तीतूनच येऊ शकते.

संविधानातील अनुच्छेद 48-अ (पर्यावरण संरक्षण) आणि 51-अ (ग) (नागरिकांचे कर्तव्य) हे अरवलीसारख्या नैसर्गिक संपत्तीच्या संरक्षणासाठी मार्गदर्शक तत्त्वे आहेत. अल्पकालीन आर्थिक लाभांसाठी दीर्घकालीन पर्यावरणीय नुकसान स्वीकारणे हे शाश्वत विकासाच्या संकल्पनेलाच हरताळ फासणारे आहे. अरवलीचा प्रश्न हा विकास विरुद्ध पर्यावरण असा नसून, विवेकपूर्ण विकासाचा आहे. निसगार्शी संघर्ष न करता, निसर्गाशी सुसंगत धोरणे आखणे हीच काळाची गरज आहे.

# सुपरस्टार राजेश खन्ना

हिंदी चित्रपट सृष्टीतील पहिले सुपरस्टार म्हणून ओळखले जाणारे जेष्ठ अभिनेते राजेश खन्ना यांची आज जयंती. राजेश खन्ना यांचा जन्म २९ डिसेंबर १९४२ रोजी पंजाबमधील अमृतसर येथे झाला. राजेश खन्ना यांचे मूळ नाव जतीन खन्ना असे होते. त्यांच्या आईचे नाव चंद्राणी खन्ना तर वडिलांचे नाव लाला हिराणी असे होते. त्यांचे वडील शाळेत मुख्याध्यापक होते.

त्यांच्या एका जवळच्या नातेवाईकांना मुलबाळ नव्हते म्हणून त्यांच्या आई वडिलांनी त्यांना त्या नातेवाईकांकडे दत्तक दिले. त्यांच्या नवीन आईचे नाव लीलावती खन्ना तर वडिलांचे नाव चुनीलाल खन्ना असे होते. चुनीलाल खन्ना रेल्वे कंत्राटदार होते. ते मुंबईत राहत होते.

राजेश खन्ना हे सेंट सबिस्टाईन गॉन हायस्कूल येथे शिकत असताना त्यांची रवी कपूर यांच्याशी ओळख झाली. रवी कपूर म्हणजेच हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते जितेंद्र. राजेश खन्ना व जितेंद्र यांनी कॉलेज जीवनात अनेक नाटकात एकत्र काम केले. नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी राजेश खन्ना हे पुण्यात आले. पुण्यात दोन वर्ष शिक्षण घेतल्यावर ते पुन्हा मुंबईला परतले.

मुंबईत काही दिग्दर्शकांनी टॅलेंट हंट स्पर्धा आयोजित केली. राजेश खन्ना यांच्या काकांनी त्यांचे नाव या स्पर्धेकरिता नोंदवले. ते नोंदवताना त्यांनी त्यांचे नाव जतीन खन्ना ऐवजी राजेश खन्ना म्हणून नोंदवले पुढे याच नावाने ते ओळखले जाऊ लागले.



**श्याम ठाणेदार**
**दौंड, जि. पुणे**
**९९२२५४६२९५**

या स्पर्धेत त्यांनी पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक मिळवले. त्यांच्या अभिनयाने त्याकाळातील दिग्गज दिग्दर्शक प्रभावित झाले. १९६६ साली चेतन आनंद यांनी त्यांना आखरी खत या चित्रपटात संधी दिली हाच त्यांचा पहिला चित्रपट. हा चित्रपट ऑस्करला गेला होता.

पहिल्याच चित्रपटातील त्यांच्या अभिनयाने चित्रपट रसिक तसेच जाणकार प्रभावित झाले त्यामुळे त्यांना अनेक चित्रपट मिळाले. त्याकाळातील यशस्वी दिग्दर्शक असणारे शक्ती सामंत यांनी त्यांना आराधना या चित्रपटात नायकाची भूमिका दिली.

या चित्रपटात शर्मिला टागोर या त्यांच्या नायिका होत्या. चित्रपट सुपरहिट झाला. या चित्रपटातील सर्व गाणी लोकप्रिय झाली. या चित्रपटा नंतरच राजेश खन्ना सुपरस्टार म्हणून ओळखले जाऊ लागले. राजेश खन्ना यांची अदाकारी, संवाद फेकीची लकब यावर तरुणाई फिदा झाली. कॉलेज मधील मुली त्यांच्यावर जीव ओवाळून टाकू लागल्या. त्यांचे चाहते त्यांच्या गाडीचे चुंबन घ्यायचे. मुली त्यांच्या गाडीची धूळ आपल्या भांगेत भरत. बऱ्याचश्या मुलींनी त्यांच्या फोटोशी लग्न केले होते.

त्यांना चाहत्यांचे जितके प्रेम लाभले तितके प्रेम कोणत्याच कलाकाराला लाभले नाही. राजेश खन्ना यांचे सलग १५ चित्रपट सुपरहिट झाले हा एक विक्रम आहे. तो अजूनही कोणत्या अभिनेत्याला तोडता आला नाही. शर्मिला टागोर, मुमताज, अशा पारेख, तनुजा यांच्याशी त्यांची चांगली केमिस्ट्री जमली. सत्तरच्या दशकात राजेश खन्ना सुपरस्टार पदावर आरूढ झाले होते.

चालण्या बोलण्याची विशिष्ट ढब, मानेला खास झटका देत, हातवारे करत नाचण्याची अनोखी शैली, जबरदस्त संवाद फेक आणि ओठावर रुंजी घालतील अशी गाणी यामुळे राजेश खन्ना हे अफलातून रसायन बनून गेले. त्याकाळात सर्वाधिक मानधन घेणारे राजेश खन्ना यांची प्रेम प्रकरणेही गाजली पण १९७३ साली त्यांनी आपल्या पेक्षा कितीतरी लहान वयाच्या डिंपल कपाडिया यांच्याशी विवाह केला.

१९९२ साली काँग्रेसच्या वतीने त्यांनी दिल्ली मतदार संघातून लोकसभेची पोटनिवडणुक लढवली आणि ते खासदार म्हणून निवडून आले. १८ जुलै २०१२ रोजी राजेश खन्ना यांनी चाहत्यांना अलविदा म्हणत जगाचा निरोप घेतला आणि बॉलिवूडचा पहिला सुपरस्टार काळाच्या पडद्याआड गेला.

*"बाबूमोशाय....... बाबू मोशाय जिंदगी और मौत उपरवाले के हात है जहाँपणा...जिसे ना तो आप बदल सकते है ना मै.... हम सब तो रंगमंच की कटपुतलीया है, जीसकी डोर उपरवालेकी उंगलीओमे बंधी है....कब कोण कैसे उठेगा कोई बता नहीं सकता....." आनंद कभी मरते नहीं वह हमेशा याद रहते है....*

■ ■ ■

## बांगलादेशातील हिंदूसाठी भारत सरकारने प्रयत्न करावेत!

**वाचक लिहितात**

बांगलादेश येथे हिंदू समाजाचा भीषण नरसंहार सुरू आहे, ते पाहून मन अस्वस्थ होते. नुकतेच दिपू चंद्र दास याची तेथील स्थानिक कट्टरपंथीय लोकांनी मॉब लिंचिंग द्वारे हत्या केली. सर्व खूप भीतीदायक होते. त्याच्या आत्म्याला त्यावेळी किती वेदना झाल्या असतील याची कल्पनाच करवत नाही. त्यातच पुन्हा अमृत मोंडल या युवकाची जमावाने हत्या केली. काही हिंदूंची घरे रात्रीच्या वेळी पेटवून दिली. हें सर्व खूप भयानक आहे. भारत सरकारकडे विनंती आहे की बांग्लादेशातील हिंदूंना संरक्षण मिळावे यासाठी तातडीने प्रयत्न करावेत. हें सर्व थांबले पाहिजे. अन्यथा हा एका ठराविक कट्टर पंथीय जमवाकडून होणारा हत्येचा वणवा सर्व जगात पसरायला नको!

■ **सौ. आदिती देखणे, पनवेल.**

## ३१ डिसेंबरला एकादशी

या वर्षी ३१ डिसेंबरला एकादशी आहे. एकादशी हा हिंदू धर्मातील आत्मसंयम, शुद्ध आहार-विहार आणि आध्यात्मिक साधनेसाठी पवित्र दिवस मानला जातो. अशा दिवशी मांसाहार, मद्यपान किंवा उथळ जल्लोष करणे हे आपल्या परंपरेशी सुसंगत नाही.

इंग्रजी वर्ष बदलते ते फक्त कॅलेंडरवर; निसर्गात या काळात काहीही मूलभूत बदल होत नाहीत. त्यामुळे इंग्रजी वर्षाच्या स्वागतासाठी एका रात्रीचा दिखाऊ आनंद टाळल्याने आयुष्य थांबणार नाही किंवा कुठलेही नुकसान होणार नाही ; उलट, आत्मसंयमाने साजरा केलेला दिवस मनाला स्थैर्य आणि सकारात्मक ऊर्जा देतो. श्रद्धेची कास धरल्यास जीवन अधिक सुसंस्कृत आणि अर्थपूर्ण होते. आपल्या संस्कृतीत एकादशीसारखे पवित्र दिवस हे भोगासाठी नसून साधनेसाठी असतात.

म्हणूनच, ३१ डिसेंबरला मद्य व मांसाहारापासून दूर राहून आपल्या संस्कृतीशी नाते दृढ करूया. या दिवशी साधेपणाने व्रतोपवास किंवा सात्त्विक आहार करून, जप-नामस्मरण करत श्रीहरीची भक्ती करूया.

■ **अनिकेत शेटे, पुणे.**

# हिवाळ्यात तोंड झाकून झोपणे धोकादायक



हिवाळ्यात थंडीपासून वाचण्यासाठी आणि ऊब राखण्यासाठी अनेक लोक झोपताना रजाई-ब्लँकेटने पूर्ण चेहरा झाकून घेतात. ही सवय आरामदायक वाटत असली तरी, डॉक्टरांच्या मते ती झोप आणि श्वास या दोन्हीसाठी हानिकारक आहे.

बंगळूरू येथील डॉ. शिवराज अज्जी करियप्पाला लक्ष्मण यांच्या मते, चेहरा झाकून झोपल्याने ऑक्सिजनची पातळी १५-२०% पर्यंत कमी होते आणि फुफ्फुसांना ऑक्सिजन घेण्यासाठी जास्त मेहनत करावी लागते. याचा परिणाम झोपेच्या गुणवत्तेवर होतो, ज्यामुळे झोप वारंवार मोडते. दीर्घकाळ असे केल्याने सकाळी जडपणा, थकवा, डोकेदुखी आणि श्वासोच्छवासाच्या समस्या वाढू शकतात.

डॉ. शिवराज अज्जी सांगतात, अनेक लोक तोंड झाकून झोपणे पसंत करतात, कारण यामुळे सुरक्षित, वेढलेल्या जागेची भावना येते. ब्लँकेटचे वजन आणि उष्णता शरीराला शांत करते, ज्यामुळे अस्वस्थता आणि चिंता कमी होते. तसेच, ब्लँकेट प्रकाश आणि हलक्या आवाजांनाही थांबवते, ज्यामुळे मन लवकर शांत होते आणि गाढ झोप येते.

चेहरा झाकून झोपल्याने ब्लँकेटच्या आत ताज्या हवेचा प्रवाह खूप कमी होतो आणि आपण स्वतःच बाहेर सोडलेली हवा पुन्हा आत घेतो. याचा परिणाम सकाळी जाणवतो. सकाळी डोके जड वाटते, शरीर थकलेले राहते आणि झोप ताजीतवानी वाटत नाही.

वैज्ञानिक अभ्यासातून असे दिसून येते की, चेहरा झाकून झोपणे अनेक प्रकारच्या समस्या वाढवू शकते. ही सवय दीर्घकाळ टिकल्यास श्वास घेण्याची क्षमता, झोपेची गुणवत्ता आणि एकूणच आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो. ऑक्सिजनची कमतरता, शरीराचे तापमान वाढणे आणि अस्वस्थता, झोपेच्या गुणवत्तेवर परिणाम, त्वचेशी संबंधित समस्या, श्वासोच्छवासाच्या समस्या याशिवाय इतर अनेक समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे तोंड झाकून झोपणे टाळायला हवे.

■ ■ ■

## अशोकायन



**प्रा. अशोक सारडा मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

### बिबट्यांची दहशत..!

बिबटे काल होते
आजही आहेत पण..
शहराकडे घेत नव्हते धाव
एकाएकी त्यांनी पवित्रा
का बदलला असेल राव?

मानवाने करूनी
जंगल कटाई
त्यांचे स्वातंत्र केले मर्यादित
त्यामुळे ते मानवावर
हल्ले करत
असतील सदोदीत .

# एसएसआयआय मंत्रासह १०० टेलीसर्जरींचा ऐतिहासिक टप्पा साजरा

■ **वृत्तसंस्था,नवी दिल्ली, दि. २७:**



भारत 23 डिसेंबर 2025: भारताची पहिली स्वदेशी सर्जिकल रोबोटिक प्रणाली एसएसआयआय मंत्रा विकसित करणाऱ्या एसएस इनोव्हेशन्स इंटरनॅशनल इन्क. ने 100 रोबोटिक टेलीसर्जरी यशस्वीरीत्या पूर्ण केल्याची ऐतिहासिक घोषणा केली आहे. हा टप्पा तंत्रज्ञान-सक्षम आरोग्यसेवांच्या उत्क्रांतीतील एक महत्त्वपूर्ण पाऊल असून, स्वदेशी नवकल्पनांच्या माध्यमातून प्रगत शस्त्रक्रिया कौशल्ये दूरवर विश्वासार्हपणे पोहोचवता येतात, हे अधोरेखित करतो.

या यशाच्या निमित्ताने, एसएस इनोव्हेशन्स इंटरनॅशनलने भारताची पहिली रोबोटिक टेलीसर्जरी मॅरेथॉन आयोजित केली, ज्यादरम्यान एका दिवसात 20 हून अधिक टेली-सक्षम रोबोटिक शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यात आल्या.

ही पुढाकार एसएसआयआय मंत्रा प्लॅटफॉर्मची प्रत्यक्ष क्लिनिकल पडताळणी ठरते, ज्यामध्ये विविध शस्त्रक्रिया शाखांमध्ये त्याची अचूकता, सुरक्षितता आणि विस्तारक्षमता (स्केलेबिलिटी) अधोरेखित झाली. तसेच, महानगरांच्या पलीकडे तज्ज्ञ-आधारित आरोग्यसेवा पोहोचवण्यासाठी रोबोटिक टेलीसर्जरीची वाढती भूमिका यामधून स्पष्ट होते.

1.4 अब्ज लोकसंख्या असलेल्या देशात, जिथे प्रगत शस्त्रक्रिया सेवांपर्यंत पोहोच अजूनही असमान आहे, तिथे टेलीसर्जरीची परिवर्तनकारी क्षमता ही कामगिरी अधोरेखित करते.

दूरस्थ पद्धतीने शस्त्रक्रिया करण्याची सुविधा उपलब्ध करून देत, एसएसआयआय मंत्रा आरोग्यसेवेतील महत्त्वाच्या दरी कमी करते, भौगोलिक असमानता दूर करते आणि अधिक समावेशक व सक्षम आरोग्यव्यवस्था उभारण्यास हातभार लावते. यासोबतच, वैद्यकीय तंत्रज्ञान आणि शस्त्रक्रिया नवकल्पनांमध्ये भारताची जागतिक नेतृत्वाची भूमिका अधिक बळकट करते.

टेलीसर्जरीदरम्यान एसएसआयआय मंत्रा प्रणालीची सातत्यपूर्ण कामगिरी आणि जलद प्रतिसादक्षमतेमुळे शल्यचिकित्सकांचा आत्मविश्वास वाढतो आणि जटिल यूरोलॉजिकल शस्त्रक्रियांची व्याप्ती अधिक विस्तारते. डॉ. ललित मलिक, कन्सल्टंट कार्डिओथोरॅसिक व व्हॅस्क्युलर सर्जन, मणिपाल हॉस्पिटल, म्हणाले, हृदय शस्त्रक्रियेसारख्या अत्यंत अचूकतेची गरज असलेल्या शाखांमध्ये संपूर्ण विश्वासार्हता अत्यावश्यक असते. एसएसआयआय मंत्राने दाखवलेली कामगिरी प्रगत दूरस्थ कार्डिएक केअरमध्ये त्याची मजबुती आणि वाढती उपयुक्तता अधोरेखित करते.

डॉ. मगन मेहरोत्रा, वरिष्ठ बॅरियाट्रिक व रोबोटिक सर्जन, एपेक्स हॉस्पिटल, मुरादाबाद, म्हणाले, ही रोबोटिक टेलीसर्जरी मॅरेथॉन दाखवते की स्वदेशी तंत्रज्ञान कसे लहान शहरांतील आणि वंचित भागांतील रुग्णांपर्यंत प्रगत शस्त्रक्रिया सेवा पोहोचवू शकते, ज्यामुळे आरोग्यसेवा केवळ सुलभच नव्हे तर किफायतशीरही ठरते.

100 टेलीसर्जरी यशस्वीरीत्या पूर्ण करून आणि भारतातील पहिली रोबोटिक टेलीसर्जरी मॅरेथॉन पार पाडून, एसएस इनोव्हेशन्स इंटरनॅशनल इन्क. सातत्याने एसएसआयआय मंत्रा प्लॅटफॉर्मची क्लिनिकल परिपक्वता आणि विस्तारक्षमता सिद्ध करत आहे.

# बांगलादेशी क्रिकेटपटूंना संतांचा कडक इशारा

■ **वृत्तसंस्था,हरिद्वार, दि. २७:**



आयपीएल 2026 साठी बांगलादेशी क्रिकेटपटूंना खरेदी करण्याच्या आणि खेळवण्याच्या विरोधात हरिद्वारचे साधू-संत उघडपणे समोर आले आहेत. साधू-संतांनी आयोजकांना इशारा दिला आहे की, जर बांगलादेशी क्रिकेटपटूंसोबत भारतीय खेळाडू खेळले, तर ते याचा विरोध करतील.

त्यांनी भारतीय क्रिकेटपटूंनाही यावर लक्ष देण्यास सांगितले आहे. संतांनी म्हटले आहे की, जर ते या क्रिकेटपटूंसोबत खेळले, तर तेही जिहादी म्हणवले जातील आणि त्यांचाही विरोध केला जाईल. त्यांनी सांगितले की, बांगलादेशींनी हिंदूंचा नरसंहार केला आहे हिंदूंना मारले आहे, कापले आहे, जाळले आहे. जर त्या बांगलादेशींसोबत सामना झाला, तर ते लोक हजारो पदाधिका?्यांसह रस्त्यावर उतरतील.

आयपीएलमध्ये बांगलादेशी खेळाडूंच्या विरोधात हरिद्वारमधील माया देवी मंदिरात शनिवारी संत समाज, श्री अखंड परशुराम आखाडा आणि विविध समाजसेवा संस्थांनी विरोध प्रदर्शन केले. आंदोलकांनी मागणी केली की, आयपीएलसाठी बांगलादेशी खेळाडूंची खरेदी करू नये आणि त्यांना सामन्यांमध्येही समाविष्ट करू नये. आंदोलनादरम्यान संत समाज आणि सामाजिक संघटनांनी इशारा दिला की, जर त्यांच्या मागण्यांकडे लक्ष दिले नाही, तर ते पुढेही आंदोलन सुरू ठेवतील.

आचार्य पवन कृष्ण शास्त्री म्हणाले की, हा जो आयपीएल होणार आहे. जर त्या बांगलादेशी खेळाडूंना, जिहादींना, जर सामन्यात विकत घेतले गेले, त्यांच्यासोबत जर सामना खेळला गेला, तर श्री अखंड परशुराम आखाडा आपल्या हजारो पदाधिकाऱ्यांसह, हजारो-हजारो सैनिकांसह रस्त्यावर उतरेल. आचार्य पवन कृष्ण शास्त्री म्हणाले की, जिहादींना खेळू देणार नाही.

आचार्य पवन कृष्ण शास्त्री म्हणाले की, जिहादींना खेळू देणार नाही.

जिथे सामना होत असेल तिथे जाऊन विरोध करेल. कारण बांगलादेश आणि पाकिस्तानी जेवढेही खेळाडू आहेत, त्यांना विकत घेणारा, त्यांच्याशी संबंध ठेवणारा तो देखील जिहादी प्रवृत्तीचा असेल आणि त्यांचा विरोध करण्याचे कार्य श्री अखंड परशुराम आखाडा करेल.

यासोबतच असेही सांगण्यात आले की, बांगलादेशी खेळाडू जिथे जिथे खेळायला जातील, तिथे जाऊन निदर्शने करून आपला विरोध नोंदवला जाईल. यावेळी संत जूना आखाड्याशी संबंधित भास्कर पुरी म्हणाले की, बांगलादेशात हिंदूंवर होत असलेल्या कथित अत्याचारांच्या विरोधात हे आंदोलन केले जात आहे.

त्यांचे म्हणणे होते की, बांगलादेशात हिंदू समुदायाच्या लोकांवर हल्ले, मारामारी आणि हिंसाचाराच्या घटना समोर येत आहेत, जे कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाऊ शकत नाही. ते म्हणाले की, अशा परिस्थितीत भारतात बांगलादेशी खेळाडूंना खेळण्याची परवानगी देणे योग्य नाही आणि याचा तीव्र विरोध केला जाईल.

श्री अखंड परशुराम आखाड्याचे पंडित अधीर कौशिक म्हणाले की, बांगलादेशात हिंदू समाजावर होत असलेल्या अत्याचारांनंतरही आयपीएलदरम्यान बांगलादेशी खेळाडूंना संधी दिली जात आहे आणि त्यांना मोठी रक्कमही मिळत आहे. त्यांनी मागणी केली की, ज्याप्रमाणे पाकिस्तानचे खेळाडू आयपीएलमध्ये सहभागी होत नाहीत, त्याचप्रमाणे बांगलादेशी खेळाडूंवरही आयपीएलदरम्यान बंदी घालावी.

# वैभव सूर्यवंशी अंडर-१९ टीम इंडियाचा कर्णधार बनला

## दक्षिण आफ्रिका दौऱ्यासाठी मिळाली कमान

■ **वृत्तसंस्था,मुंबई, दि. २७:**

14 वर्षांच्या वैभव सूर्यवंशीला भारतीय अंडर-19 संघाचा कर्णधार बनवण्यात आले आहे. तो दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर संघाचे नेतृत्व करेल. 3 एकदिवसीय सामन्यांची ही मालिका 3 जानेवारीपासून सुरू होईल. मात्र, वैभव 15 जानेवारीपासून सुरू होणाऱ्या अंडर-19 विश्वचषकात कर्णधारपद भूषवणार नाही.



बीसीसीआयने शनिवारी दक्षिण आफ्रिका दौरा आणि अंडर-19 विश्वचषकासाठी संघाची घोषणा केली आहे. बोडार्ने विश्वचषकासाठी टीम इंडियाचे कर्णधारपद आयुष म्हात्रेला सोपवले आहे. विहान मल्होत्राला उपकर्णधार बनवण्यात आले आहे. टीम इंडिया 15 जानेवारी रोजी यूएसएविरुद्ध आपल्या विश्वचषक मोहिमेची सुरुवात करेल. दुसरा सामना 17 जानेवारी रोजी बांगलादेशविरुद्ध आणि तिसरा सामना 24 जानेवारी रोजी न्यूझीलंडविरुद्ध खेळला जाईल.

एक दिवस आधी, बिहारच्या वैभव सूर्यवंशीला राष्ट्रपतींच्या हस्ते बाल पुरस्कार प्रदान करण्यात आला. एक दिवस आधी, बिहारच्या वैभव सूर्यवंशीला राष्ट्रपतींच्या हस्ते बाल पुरस्कार प्रदान करण्यात आला. विश्वचषकापूर्वी दोन कर्णधार का बीसीसीआयने एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, नियमित युवा संघाचे कर्णधार आयुष म्हात्रे आणि विहान मल्होत्रा यांना मनगटाच्या दुखापती झाल्या आहेत. त्यामुळे त्यांना दक्षिण आफ्रिका दौऱ्यातून बाहेर पडावे लागेल.

# गौतम गंभीर भारताचा कसोटी प्रशिक्षक म्हणून कायम राहणार

■ **वृत्तसंस्था, क्रीडा डेस्क, दि. २७:** क्रीडा डेस्क3 तासांपूर्वी



गौतम गंभीर भारताचा कसोटी प्रशिक्षक म्हणून राहील. बीसीसीआय सचिव देवजीत सैकिया यांनी स्पष्ट केले आहे की, कसोटी संघाचा नवा प्रशिक्षक म्हणून व्हीव्हीएस लक्ष्मणशी संपर्क साधल्याच्या बातम्या पूर्णपणे चुकीच्या आणि निराधार आहेत. ते म्हणाले की, बोडार्ने कसोटी संघाच्या नेतृत्त्व गटात बदल करण्याबाबत कोणताही निर्णय घेतलेला नाही.

सैकिया यांनी एएनआयशी बोलताना सांगितले की, ही बातमी पूर्णपणे तथ्यहीन आहे. काही प्रतिष्ठित माध्यम संस्था देखील ही बातमी चालवत आहेत, परंतु यात कोणतेही सत्य नाही. बीसीसीआय याचे थेट खंडन करते. ही केवळ कल्पनेवर आधारित बातमी आहे.

अलीकडच्या काळात अनेक मीडिया रिपोर्ट्समध्ये दावा करण्यात आला होता की, कसोटी संघाच्या खराब कामगिरीनंतर व्हीव्हीएस लक्ष्मणला पुढील कसोटी प्रशिक्षक बनवले जाऊ शकते. भारताला मायदेशात दक्षिण आफ्रिकेकडून 2-0 ने कसोटी मालिका गमवावी लागल्यानंतर या अटकळी समोर आल्या. यापूर्वी न्यूझीलंडविरुद्धही संघाला 0-3 ने पराभवाला सामोरे जावे लागले होते.

पुढील गोष्टींबद्दल बोलायचे झाल्यास, सध्या भारतासमोरील सर्वात मोठे आव्हान कसोटी नाही, तर टी-20 विश्वचषक आहे. संघ आपल्या विजेतेपदाचे रक्षण करेल. यावेळी संघाची कमान सूर्यकुमार यादवच्या हातात असेल. स्पर्धा 7 फेब्रुवारीपासून सुरू होईल आणि भारत आपला पहिला सामना त्याच दिवशी मुंबईत अमेरिकेविरुद्ध खेळेल.

# कार्लसनने रागाने कॅमेरामॅनला धक्का दिला

■ **वृत्तसंस्था,स्पोर्ट्स डेस्क, दि. २७:**

वर्ल्ड रॅपिड चॅम्पियनशिपमध्ये पराभव झाल्यानंतर वर्ल्ड नंबर-1 आणि 5 वेळा चॅम्पियन मॅग्नस कार्लसन रागावलेले दिसले. रशियाच्या व्लादिस्लाव आर्टेमिएवविरुद्धचा सामना हरल्यानंतर बाहेर जाताना त्यांनी कॅमेरामॅनला धक्का दिला. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल होत आहे.

कतारची राजधानी दोहा येथे शनिवारी राउंड-7 मध्ये कार्लसनने 15व्या चालीवर मोठी चूक केली, ज्याचा फायदा घेऊन आर्टेमिएवने सामना जिंकला. या विजयासह आर्टेमिएव 6.5 गुण मिळवून इतर खेळाडूंपेक्षा एक गुण पुढे गेले.

पराभवानंतर कार्लसन खूप नाराज दिसले आणि खेळण्याच्या हॉलमधून वेगाने बाहेर पडले. बाहेर जाताना एक कॅमेरामॅन त्यांच्या मागे-मागे चालत होता. याच दरम्यान रागाने कार्लसनने कॅमेरामॅनला धक्का दिला.

स्पर्धेत कार्लसनची सुरुवात दमदार झाली होती. पहिल्या दिवशी त्यांनी 5 पैकी 4.5 गुण मिळवले. मात्र, दुस?्या दिवशी त्यांची कामगिरी खालावली. राउंड-6 मध्ये त्यांनी फ्रान्सच्या मॅक्सिम वाचियर-लाग्रेवविरुद्ध ड्रॉ खेळला.

# मेलबर्न कसोटी २ दिवसांत संपली

■ **वृत्तसंस्था,मेलबर्न, दि. २७:**



ॲशेस मालिकेतील चौथा कसोटी सामना अवघ्या दोन दिवसांत संपला आहे. मेलबर्न क्रिकेट ग्राउंडवर शनिवारी इंग्लंडने ऑस्ट्रेलियाचा 4 गडी राखून पराभव केला.

या सामन्याच्या दुसऱ्या दिवशी 16 बळी पडले, तर पहिल्या दिवशी 20 बळी पडले होते. यात कोणताही फलंदाज 50 धावांचा टप्पा पार करू शकला नाही. इतकंच नाही, तर 4 डावांमध्ये 200 धावांचा टप्पाही पार झाला नाही.

अशा परिस्थितीत मेलबर्न क्रिकेट ग्राउंडच्या खेळपट्टीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. इंग्लंडचा माजी कर्णधार केविन पीटरसन, मायकल वॉन, दिनेश कार्तिक यांनी सोशल मीडियावर प्रश्न उपस्थित केले आहेत. वॉनने लिहिले - ही खेळपट्टी आहे की विनोद?

36 पैकी 35 विकेट वेगवान गोलंदाजांना मिळाले. एमसीजी खेळपट्टीवर 10 मिमी गवत ठेवण्याच्या निर्णयामुळे खेळपट्टीवरून वेगवान गोलंदाजांना खूप फायदा झाला. यामुळे फलंदाजी करणे कठीण झाले होते. या सामन्यात 35 विकेट वेगवान गोलंदाजांना मिळाल्या आहेत, तर एक फलंदाज धावबाद झाला.

ॲशेसचे पहिले तीन सामनेही एकूण 11 दिवस चालले. अशा प्रकारे, सध्याच्या मालिकेत एकूण 20 सामन्यांच्या दिवसांपैकी केवळ 13 दिवसच खेळ होऊ शकला आहे. पर्थमध्ये खेळला गेलेला पहिला कसोटी सामनाही दोन दिवसांत संपला होता.

इंग्लंडचे माजी कर्णधार पीटरसन यांनी वर लिहिले, 'भारतात जेव्हा कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी अनेक विकेट पडतात, तेव्हा भारताला नेहमीच कठोर टीकेला सामोरे जावे लागते. त्यामुळे मला आशा आहे की ऑस्ट्रेलियालाही त्याच प्रकारच्या टीकेला सामोरे जावे लागेल. न्याय सर्वांसाठी समान असावा.'

# ऑस्ट्रेलियात १८ सामन्यानंतर इंग्लंडचा विजय

■ **वृत्तसंस्था,क्रीडा डेस्क, दि. २७:**



इंग्लंडने ॲशेस मालिकेतील चौथ्या कसोटीत ऑस्ट्रेलियाचा 4 गडी राखून पराभव केला. यासोबतच इंग्लंडने ऑस्ट्रेलियामध्ये 18 कसोटी सामन्यांपासून सुरू असलेली विजयाची प्रतीक्षा संपवली. यापूर्वी इंग्लंडला ऑस्ट्रेलियामध्ये शेवटचा कसोटी विजय 2011 मध्ये सिडनी येथे मिळाला होता.

त्यानंतर खेळल्या गेलेल्या 18 कसोटी सामन्यांमध्ये ऑस्ट्रेलियाने 16 सामने जिंकले, तर 2 सामने अनिर्णित राहिले. इंग्लंडचा हा विजयाविना असलेला काळ 2013-14 च्या ॲशेस मालिकेत 5-0 ने पराभव झाल्यानंतर सुरू झाला होता.

सामन्याच्या दुसऱ्या दिवशी शनिवारी ऑस्ट्रेलियाने इंग्लंडला विजयासाठी 175 धावांचे लक्ष्य दिले होते, जे इंग्लिश संघाने 6 गडी गमावून पूर्ण केले. मेलबर्न क्रिकेट ग्राउंडवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात ऑस्ट्रेलिया दुस?्या डावात 132 धावांवर सर्वबाद झाली होती. यापूर्वी ऑस्ट्रेलिया पहिल्या डावात 152 धावांवर बाद झाली होती, तर इंग्लंड पहिल्या डावात केवळ 110 धावाच करू शकला होता.

अशा प्रकारे ऑस्ट्रेलियाला पहिल्या डावात 42 धावांची आघाडी मिळाली होती, पण दुसऱ्या डावात इंग्लंडने शानदार पुनरागमन करत सामना आपल्या नावावर केला. सामन्यात एकूण 7 बळी घेणाऱ्या इंग्लिश वेगवान गोलंदाज जोश टंगला सामनावीर म्हणून निवडण्यात आले.

175 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडला दुस?्या डावात चांगली सुरुवात मिळाली. संघाला पहिला धक्का 51 धावांवर बसला. मिचेल स्टार्कने बेन डकेटला क्लीन बोल्ड केले. त्याने 26 चेंडूंमध्ये 34 धावा केल्या. ब्रायडन सहा धावा करून जे रिचर्डसनचा बळी ठरला.


# आज का अंदाज

## सोमवार २९ डिसेंबर २०२५

आजच कल्याणसाठी: स्पेशल जोडी, पॉवरफुल जोडी, 100% गॅरंटी जोडी

आजच मुंबईसाठी: पॉवर जोडी, धमाका जोडी, 100% गॅरंटी जोडी

जबरदस्त पास होणारे चान्सेस २९ डिसेंबर

## सोमवार २९ डिसेंबर २०२५

सर्व बाजार साठी — आजच कल्याणसाठी धमाका जोडी पॉवर जोडी

सर्व बाजारांसाठी

| सोम. ते बुध. ओपन डे | | | सोम. ते बुध. ओपन नाईट | | |
|---|---|---|---|---|---|
| १२९ | ४७० | १५९ | ९०० | ३७० | ५५८ |
| २०० २ | ५६० १ | २५८ ५ | २३४ ९ | ४६० ० | ३५० ८ |
| ३९० | ३८० | ३५७ | ३६० | ५५० | २६० |

सर्व बाजारांसाठी

| सोम. ते बुध. क्लोज डे | | | सोम. ते बुध. क्लोज नाईट | | |
|---|---|---|---|---|---|
| १३९ | ६९० | २५० | १४९ | १२३ | ४५० |
| २३८ ३ | ७८० ५ | ३४० ७ | २६६ ४ | २६८ ६ | ५५९ ९ |
| ३३७ | ५०० | १६० | ३३८ | ३६७ | ३६० |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

१ - २ - ९ - ८ - ०

जबरदस्त पास होणारे चान्सेस

प्रो. बालाजी कुमार 9822486034


# आजचे राशिभविष्य

**मेष :** आज खूप एनर्जेटिक वाटेल. जर तुम्ही अधिक उत्साहाने, मन लावून काम केलं तर तुमचं काम कमी वेळेत पूर्ण होईल. तुमच्या जोडीदाराच्या आयुष्यात होणारे बदल आनंद आणतील.

**वृषभ :** तुम्ही बिझनेसच्या कामासाठी परदेशातही जाऊ शकता. तुमची मुले आज चांगली बातमी देतील, ज्यामुळे अभिमान वाटेल. राजकारणात गुंतलेल्यांसाठी आजचा दिवस चांगला असेल.

**मिथुन :** आजचा दिवस प्रवासात जाईल. ही सहल ऑफिसच्या कामाशी संबंधित असू शकते. प्रवासादरम्यान, तुमची एखाद्या दूरच्या नातेवाईकाशी भेट होऊ शकते.

**कर्क :** घरात सुरू असलेल्या कोणत्याही वैवाहिक समस्या लवकरच दूर होतील. कालपेक्षा आजचा दिवस चांगला असेल. जुने नातेवाईक अचानक भेटू शकतात.

**सिंह :** आज आनंद मिळवण्यासाठी तुम्हाला तुमच्या व्यक्तिमत्त्वात काही बदल करावे लागतील. आर्थिक परिस्थिती आज सुधारेल. जुन्या ठेवी मॅच्युअर झाल्याने आर्थिक लाभ होऊ शकतो.

**कन्या :** जर तुम्ही नोकरी करत असाल तर तुमची बदली होऊ शकते, प्रवासात वेळ जाऊ शकतो. आज तुमचा एखादा जुना मित्र तुम्हाला भेटू शकतो. दिवस आनंदात जाईल.

**तूळ :** आज तुम्ही घरगुती वस्तूंवर जास्त पैसे खर्च कराल. तुम्हाला चांगल्या नोकरीच्या ऑफर मिळतील. तुमच्या पालकांचे आशीर्वाद मिळाल्याने तुम्हाला तुमचे ध्येय साध्य करण्यास मदत होईल.

**वृश्चिक :** कामाच्या ठिकाणी येणारे अडथळे पार करण्याचा प्रयत्न करा. आज, तुमच्या आंतरिक शक्तीमुळे तुमचा दिवस चांगला जाण्यास मदत होईल.


**धनु :** आज, तुमची सर्व कामे तुमच्या इच्छेनुसार पूर्ण होतील. तुम्हाला एखादा जुना मित्र भेटू शकतो ज्याच्यासोबत तुम्ही फिरायला जाऊ शकता. व्यवसायात आर्थिक लाभाची संधी मिळू शकते.

**मकर :** आज तुमच्या घरी एखाद्या मोठ्या व्यवसायाच्या निमित्ताने एक छोटी पार्टी होऊ शकते. तुमच्या कुटुंबाकडून तुम्हाला पूर्ण पाठिंबा मिळेल.

**कुंभ :** तुम्ही घरी एखाद्या धार्मिक कार्यक्रमाचे नियोजन करू शकता. आर्किटेक्टसाठी दिवस महत्वाचा असेल, मोठी ऑफर मिळेल.

**मीन :** आज, व्यवसायात मोठा नफा मिळू शकतो जो तुमचा नफा दुप्पट करू शकतो. आजचा दिवस प्रेम जोडीदारांसाठी अनुकूल आहे. तुम्ही मित्रांसोबत बाहेर जाण्याची योजना आखू शकता.

# शब्दकोडे क्रमांक २३०७



**आडवे शब्द :-**

१) कमळ
३) नीच मनुष्य
६) फुरसद, संधी, मोका
८) उघड उघड
९) खोडातील द्रव
११) आगबोट
१२) चाणक्यनीती
१५) केस
१६) किंमत
१७) करमणूक
१८) चांगली वागणूक
२१) कशा प्रकारच्या
२२) लक्ष्मी
२४) प्रत्येक दिवशी
२६) उमर
२७) रेशमी धोतर
२८) दूर करणारा
३०) विहीरीतून पाणी काढण्याचे भांडे
३२) केर
३४) भक्कम, मजबूत
३६) पोते, गोणपाट
३९) गाय
४०) नवरदेव
४२) नेहमी
४३) गौरव
४४) हार, सर
४६) कुठल्या बाजूस
४८) नवरा
४९) पुरणे (जमिनीत)
५०) गवंडी
५२) जळलेले पीक
५३) शीळाच्या विरुद्ध
५४) अकस्मात
५६) बशीच्या बरोबरचे साधन
५९) एक रंगीत कंदमूळ
६०) उलट, विरुद्ध
६२) दार
६३) रांग, ओळ (हिंदी)

**उभे शब्द**

१) समाजात सुधारणा करणारा
२) म्हातारपणामुळे त्रासलेला
३) धर्माने युद्धात उच्चारलेले दोन अर्थाचे वाक्य
४) ढीग
५) जखमेवर लावायचा बाम
७) फावला वेळ
१०) शंकरावे एक नाव
१२) प्रामाणिक
१३) भेदणारा
१४) प्रत्येक वर्षी
१९) क्षमा
२०) पती-पत्नी
२३) नशा आणणारा
२५) धाक, भीती
२८) आधार नसलेला
२९) वेदनेनें ओरडणे
३०) उदर
३१) व्यापार, व्यवसाय
३३) अतर्क्य गोष्ट घडणे
३५) हात
३७) सुंदर तरुणी
३८) घसा
४३) एक तारवाद्य
४४) नारळाचं झाड
४५) अनाचार
४७) कीर्तनकार
४८) फिरणे
४९) गवगवा
५१) लोक
५४) आगळेवेगळे
५५) काव्य
५७) पडणे, ऱ्हास
५८) निवासस्थान
६१) पंख

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# कॅलिडोस्कोप




## कोंबडीचे अंडे इतके महाग?

ऐयम सेमानी ही इंडोनेशियामध्ये आढळणारी कोंबडी आहे. ही कोंबडी आपल्या अतुलनीय सौंदर्य आणि रहस्यमयी काळ्या रंगासाठी प्रसिद्ध आहे. आश्चर्याची बाब म्हणजे या कोंबडीची फक्त पिसेच नव्हे, तर चोच, हाडे, मांस आणि अगदी अंतर्गत अवयवही कोळशासारखे काळे असतात. या दुर्मीळ जनुकीय स्थितीला फायब्रोमेलॅनोसिस म्हणतात. हाच अनोखा गुण या कोंबडीला इतकी मौल्यवान बनवतो.

ऐयम सेमानी कोंबडीचे मांस आणि कोंबडा हजारो रुपयांमध्ये विकला जातो तरीही त्याचे अंडे तुलनेने 'स्वस्त' आहे; पण सामान्य अंड्यांपेक्षा खूपच महाग आहे. या कोंबडीचे एक पिलू २०० डॉलर (सुमारे १६,५०० रुपये) पर्यंत विकले जाते. तर एक अंडे अमेरिका आणि युरोपीयन बाजारात ३० ते ५० डॉलर (अंदाजे २,५०० ते ४,१०० रुपये) मध्ये विकले जाते.

जगात ज्या कोंबडीची अंडी सर्वात महाग विकली जातात, त्या अत्यंत दुर्मीळ असतात आणि त्यांच्याबद्दल आरोग्यदायी दावे केले जातात. इतके महाग असण्याचे मुख्य कारण म्हणजे मर्यादित पुरवठ्याच्या तुलनेत प्रचंड मागणी. ऐयम सेमानी व्यतिरिक्तही अनेक कोंबड्या आहेत, ज्यांची किंमत शौकिन आणि प्रजनकांमध्ये खूप जास्त असते. जगातील सर्वात महागड्या कोंबड्यांमध्ये ऐयम सेमानी नंतर डोंग ताओ कोंबडी आहे. डोंग ताओ कोंबडे त्यांच्या जाड-खरखरीत पायांसाठी प्रसिद्ध आहेत. व्हिएतनाममध्ये त्याची किंमत १,६६,६६० रुपयांपर्यंत पोहोचते. त्यानंतर डेथलेयर कोंबडी येते. तिची किंमत २०,००० रुपयांपेक्षा जास्त असते. ती उत्तम अंडी देण्याच्या क्षमतेमुळे लोकप्रिय आहे. इतर महागड्या कोंबड्या लीज फायटर, ओरपिंग्टन, ओलँडस्क ड्वार्फ आणि स्वीडिश ब्लॅक यांचा समावेश आहे. त्यांच्या किंमती ८,००० ते १२,५०० रुपये दरम्यान असतात. या सर्वांना त्यांच्या सौंदर्य, दुर्मीळपणा किंवा लढण्याच्या क्षमतेसाठी ओळखले जाते.



## काबा शरीफ अवकाशातून दिसते हिऱ्यासारखे!

पृथ्वीवरील अनेक महत्त्वाच्या जागा अवकाशातून दिसतात. त्यात चीनची भिंत आणि पिरॅमिड आदींचा समावेश होतो, पण या वेळी अंतराळातून आलेल्या एका फोटोने लोकांना आश्चर्यचकित केले आहे. सौदी अरेबियातील मक्का येथील मस्जिद अल-हरममध्ये असलेले काबा शरीफ अवकाशातून जमिनीवर ताऱ्यासारखे चमकताना दिसले. हे फोटो आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत आणि युजर्स त्यावर विविध प्रतिक्रिया देत आहेत.

अंतराळवीर डॉन पेटिट यांनी जमिनीपासून ४०० किलोमीटर उंचीवरून घेतलेल्या फोटोमध्ये सौदी अरेबियातील मक्का येथील काबा शरीफचे छायाचित्र काढले. या वर्षी २२० दिवसांच्या अंतराळ प्रवासातून परतलेले शास्त्रज्ञ आणि छायाचित्रकार डॉन पेटिट यांनी 'सोशल मीडिया'वर हा फोटो शेअर केला आहे. तो आता जगभरात व्हायरल होत आहे. हा फोटो मक्केचा आहे. त्यात काबा हिऱ्यासारखा चमकताना दिसत आहे. फोटो शेअर करताना पेटिट यांनी लिहिले, हे अवकाशातून सौदी अरेबियातील मक्काचे दृश्य आहे. इस्लामचे पवित्र स्थळ असलेल्या मरकज आणि काबा येथील दिवे अवकाशातूनही दिसतात.

**काबा आणि मक्का खास का?**

काबा या ठिकाणी मुस्लिम दरवर्षी हज आणि उमराहसाठी प्रवास करतात. काबा प्रदक्षिणा करतात आणि त्यांची हज यात्रा पूर्ण करतात. दरवर्षी, हजारो लोक भारतातून हज यात्रेसाठी निघतात आणि मक्का किंवा मदिना येथे पोहोचतात. तिथे अंदाजे ४० दिवसांची हज यात्रा सुरू होते.

## पत्नीला फसवून प्रेयसीबरोबर!

'सोशल मीडिया'वर एक धक्कादायक आणि संतापजनक कहाणी व्हायरल होत आहे. एका मलेशियन पुरूषाने आपल्या गर्भवती पत्नीला सहकाऱ्यांसोबत कामानिमित्त सहलीवर जात असल्याचे सांगितले, पण सत्य काही वेगळेच निघाले. तो एका भीषण पुरात अडकला, तेव्हा त्याच्या पत्नीने मदतीसाठी लोकांशी संपर्क साधला, पण नंतर गुपित उघड झाले. पत्नीला वाटले, तिचा नवरा खरोखरच अडकला आहे, परंतु तिला कळले की तो चार दिवसांपासून थायलंडमधील हात याई येथील एका हॉटेलमध्ये सहकाऱ्यासोबत नाही तर त्याच्या मैत्रिणीसोबत राहत होता.

त्याला गर्भवती पत्नीशी खोटे बोलणे महागात पडले. त्याची पत्नी चौथ्यांदा गर्भवती होती. तिने त्याच्यावर विश्वास ठेवला आणि त्याला जाण्याची परवानगी दिली, पण हात याईमध्ये भीषण पूर आला.



त्याच्याशी संपर्क होऊ शकला नाही तेव्हा पत्नी अत्यंत अस्वस्थ झाली. मदतीसाठी तिने 'स्मोमिहना' (psmommyhannah) नावाच्या 'सोशल मीडिया'वरील एका महिलेशी संपर्क साधला. तेव्हा हे रहस्य उघड झाले.

ही महिला पूर बचावकार्याची माहिती शेअर करत होती. पत्नीने या महिलेला तिचा नवरा अडकला असल्याचे सांगितले. पत्नीने तिच्या पतीने सांगितलेल्या गोष्टींवरून हॉटेलचे नाव आणि माहिती दिली. नातेवाइक हॉटेलमध्ये आले तेव्हा सत्य पूर्णपणे वेगळे होते. त्या पुरूषाने आपल्या पत्नीला सांगितलेली 'सहकारी' प्रत्यक्षात एक महिला होती आणि ती गेल्या चार दिवसांपासून त्याच्यासोबत हॉटेलची खोली शेअर करत होती. पत्नीला या सत्याची काहीच कल्पना नव्हती. ही कहाणी लोकांचे मनोरंजन करण्यासाठी नाही, तर त्यांना सावध करण्यासाठी शेअर करत असल्याचे महिलेने म्हटले आहे.

## गोष्ट चहाच्या जन्माची

वाफाळत्या चहाने दिवसाची सुरूवात करणाऱ्या लोकांची संख्या प्रचंड मोठी आहे. चहा अनेकांचा वीक पॉईंट असतो. भारतात चहाबाजांची कमतरता नाही. आज चहा अनेक ठिकाणी उपलब्ध आहे. अनेक देशांमध्ये चहा प्यायला जातो. पण चहाचा शोध कसा लागला? हे पेयं सर्वात आधी कोणी प्यायला सुरूवात केली? चहाचा प्रचार आणि प्रसार कसा झाला,हे आपल्याला माहित नसतं. चला तर मग... चहाबद्दलची रंजक माहिती जाणून घेऊ या.

चहाचा शोध तब्बल ४७०० वर्षांपूर्वी लागल्याचं बोललं जातं. पण सुरूवातीच्या काळात चहा हे शाही पेयं होतं. राजेरजवाडे चहा पित असत. आज सर्वसामान्यांचं पेयं अशी चहाची ओळख असली तरी त्याचा इतिहास काहीतरी वेगळंच सांगतो. मुळात चहाचा शोध चुकून लागला. पूर्व चीनचा दुसरा राजा शेन नूंगला चुकून चहाचा शोध लागला होता. करायला गेलो एक आणि झालं भलतंच असं त्याच्या बाबत घडलं. शेन गरम पाणी पित असे. पण एकदा शेनसाठी पाणी गरम होत असताना त्यात चहाची पानं पडली. यामुळे पाण्याला छान रंग आला, गंध आला. हे पेयं पिऊन



शेनला तरतरी आली. शेनला हे पेयं खूप आवडलं. याबाबत त्याने सेवकाला विचारलं. तेव्हा त्याने काही पानं पाण्यात पडल्याचं सांगितलं. तेव्हापासून शेन चहा पिऊ लागला. ४७०० वर्षांपूर्वी चीनमध्ये चहाचा शोध लागला असला तरी नवव्या शतकापर्यंत उर्वरित जगाला या चहाची काहीच माहिती नव्हती. चीनने हे पेयं लपवून ठेवलं होतं. मग शेजारी जपानला या पेयाची माहिती मिळाली. मग हळूहळू चहा जगभरात पोहोचला. भारतात आसाम, पश्चिम बंगालमध्ये चहाचे मळे असल्याचं आपण जाणतो. पण देशातली १६ राज्यं चहाचं उत्पादन घेतात. चहाच्या बाबतीत भारताने चीनला मागे टाकलं आहे. भारतीय मसाला चहा जगभरात लोकप्रिय झाला आहे.

## वरातीपूर्वी वराला स्तनपान!



भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. देशात अनेक धर्म, जाती, भाषा, संस्कृती, परंपरा आणि प्रथा आपल्याला दिसून येतात. भारतातील विविध राज्यांमधील विविध परंपरादेखील आपण पाहिल्या असतील. काही अजब परंपरा पाहून आपल्याला धक्का बसतो. एका प्रथेनुसार, लग्नावेळी नवरदेव जेव्हा वरातीसाठी घोडीवर बसणार असतो, त्याआधी त्याला त्याची आई स्तनपान करते. ही प्रथा प्रामुख्याने राजस्थानमधील काही समुदायांमध्ये, हरियाणातील काही गावांत आणि पश्चिम नेपाळच्या काही भागात दिसून येते. प्रत्येक ठिकाणी याची पद्धती काहीशी वेगवेगळी आढळते. काही ठिकाणी प्रत्यक्षरित्या असे केले जात नाही, केवळ प्रतीकात्मरित्या ही प्रथा पाळली जाते.

**या प्रथेमागेचा नेमका अर्थ काय?**

आई मुलाची पहिली गुरू आणि जीवन देणारी असते. पूर्वीच्या काळी लोक ही बाब अतिशय गांभीर्याने आणि भावनिकरित्या मानत होते. त्या वेळी ही प्रथा हे आईकडून मुलाला दिले गेलेले शेवटचे पोषण आहे, या गोष्टीचा संकेत मानली जात होती. लग्नानंतर मुलगा आपल्या नवीन आयुष्याकडे वळतो. त्यामुळे या प्रथेत एकप्रकारे निरोप देण्याची भावनादेखील असते. याशिवाय, लग्नानंतरही आई आणि मुलाचे नाते दृढ राहते. पत्नी आल्यानंतरही आईचे प्रेम मुलाने विसरता कामा नये, असा या प्रथेचा उद्देश आहे. आईला मुलाची पहिली गुरू आणि जीवनदाता मानले जाते आणि पूर्वी लोक याबाबत फार गंभीरही होते. त्यामुळे हा विधी आईने तिच्या मुलाला दिलल्या 'शेवटच्या आहारा'चे प्रतीक मानला जात असे. लग्नानंतर मुलगा त्याच्या नवीन आयुष्यात प्रवेश करतो, म्हणून या विधीकडे निरोपाचा एक प्रकार म्हणून देखील पाहिले जायचे.

## कोणीतरी आहे तिथे...

भारतातल्या काही किल्ल्यांमध्ये भुतांचा वावर असल्याचं ऐकायला मिळतं. तसंच काही हॉटेल्सही भीतीदायक आहेत. पश्चिम बंगालमधल्या कालिम्पोंग या थंड हवेच्या ठिकाणी मॉर्गन हाऊस आहे. या ठिकाणी जॉर्ज मॉर्गन आपल्या पत्नीसोबत राहात असत. पत्नीच्या निधनानंतर मॉर्गन यांनी हे ठिकाण सोडलं. मग या बंगल्याचं रूपांतर लॉजमध्ये करण्यात आलं. पण इथे काही भीतीदायक घटना घडल्याचं लोकांचं म्हणणं आहे. एका स्त्रीच्या चपलांचा आवाज ऐकल्याचा दावा काहींनी केला आहे. हैदराबादमध्ये रामोजी फिल्मसिटीची निर्मिती निजामांच्या युद्धक्षेत्रावर झाली आहे. त्यामुळे इथे बरेच मृत्यू झाले आहेत. रामोजी फिल्मसिटीत असलेल्या हॉटेलांमध्ये चित्रविचित्र घटना घडत असल्याचं काहींचं म्हणणं आहे. राजस्थानातल्या कोटामध्ये ब्रिजराज भवन आहे. या




ठिकाणी चार्ल्स बर्टन नावाचा ब्रिटिश अधिकारी राहात असे. १८५७ च्या उठावादरम्यान बर्टन आणि त्याच्या कुटुंबाची या ठिकाणी हत्या करण्यात आली होती. या स्थानाचं रूपांतर हॉटेलमध्ये करण्यात आलं.

या ठिकाणी बर्टनची आत्मा येत असल्याचं बोललं जातं. उत्तराखंडमधल्या मसूरीमध्ये सवॉय हॉटेल आहे. या हॉटेलमध्ये ब्रिटिश महिलेची आत्मा भटकत असल्याचा दावा केला जातो. मुंबईतल्या ताज हॉटेलमध्येही चित्रविचित्र घटना घडत असल्याचं इथल्या कर्मचाऱ्यांचं म्हणणं आहे. लोणावळ्यातलं राजकिरण हॉटेलही अशाच घटनांसाठी प्रसिद्ध आहे.

## विक्रीसाठी सडलेले पदार्थ

जगभरात खवैय्यांची कमतरता नाही. मस्त, चविष्ट पदार्थ खाण्याची चढाओढ अनेक ठिकाणी पहायला मिळते. पण तुमच्या पुढ्यात सडलेले पदार्थ आणून ठेवले तर? पदार्थाला थोडा जरी वास येत असेल तर आपल्याला नको वाटतं. खाण्यापिण्याच्या बाबतीत स्वच्छता राखण्यावर आपला भर असतो. अशा परिस्थितीत सडलेलं अन्न कोण खाणार? पण प्रत्यक्षात सडलेले पदार्थ विक्रीसाठी उपलब्ध आहेत. सडलेलं अन्न खाल्ल्याने आतड्यांमध्ये चांगल्या बॅक्टेरियांचा वास राहतो, असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. पदार्थ सडवून बनवण्यात आलेल्या पदार्थांवर एक नजर टाकू या.

पनीरचे पदार्थ आपण आवडीने खातो. इटलीतल्या सार्डिनियन भागात कासू मार्जू नावाचा पदार्थ मिळतो. हा पदार्थ पनीरपासून तयार केलेला असतो. पण हा पदार्थ बनवण्यासाठी पनीर अक्षरशः सडवलं जातं. या पनीरमध्ये किडे पडलेले असतात. या पदार्थामध्ये जीवंत किडे असतात. युरोपमध्ये स्वच्छतेची खूप काळजी घेतली जाते. इथल्या नियमांनुसार असे सडलेले पदार्थ बनवता येत नाहीत. पण या पदार्थामुळे भूक वाढते असं म्हणतात.



यातले किडे उड्या मारत असतात. त्यामुळे हा पदार्थ काळजीपूर्वक खावा लागतो. हा पदार्थ आवडीने खाणारे लोक आहेत.

जपानमध्ये एन आत्तो नावाचा पदार्थ बनवला जातो. हा जपानमधला पारंपरिक पदार्थ आहे. हा पदार्थ सोयापासून बनवला जातो. यासाठी सोया सडवलं जातं. जपानमध्ये नाश्त्याला हा पदार्थ खाल्ला जातो. हा पदार्थ बघून आपल्याला उबग येईल.

स्वीडनमध्ये सरस्ट्रोमिंग हा पदार्थ खाल्ला जातो. या पदार्थाला प्रचंड दुर्गंधी येते. म्हणूनच हा पदार्थ घराबाहेर खाल्ला जातो. हा पदार्थ बनवण्याची पद्धत १९ व्या शतकात शोधण्यात आली. हा पदार्थ बनवण्यासाठी पूर्वीच्या काळी मीठाच्या पाण्यात विशिष्ट प्रकारचा मासा सडवला जात असे. त्यापासून हा पदार्थ बनायचा. आता सीलबंद डब्यात मासा सडवला जातो.

चीनमधले लोक जुनी, सडलेली अंडी खातात. महिनोंमहिने ही अंडी तशीच ठेवली जातात. बदकाची अंडी कॅल्शियम ऑक्साईडमध्ये ठेवा. या अंड्यांपर्यंत ऑक्सिजन पोहोचता कामा नये. ही अंडी कोरड्या जागी ठेवा. ही अंडी सडतात.



## दगड नव्हे, हे तर उल्कापिंड

रस्त्यावरून चालताना आपल्याला एखादा दगड दिसला, हा दगड आपण घरी आणला आणि काही वर्षांनी तो विकला. यानंतर आपल्याला कळलं की हा दगड अत्यंत दुर्मीळ असून त्याची किंमत लाखो रूपयांच्या घरात आहे. अशा परिस्थिती आपण काय प्रतिक्रिया देऊ? मिशिगनमधल्या एका व्यक्तीच्या बाबतीतही असंच काहीसं घडलं आहे. साधारण ३० वर्षांपूर्वी या व्यक्तीला आपल्या शेतात १० किलो वजनाचा दगड आढळून आला. वेगळ्या प्रकारचा हा दगड तो घरी घेऊन आला. १९८८ मध्ये या व्यक्तीने आपली सर्व संपत्ती विकून टाकली. ही संपत्ती खरेदी केलेल्या इसमाने हा दगडही घेतला आणि दरवाजाला आधार म्हणून त्याचा वापर करू लागला. हा दगड वेगळा वाटत असल्याने त्याची तपासणी करून घेण्याचा विचार त्याच्या मनात आला. मिशिगन विद्यापीठातल्या संशोधकांनी हा दगड अभ्यासला. दगडाचा आकार बघून शास्त्रज्ञांनाही धक्का बसला. त्याची रासायनिक तपासणी केल्यानंतर हा दगड नसून उल्कापिंड असल्याची बाब शास्त्रज्ञांच्या लक्षात आली. तसंच त्यात ८८ टक्के लोखंड, १२ टक्के निकल आणि काही प्रमाणात इतर मौल्यवान धातू असल्याचं संशोधनातून समोर आलं.

या दगडाचा काही भाग अधिक तपासणीसाठी वॉशिंग्टनमधल्या स्मिथसोनियन संस्थेत पाठवण्यात आला. या दगडाची किंमत एक लाख डॉलर म्हणजे तब्बल ७४ लाख रूपये असल्याचं यावेळी समोर आलं. ॲडमोर या स्थानी हा दगड सापडला होता. त्यामुळे तो आता ॲडमोर नावाने ओळखला जाणार आहे.यावर अधिक संशोधन करण्यात येणार आहे.


## लवकर गेल्याने नोकरी गमावली!

स्पेनमध्ये अलिकडेच झालेल्या एका घटनेने अनेकांना धक्का बसला. आपण अनेकदा कर्मचाऱ्यांना उशिरा पोहोचल्याबद्दल फटकारल्याचे किंवा कामावरून काढून टाकल्याचे ऐकतो. पण लवकर पोहोचल्याबद्दल कोणी नोकरी गमावू शकते? भारतात कल्पना करणे कठीण आहे, परंतु एका स्पॅनिश कंपनीने असेच केले. एका तरुणीला तिच्या बॉसच्या इशाऱ्याला न जुमानता दररोज ऑफिसमध्ये लवकर पोहोचल्यामुळे कामावरून काढून टाकण्यात आले.

ही २२ वर्षीय महिला एका कंपनीत काम करत होती. तिची शिफ्ट सकाळी ७:३० वाजता सुरु होते. तरीही, ती दररोज सकाळी ६:४५ किंवा ७ वाजता ऑफिसमध्ये पोहोचायची. तिच्या बॉसने तिला अनेक वेळा समजावून सांगितले, की ती त्या वेळी काम करू शकत नाही आणि तिला तिच्या शिफ्टनुसार काम करावे लागेल. तरी तिने आपली सवय बदलली नाही आणि लवकर येत राहिली. शेवटी, कंपनीने हे सूचनांचे उल्लंघन मानले आणि तिला कामावरून काढून टाकले.

नोकरी गमावल्यानंतर, महिलेने न्यायालयात जाऊन कंपनीवर चुकीच्या पद्धतीने कामावरून काढून टाकल्याचा आरोप केला. तथापि, कंपनीने न्यायालयाला सांगितले, की त्यांनी तिला फक्त एकच नाही तर अनेक तोंडी आणि लेखी इशारे दिले आहेत. तरीही, तिने तिचे वर्तन बदलले नाही. कंपनीच्या म्हणण्यानुसार, अंतिम इशारा मिळाल्यानंतरही, ती सुमारे १९ दिवस दररोज लवकर येत राहिली. इतकेच नाही तर तिने ऑफिसमध्ये न पोहोचता अनेक वेळा हजेरी ॲपमध्ये लॉग इन करण्याचा प्रयत्नदेखील केला. कंपनीने म्हटले आहे की खरी समस्या ती लवकर पोहोचणे ही नव्हती, तर तिच्या वरिष्ठांच्या सूचनांचे पालन करण्यात अपयशी ठरली होती. त्यांनी असा दावा केला, की कर्मचाऱ्याच्या लवकर पोहोचण्यामुळे टीमच्या एकूण कामावर परिणाम होत होता. एका सहकाऱ्याने स्पष्ट केले, की तिने कामात मदत केली नाही किंवा ती जलद गतीने काम करत नव्हती; उलट ती अनेकदा आणखी गोंधळ निर्माण करत होती. टीमचे काम एका निश्चित प्रणालीनुसार चालते आणि तिचे लवकर पोहोचणे त्या प्रणालीमध्ये व्यत्यय आणत होते.

कंपनीच्या बाजूने निकाल देताना न्यायालयाने म्हटले, हे वर्तन स्पॅनिश कामगार कायद्याच्या कलम ५४ चे गंभीर उल्लंघन आहे. न्यायालयाच्या मते, कर्मचाऱ्याने वारंवार सूचनांकडे दुर्लक्ष करणे ही एक गंभीर चूक मानली जाते



आणि कंपनीची कृती योग्य होती. म्हणून न्यायालयाने महिलेला कोणताही दिलासा देण्यास नकार दिला. तथापि, महिला या निर्णयावर समाधानी नाही. तिचा दावा आहे, की तिला कंपनीने चुकीच्या पद्धतीने काढून टाकले आणि तिला अन्याय्य वागणूक दिली. तिने असेही स्पष्ट केले, की ती आता व्हॅलेन्सियाच्या सर्वोच्च न्यायालयात या निर्णयावर अपील करण्याची तयारी करत आहे. तिच्या मते, ऑफिसमध्ये लवकर पोहोचणे हा एवढा गंभीर गुन्हा नव्हता. तिला वाटते, कंपनी तिचे हेतू समजून घेण्यात अयशस्वी ठरली आणि पुरेशा कारणाशिवाय तिला दोषी ठरवले.

# गडचिरोली ठरेल महाराष्ट्राचे प्रवेशद्वार : मुख्यमंत्री

## अडपल्लीत विद्यापीठ तंत्रज्ञान संस्थेचे उद्धाटनः गडचिरोलीत तीन लाख कोटींची गुंतवणूक आणि एक लाख रोजगाराचे उद्दिष्ट

■ महासागर प्रतिनिधी
गडचिरोली, दि. २८ :

गडचिरोली जिल्हा आता केवळ राज्याचा शेवटचा जिल्हा उरला नसून, तो महाराष्ट्राचे प्रगत प्रवेशद्वार म्हणून ओळखला जाईल. जिल्ह्यातील खनिज संपत्ती आणि तरुणांचे कौशल्य यांच्या जोरावर येथे ३ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक येत असून, त्यातून सुमारे १ लाख रोजगाराच्या संधी निर्माण होतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे व्यक्त केला.




गडचिरोली जिल्हा मुख्यालयापासून दोन किमी अंतरावर असलेल्या अडपल्ली येथे गोंडवाना विद्यापीठ आणि लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेड यांच्या सार्वजनिक-खाजगी भागीदारीतून स्थापन करण्यात आलेल्या विद्यापीठ तंत्रज्ञान संस्थाचे उद्धाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते पार पडले, त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी वित्त, नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय, कामगार राज्यमंत्री तथा गडचिरोलीचे सहपालकमंत्री अँड. आशिष जयस्वाल, गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार, खनिकर्म राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, अपर पोलीस महासंचालक छेरींग दोरजे, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, जिल्हा पोलीस अधीक्षक निलोत्पल, आ. धर्मरावबाबा आत्राम, आ. डॉ. मिलिंद नरोटे, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, लॉयड्स मेटल्स ॲण्ड एनर्जी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक बालसुब्रमण्यम प्रभाकरन यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, गेल्या दहा वर्षांत गडचिरोलीचा चेहरा बदलण्यासाठी आम्ही जाणीवपूर्वक प्रयत्न केले. एकेकाळी माओवादाने ग्रस्त आणि अतिमागास ओळख असलेला हा जिल्हा आता विकासाच्या मुख्य प्रवाहात आला आहे. पोलीस दलाचे शौर्य आणि शासनाच्या धोरणांमुळे हा जिल्हा लवकरच माओवादमुक्त होईल. आता इथल्या तरुणांच्या हातात शस्त्र नव्हे, तर आधुनिक शिक्षण आणि रोजगार असेल.

तद्नंतर गडचिरोली जिल्ह्यातील अंतर्गत सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम, गतिमान व प्रभावी करण्याच्या दृष्टीने गडचिरोली पोलीस विभागाला ३० स्कॉर्पिओ वाहने, २ बस व २ मोटारसायकली असा एकूण ३४ वाहनांचा ताफा उपलब्ध करून देण्यात आला. या नव्या वाहनांचे वितरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आले. तसेच गडचिरोली पोलीस विभागाच्या वाढिव विश्रामगृहाचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले तद्नंतर गडचिरोली पोलीस विभागाच्या गडचिरोली महोत्सव या सांस्कृतिक कार्यक्रमातही त्यांनी भाग घेतला.

### उद्योग आणि शिक्षणाचा संगम: युएटीआय

उद्योगांना लागणारे कुशल मनुष्यबळ स्थानिक पातळीवरच तयार व्हावे, या हेतूने श्युएटीआयशी स्थापना झाली आहे. संस्था उद्योग आणि शिक्षण क्षेत्राच्या सहकार्याचे एक उत्तम मॉडेल आहे, असे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. लॉयड्स मेटल्सने यासाठी २५ कोटी रुपयांचा निधी देऊन पुढाकार घेतल्याबद्दल त्यांनी त्यांचे विशेष कौतुक केले. या संस्थेत केवळ शिक्षणच नाही, तर विद्यार्थ्यांची राहण्याची आणि प्रवासाची मोफत सोयही करण्यात आली आहे.

### भविष्याचा वेध घेणारे अभ्यासक्रम

मुख्यमंत्री म्हणाले, येथे मायनिंग, मेटॉलॉजीपासून ते संगणक आणि एआय पर्यंतचे आधुनिक कोर्सेस शिकवले जात आहेत. लँग्वेज लॅबमुळे स्थानिक विद्यार्थ्यांमध्ये आलेला आत्मविश्वास वाखाणण्याजोगा आहे. चार महिन्यांच्या प्रशिक्षणाने एक मुलगी ज्या आत्मविश्वासाने इंग्रजीत बोलली, ते पाहून गडचिरोलीच्या उज्ज्वल भविष्याची खात्री पटली.

# महापालिका निवडणुकीत अपक्षांना सफरचंदसह अनेक मुक्त चिन्हे

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २८ :




राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केले १९४ चिन्ह

नागपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. राज्य निवडणूक आयोगाने अपक्ष उमेदवारांसाठी तब्बल १९४ चिन्हे उपलब्ध करून दिली आहेत. यात खाद्यपदार्थांसह विविध प्रकारच्या चिन्हांचा समावेश आहे. अपक्ष उमेदवारांना सफरचंद, बिस्कीट, पाव, केक, ढोबळीमिरची, फुल कोबी, नारळ, ऊस, आले, द्राक्ष, हिरवी मिरची, फणस, भेंडी, मका, भुईमूग, वाटाणे, पेर, अननस, कलिंगड, आक्रोड आणि जेवणाची थाळी यांसारखी चिन्हे निवडता येतील. वाहन आणि इलेक्ट्रॉनिक वस्तूंची चिन्हे देखील मोठ्या संख्येने उपलब्ध आहेत. निवडणूक लढवणाऱ्या अपक्ष उमेदवारांना तसेच अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या उमेदवारांना या मुक्त चिन्हांमधून निवड करता येणार आहे. राज्य निवडणूक आयोगाकडे मान्यता प्राप्त नसलेल्या पण नोंदणीकृत अशा ४१६ पक्षांनी नोंदणी केली आहे. त्यांना मान्यताप्राप्त पक्ष श्रेणीतील राखीव चिन्हे न देता स्वतंत्र चिन्हे दिली जाणार आहेत. मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना त्यांच्या राखीव चिन्हांवरच उमेदवार उभे करण्याची मुभा राहील. राष्ट्रीय स्तरावरील पाच पक्ष, राज्यस्तरीय पाच पक्ष आणि इतर राज्यातील राज्यस्तरीय नऊ पक्षांची चिन्हे राखीव ठेवण्यात आली आहेत.

मतदारांना उमेदवाराचे नाव लक्षात ठेवणे नेहमीच सोपे नसते, परंतु निवडणूक चिन्ह सहज लक्षात राहते. यामुळे मतदारांना चिन्हावरून उमेदवाराला मतदान करणे सोपे जाते. अपक्ष उमेदवारांना अर्ज भरताना तीन मुक्त चिन्हे नमूद करणे बंधनकारक आहे. येत्या २ जानेवारी २०२६ रोजी अर्ज माघारीनंतर आणि त्यानंतर होणाऱ्या निवडणूक चिन्हांच्या वाटपाने ३ जानेवारी रोजी अंतिम चित्र स्पष्ट होईल. चिन्ह वाटपासाठी विशिष्ट क्रम पाळला जातो. आघाड्या किंवा फ्रंट यांना मुक्त चिन्हांपैकी अग्रक्रमाने मागणी केलेली चिन्हे देण्यासाठी विचार केला जातो. मात्र, असे चिन्ह एकापेक्षा जास्त आघाडी/संघटना/फ्रंट यांनी प्रथम अग्रक्रमाने मागितल्यास चिठ्या टाकून निर्णय घेतला जातो. अपक्षांच्या वरती त्यांना प्राधान्य मिळू शकते. मुक्त चिन्हांपैकी वाटप झाल्यानंतर उर्वरित चिन्हे अपक्ष उमेदवारांना त्यांनी दिलेल्या अग्रक्रमाचा विचार करून दिली जातात.

## गिधाडाचा थक्क करणारा प्रवास

# पेंचमधून थेट नाशिक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :

महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वरजवळील अंजनेरी टेकड्या भगवान हनुमानाचे जन्मस्थान म्हणून ओळखल्या जातात. गिधाडांसाठी हा एक प्रसिद्ध अधिवास देखील आहे.
महाराष्ट्रातील पेंच व्याघ्र प्रकल्पात ११ डिसेंबरला सोडलेले जे-१३२ नावाचे लांब चोचीचे गिधाड (जटायू) अंजनेरीपासून ३८ किमी अंतरावर पोहोचले आहे. त्याने १७ दिवसांत ७५० किमीचा प्रवास केला.

या गिधाडाने नागपूर, वर्धा, यवतमाळ, हिंगोली, वाशिम, बुलढाणा, जालना, छत्रपती संभाजीनगर या मागार्चा वापर केला आणि नाशिकला पोहोचण्यासाठी १५ दिवस घेतले. गुरुवारी, ते एका कड्यावर मुक्कामासाठी थांबले. त्याने आतापर्यंत ७५० किलोमीटरचे अंतर कापले आहे. ते संध्याकाळी मुक्कामासाठी येते, सकाळी अन्न खाते आणि पुढच्या ठिकाणाकडे उडून जाते.

बीएनएचएसचे मनन सिंग म्हणाले की, त्याच्या हालचालींमधील वाढ पाहता, त्याने प्रवासात निश्चितपणे दोन वेळा पोटभर जेवण केले आहे. महाराष्ट्र वन विभाग, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या सहकार्याने, बंदिवासात जन्मलेल्या गिधाडांना निसर्गात सोडण्याचे काम करत आहे. १४ गिधाडांची दुसरी तुकडी २४ एप्रिल २०२५ रोजी हरियाणातील पिंजोर येथून पेंच व्याघ्र प्रकल्पात विशेषतः स्थापन केलेल्या पूर्व-प्रकाशन पक्षीगृहात आणण्यात आली आणि त्यांना आठ महिने स्वतःहून मृतदेहांवर अन्न खाण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.



सोडलेल्या गिधाडांना जीपीएस ट्रान्समीटर लावण्यात आले आहेत, ज्यामुळे त्यांच्या हालचाली, अधिवासाचा वापर आणि जगण्याचे दीर्घकालीन निरीक्षण करणे शक्य होते. बीएनएचएसची टीम प्रक्षेपणाच्या परिणामांचे वैज्ञानिक मूल्यांकन करत आहे.
**किशोर रिठे, संचालक, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी**

बीएनएचएसने गेल्या महिन्यात या १४ पक्ष्यांना जीएसएम टॅग लावले होते. यामध्ये आठ पांढऱ्या पाठीची गिधाडे आणि पाच लांब चोचीची गिधाडे आहेत.

स्थानिक पर्यावरणीय परिस्थितीशी जुळवून घेण्याचा एक निश्चित कालावधी, नैसर्गिक अन्न सेवनाचे प्रशिक्षण आणि जंगली गिधाडांच्या उपस्थितीत जगण्याचे प्रशिक्षण दिल्यानंतर, ११ डिसेंबरला राज्याचे मुख्य वन्यजीव संरक्षक श्रीनिवास रेड्डी आणि बीएनएचएसचे अध्यक्ष प्रवीण परदेशी यांच्या हस्ते त्यांना निसर्गात सोडण्यात आले.

१२ डिसेंबरला एक अत्यंत सकारात्मक घडामोड नोंदवली गेली, जेव्हा पूर्वीच्या तुकड्यांमध्ये (२०२४) सोडलेली गिधाडे आणि सध्याच्या २०२५ च्या तुकडीतील ही १४ गिधाडे पेंच येथील खाद्यस्थळी एकत्र भेटताना आणि अन्न खाताना दिसली.

# वाघाच्या हल्ल्यात दोन मजूर ठार

■ महासागर प्रतिनिधी, मूल, दि. २८ :

बांबू कटाईचे काम करताना एकाच दिवशी दोन वेगवेगळ्या ठिकाणी अवघ्या पाऊण तासाच्या फरकाने झालेल्या वाघाच्या हल्ल्यात दोन मजूर ठार झाले. ताडोबाच्या बफर क्षेत्रातील मामला व महादवाडी परिसरात या घटना घडल्या. प्रेमसिंग दुखी उदे (५५, रा. बालाघाट), बुदसिंग श्यामलाल मडावी (४१, रा. मुंडला, बालाघाट) अशी मृतकांची नावे आहेत. यामुळे वन्यजीव व मानव संघर्ष शिगेला पोहोचलेला आहे.

चिचपल्ली बफर क्षेत्रात बांबू कटाईचे काम सुरू आहे. वनविभागाने बालाघाट येथून कामासाठी मजूर बोलावले आहेत. काही मजूर महादवाडी बिटात तर काही मामला बिटात बांबू कटाईचे काम करीत आहेत. मामला बिटातील कक्ष क्रमांक ३८१ मध्ये शनिवारी दुपारी ३.४५ च्या सुमारास बांबू कटाईचे काम करण्यात मग्न असलेल्या बुदशिंग मडावी यांच्यावर अचानकपणे वाघाने हल्ला चढवून जागीच ठार केले.

ही घटना ताजी असताना व याबाबत चौकशी सुरू असतानाच पाऊण तासाच्या फरकाने या घटनास्थळापासून काहीच अंतरावर चिचपल्ली वानपरीक्षेत्रातील महादवाडी बफर झोन कक्ष क्रमांक ३५७ मध्ये प्रेमसिंग दुखी उदे यांच्यावर दुपारी ४.३० वाजताच्या सुमारास वाघाने हल्ला चढवून जागीच ठार केले. या दोन्ही घटनांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले.

## आरएसएस शताब्दी वर्षात ऐतिहासिक संघटनात्मक बदल

# प्रांत प्रचारक पद रद्द

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २८ :

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आपल्या शताब्दी वर्षात मोठे संघटनात्मक बदल करणार आहे. या बदलांनुसार, 'प्रांत प्रचारक' हे पद रद्द केले जाईल आणि त्याऐवजी 'संभाग प्रचारक' किंवा 'राज्य प्रचारक' अशी नवीन व्यवस्था लागू केली जाईल. यामुळे संघटन अधिक प्रभावी, कार्यक्षम आणि तळागाळापर्यंत मजबूत होईल, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.



संघाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण होत असताना हे महत्त्वाचे बदल करण्यात येत आहेत. सध्याची प्रांत प्रचारक व्यवस्था बदलून, त्यांच्या जागी संभाग प्रचारक नियुक्त केले जातील. संभाग प्रचारकांचे कार्यक्षेत्र सध्याच्या प्रांत प्रचारकांच्या तुलनेत मर्यादित असेल, ज्यामुळे कामात अधिक सुसूत्रता येईल. या नव्या रचनेनुसार, प्रत्येक राज्यासाठी एक 'राज्य प्रचारक' असेल. साधारणतः दोन प्रशासकीय मंडळे (कमिश्नरी) मिळून संघाचा एक 'संभाग' तयार केला जाईल. यामुळे राज्यांच्या प्रशासकीय रचनेनुसार कामाचा विस्तार करणे शक्य होईल.

उदाहरणार्थ, सध्या उत्तर प्रदेशात संघाचे ब्रज, अवध, मेरठ, कानपूर, काशी आणि गोरक्ष असे सहा प्रांत आहेत, ज्यात सहा प्रांत प्रचारक जबाबदारी सांभाळत आहेत. प्रशासकीय दृष्टिकोनातून उत्तर प्रदेशात एकूण १८ मंडळे असल्याने, नव्या व्यवस्थेनुसार येथे ९ संभाग प्रचारक असतील आणि संपूर्ण राज्यासाठी एक राज्य प्रचारक कार्यरत असेल.

यासोबतच, 'क्षेत्र प्रचारकां'ची संख्याही कमी होणार आहे. सध्या पूर्व उत्तर प्रदेशासाठी एक क्षेत्र प्रचारक आणि पश्चिम उत्तर प्रदेश व उत्तराखंडसाठी स्वतंत्र क्षेत्र प्रचारक आहेत. नव्या रचनेत या दोन्हींच्या जागी एकच क्षेत्र प्रचारक संपूर्ण उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडसाठी काम पाहणार आहे. मात्र, या दोन्ही राज्यांचे राज्य प्रचारक स्वतंत्र असतील. त्याचप्रमाणे, सध्या राजस्थानसाठी एक स्वतंत्र क्षेत्र प्रचारक आहे आणि उत्तर क्षेत्रासाठी (दिल्ली, जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश, हरियाणा, पंजाब) वेगळा क्षेत्र प्रचारक आहे.

## कारची दुचाकीला धडक

# दोन ठार

■ महासागर प्रतिनिधी
वर्धा, दि. २८ :

भरधाव कारने दुचाकीला धडक दिली. यात दुचाकीवरील दोघांचा मृत्यू झाला. ही घटना २६ रोजी नजिकच्या भूगाव परिसरात टी-पॉईंट परिसरात घडली असून या प्रकरणी २७ रोजी सावंगी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रवी घनश्याम जयराजे (४८) रा. आनंदनगर वर्धा व पिंकी जयसिंग तोमर रा. इतवारा बाजार वर्धा अशी मृतांची नावे आहेत. रवी जयराजे हे पिंकी तोमर यांच्यासोबत एम. एच. ३२ एस. १९२६ क्रमांकाच्या दुचाकीने वर्धेच्या दिशेने येत होते. दुचाकी भूगाव टी-पॉईंट परिसरात आली असता के. ए. ३५ पी. ६७११ क्रमांकाच्या भरधाव कारने त्यांच्या दुचाकीला जबर धडक दिली. यात रवी जयराजे यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर पिंकी या गंभीर जखमी झाल्या. अपघात झाल्याचे लक्षात येताच नागरिकांनी घटनास्थळाकडे धाव घेत जखमीला रुग्णालयाकडे रवाना केले.

# निर्मलबाबू दर्डा कालवश

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. २८ :



लोकमत वृत्तपत्र समूहाचे माजी संपादकीय संचालक निर्मलकुमार खुशालचंद दर्डा उर्फ निर्मलबाबू (वय ७६) यांचे शनिवारी निधन झाले. वितरण आणि वृत्तपत्र क्षेत्रातील भीष्माचार्य अशी ओळख असलेल्या निर्मलबाबूंनी 'लोकमत'चे जाळे महाराष्ट्रभर पोहोचवण्यासाठी अविश्रांत मेहनत घेतली. 'लोकमत'चे वरिष्ठ महाव्यवस्थापक मिलन दर्डा यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, जावई, सून आणि नातवंडे असा परिवार आहे.

वर्धा जिल्ह्यातील पुलगाव या त्यांच्या जन्मगावी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या प्रसंगी 'लोकमत'चे एडिटर-इन-चिफ राजेंद्र दर्डा, व्यवस्थापकीय संचालक देवेंद्र दर्डा, संचालक अशोक जैन, परिवारातील किशोर दर्डा यांच्यासह लोकमत परिवारातील अनेक सदस्य, तसेच पुलगाव आणि परिसरातील मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अवघे आयुष्य 'लोकमत'ला समर्पित केलेल्या निर्मलबाबू यांच्या निधनाने वृत्तपत्र क्षेत्रातून हळहळ व्यक्त केली जात आहे. 'लोकमत' महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात पोहोचावा, हे श्रद्धेय जवाहरलालजी दर्डा उर्फ बाबूजी यांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण करणे हे निर्मलबाबू यांनी आपले ध्येय बनवले आणि 'लोकमत' वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

लोकमत समूहाचे चेअरमन डॉ. विजय दर्डा आणि एडिटर इन चीफ राजेंद्र दर्डा यांनी तयार केलेल्या टीमचे ते खंदे शिलेदार होते. 'लोकमत'च्या पहिल्या अंकापासून निर्मलबाबू यांचा प्रवास सुरु झाला. वितरण आणि व्यवस्थापनासोबत संपादकीय दृष्टीकोनही हवा, या जाणिवेतून त्यांनी पत्रकारितेची पदवी घेतली. त्यांनी वृत्तपत्र विक्रत्यांचे राज्यव्यापी नेटवर्क तयार केले.

# नितीन गडकरींचा पर्यायी इंधनावर भर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :

केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी पर्यायी इंधनाचा अवलंब करण्यावर भर दिला आहे. नागपुरातील एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी वाहनचालकांना कठोर उत्सर्जन नियम लागू करण्याचा इशारा दिला. पयार्यी इंधनांचा वापर आता अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

गडकरी म्हणाले, "मी वाहतूक मंत्री आहे, दंडुका घेऊन बसलो आहे." पर्यायी इंधनाचा वापर न केल्यास युरो ६ सारखे कठोर उत्सर्जन नियम लागू केले जातील, असा दम त्यांनी भरला. त्यांच्या या वक्तव्यामुळे नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. ट्रॅक्टर कंपन्यांनी १००% इथेनॉल आणि सीएनजीवर चालणारे फ्लेक्स इंजिन ट्रॅक्टर विकसित केले आहेत. भविष्यात, बांधकाम उपकरणांना वित्तपुरवठा करणाऱ्या लोकांनी पयार्यी इंधन आणि जैवइंधन पर्याय निवडल्यास, त्यांना पाच टक्के अनुदान दिले जाईल.

# १९ विद्यार्थिनींची वसतिगृहातून हकालपट्टी

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २८ :

उपराजधानीतील शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालयाच्या मुलींच्या वसतिगृहात घडलेल्या रॅगिंगच्या गंभीर प्रकरणात महाविद्यालय प्रशासनाने कडक कारवाई करत १९ वरिष्ठ विद्यार्थिनींना दोषी ठरवले आहे. रॅगिंग प्रतिबंधक समितीच्या चौकशीनंतर या विद्यार्थिनींना तीन महिन्यांसाठी वसतिगृहातून हकालपट्टी करण्यात आली. गेल्या सुमारे २० दिवसांत दोन वेळा कनिष्ठ विद्यार्थिनींची रॅगिंग झाल्याबाबत प्रशासनाकडे दाखल झाल्या होत्या. इंट्रोडक्शनच्या नावाखाली मानसिक छळ केला जात असल्याचे नमूद करण्यात आले होते.रॅगिंग प्रतिबंधक समितीचे अध्यक्ष डॉ. जयंत गुल्हाने असून सचिव डॉ. आशीष थटेरे यांनी तातडीने चौकशी सुरू केली.

# १४ हजार गडचिरोलीकरांची महामॅरेथॉनमध्ये धाव



■ महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. २८ :

आज केवळ नागरिक धावत नाहीत, तर गडचिरोलीचा विकास धावत आहे. गडचिरोलीकरांची ही जिद्द आणि सकारात्मक ऊर्जा जिल्ह्याचा कायापालट घडविल्याशिवाय राहणार नाही, असे प्रतिपादन राज्याचे वित्त, नियोजन, कृषी, मदत व पुनर्वसन, विधी व न्याय, कामगार राज्यमंत्री तथा गडचिरोली जिल्ह्याचे सहपालकमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी केले.

जिल्हा परिषद गडचिरोलीच्या प्रांगणात पोलीस दलाच्या वतीने आयोजित ह्यगडचिरोली महामॅरेथॉन कार्यक्रमात ते मुख्य अतिथी म्हणून बोलत होते. आमदार धर्मरावबाबा आत्राम, आमदार डॉ. मिलिंद नरोटे, अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती) छेरींग दोरजे, नक्षलविरोधी अभियानाचे विशेष पोलीस महानिरीक्षक संदीप पाटील, जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, उपमहानिरीक्षक अंकीत गोयल, जिल्हा पोलीस अधीक्षक निलोत्पल, केंद्रीय राखीव पोलीस दलाचे उपमहानिरीक्षक (परिचालन) अजय शर्मा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, लॉयड्स मेटल्स ॲण्ड एनर्जी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक बालसुब्रमण्यम प्रभाकरन तसेच अपर जिल्हाधिकारी नितीन गावंडे यांची याप्रसंगी प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या महामॅरेथॉनला शुभेच्छा दिल्या असल्याचे सांगून, राज्यमंत्री ॲड. जयस्वाल यांनी मॅरेथॉनच्या सुंदर व यशस्वी आयोजनाची स्तुती केली. गडचिरोली जिल्हा आता इतर जिल्ह्यांना प्रेरणा देणारे काम करत असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

या महामॅरेथॉनमध्ये जिल्ह्याच्या विविध भागांतून सुमारे १४ हजार नागरिकांनी सहभाग घेतला. २१ किलोमीटर, १० किलोमीटर, ५ किलोमीटर आणि ३ किलोमीटर अशा विविध अंतरांच्या शर्यतींचे आयोजन करण्यात आले होते. नागरिक, युवक, विद्यार्थी, महिला तसेच पोलीस व सुरक्षा दलातील जवानांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेत कार्यक्रम यशस्वी केला. मान्यवरांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून महामॅरेथॉनला सुरुवात करण्यात आली. विशेष बाब म्हणजे, सहपालकमंत्री व उपस्थित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतः मॅरेथॉनमध्ये धावून सहभाग नोंदविला.

# अमरावतीत शिवसेना-भाजपची युती तुटली

## जागावाटपाचा तिढा ठरला कळीचा मुद्दा, शिंदे गटाची २५ जागांची मागणी भाजपने फेटाळली

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २८ :

राज्यात मुंबईसह अनेक ठिकाणी भाजप आणि शिवसेना एकत्र निवडणूक लढवत असताना, अमरावतीमध्ये मात्र या 'महायुती'ला सुरुंग लागला आहे. जागावाटपाच्या मुद्द्यावरून दोन्ही पक्षांमधील चर्चेचा अडसर दूर होऊ शकला नाही, परिणामी अमरावती महानगरपालिका निवडणुकीत दोन्ही पक्षांनी स्वतंत्रपणे लढण्याचा निर्णय घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या निर्णयामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, शिवसेनेना शिंदे गटाने अमरावती महापालिकेच्या एकूण ८७ जागांपैकी २५ जागांची आग्रही मागणी भाजपकडे केली होती. मात्र, भाजपने हा प्रस्ताव पूर्णपणे नाकारला. भाजप केवळ १५ ते १६ जागा शिवसेनेला सोडण्यास तयार होती. जागांच्या या आकड्यावरून दोन्ही पक्षांत एकमत होऊ शकले नाही. उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू असतानाच युती तुटल्याने कार्यकर्त्यांमध्ये गोंधळाचे वातावरण आहे.

या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे नेते अभिजीत अडसूळ आज सायंकाळी एक महत्त्वाची पत्रकार परिषद घेणार आहेत. या परिषदेत ते युती तुटण्याचे नेमके कारण स्पष्ट करण्याची आणि पक्षाची पुढील रणनीती जाहीर करण्याची शक्यता आहे. शिवसेनेच्या या पवित्र्यामुळे भाजपच्या गोटात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, अमरावती महानगरपालिका निवडणूक महायुती म्हणूनच लढवली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी स्पष्ट केले होते.

जागा वाटपाबाबत स्थानिक नेत्यांमध्ये सकारात्मक चर्चा अंतिम टप्प्यात असून, लवकरच याबाबत निर्णय जाहीर होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला होता. मात्र, आज जागावाटपाच्या तिढ्यामुळे अमरावतीत भाजप शिवसेना युती तुटली.

२०१७ च्या निवडणुकीत भाजपने स्वबळावर मुसंडी मारत बहुमत मिळवले होते. ४५ जागा भाजपने जिंकल्या होत्या. तर काँग्रेसने १५, शिवसेनेने ७, असदुद्दीन ओवैसी यांच्या एमआयएमने १०, मायावती यांच्या बहुजन समाज पार्टीने ५, रवी राणा यांच्या युवा स्वाभिमानचे ३ जागांवर विजय मिळवला होता. शिवाय आरपीआय आठवले गटाने एका जागेवर आणि अपक्ष उमेदवाराने एका जागेवर विजय मिळवला होता.

अमरावतीत १५ जानेवारीला मतदान आणि १६ जानेवारीला निकाल लागणार आहे. भाजप आणि शिवसेना स्वतंत्र लढल्यास हिंदुत्वाच्या मतांचे विभाजन होण्याची दाट शक्यता आहे. याचा थेट फायदा काँग्रेस किंवा एमआयएम यांसारख्या विरोधी पक्षांना मिळू शकतो. सत्ता राखण्यासाठी धडपडणाऱ्या भाजपसाठी आणि अस्तित्व टिकवण्यासाठी लढणाऱ्या शिवसेनेसाठी आता ही निवडणूक प्रतिष्ठेची बनली आहे.